T. 419 DLT

श्री बालतपस्वी कृपापोषि



धर्मवीर ग्रंथ रत्न माला

द्वितीयरत्नम्

52 58 / 519

सचित्र

श्रीरेणुक विजयः

—ग्रंथाचे सर्व आधिकार—
श्रीधर्मवीर ग्रंथरत्नमालाध्यक्ष, श्री. ष. ब्र. चन्नवीर शिवाचार्य बृहन्मठाध्यक्ष होटगी.
यांचेकडे आहे.

मित्ती आश्विन शुद्ध १० शके १८६५

किंमत १॥ रुपया.

श्रीमद्वीरशैव गुरु
उत्तर कसबा ९१८ सोला
T. 419
DLI
A.C.C. 5258.



धर्मवीर, दानशूर श्रीमंत् शरणप्पाअण्णा
फत्तेपूर दुबलगुंडी यांनी—
आपल्या राजवाड्यांत अत्यंत वैभवानें
चालविलेले विजयादशमीचे

—स्मारकम्—

DLF

ॐ नमः पंचजगद्गुरुभ्यः

श्री बालतपस्वी कृपापोषित.

धर्मवीर, दानशूर, श्रीमंत शरणप्पाअण्णा फत्तेपूर
यांच्या उदार आश्रयाखाली प्रसिद्ध होणारी
वीरशैव धर्मवीर ग्रंथरत्न–माला.

द्वितीयरत्नम्

सचित्र श्रीरेणुक विजयः

वेदमूर्ति साहित्यरत्नम् पंडित जगदीशशास्त्री नालवार
यांनीं सोलापूर येथें
'श्री बालतपस्वी' इ. प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केला.

प्रथमावृती प्रती ५००,

मित्ती आश्विन शुद्ध १० शके १८६५

सन) किंमत १॥ रुपाया. (१९४३

प्रकाशकः—

वे. मू. साहित्यरत्नम् पंडित जगदीशशास्त्री

श्रीमद्वीरशैव गुरुकुल, प्रधानाध्यापक

सोलापूर.

卐 ★ 卐

—लेखक—

वेदमूर्ति सिद्रामय्या शिवय्या जंगम (पाकणीकर)

हेड मास्तर म्युनिसिपल मराठी शाळा, सोलापूर.

★ 卐 ★

मुद्रक—

म. आ. गंभिरे.

श्री बालतपस्वी इलेक्ट्रिक प्रिंटिंग प्रेस,

२१७, प. मंगळवार, सोलापूर.


T. ४१९



श्रीबालतपस्वी होटगी.　　धर्मवीर फत्तेपूर दुबलगुंडी.



प्रकाशक:—साहित्यरत्नम् श्री. जगदीशशास्त्री.



लेखक:—श्री. सिद्रामय्या शिवय्या जंगम.

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदंतु ॥

प्रस्तावना.

यस्यस्मरणमात्रेण नृणां मुक्तिः करस्थिता ।
तंवंदेजगदाधारं रेणुकाचार्यं जगद्गुरूं ॥

सृष्टयुत्पत्तीचे पूर्वीं श्री जगद्गुरु रेणुकादि पंचाचार्य हे परमेश्वराच्या सद्योजातादि मंचमुखांतून उद्भवून पृथ्वीतलावर श्री सोमनाथ, सिद्धेश्वर, रामनाथ, मल्लिकार्जुन, विश्वनाथ या लिंगांतून अवतरून जगांत सर्वत्र संचार करून, शक्ति विशिष्टाद्वैतसिद्धांतप्रतिपादक असें वीरशैवतत्त्व स्थापून, स्वमताच्या परिपालनार्थ रंभापुरी, उज्जयिनी, हिमालय, श्रीशैल, काशी या क्षेत्रांत पांच धर्मपीठें स्थापून जगद्वंद्य झाले. हें सर्वश्रुत आहेच.

हे पंचाचार्य भरतखंडभर संचार करून आपल्या महिमाप्रभावानें नास्तिकमतांचें खंडन करून शिवभक्तीची अभिवृद्धी केली. यांनीं केलेल्या अद्‌भुत लीलांचे विषय त्यांच्या त्यांच्या पवित्र चरित्रांत विशदरीतीने वर्णिलेले आहेत. या परमपूज्यांच्या लीलाविषयांचें विवेचन प्राचीन पंडितांनीं संस्कृत भाषेंत अतिमनोहर असें केलेलें आहे. असो. सध्यां श्री मद्वीरशैवमतस्थापक श्री जगद्गुरु पंचाचार्यांपैकीं श्री जगद्गुरु रेणुकाचार्य यांचें चरित्र कथन करणें अत्यंत जरूर आहे. या गुरुसार्वभौमासंबंधी अनेक प्राचीन कवींनीं अनेक ग्रंथ रचलेले

आहेत. आतां सुमारें १५०० वर्षांपूर्वीं शिवयोगी शिवाचार्यांकडून रचिला गेलेल्या 'सिद्धांत शिखामणी' या लोकविख्यात् ग्रंथामध्यें श्रीरेणुक यांचें कुल्यपाक क्षेत्रांतील सोमनाथ लिंगामधून अवतरणें, अगस्ति महर्षींना शिवसिद्धांताचा उपदेश करणें, बिभीषणाच्या प्रार्थनेनुसार तीन कोटी शिवलिंगें स्थापणें, सोमनाथ लिंगांत लिंगैक्य होणें इत्यादि विषयांचें वर्णन केलेलें आहे. आतां ९८० वर्षांपूर्वीं सिद्धनाथ शिवाचार्यांकडून रचिला गेलेल्या 'रेणुकविजय' नांवाच्या ग्रंथांत रेणुकाचार्यांच्या अनेक लीलांचें वर्णन केलें आहे. इतकेंच नव्हे, तर ईशान शिवगुरु म्हणून प्राचीन कवींनीं संस्कृतांत रेणुक-चरित्र, १२ व्या शतकांत असलेल्या हंपीच्या हरीश्वर कवींनीं कन्नड भाषेंत रेवणसिद्धरगळे म्हणून, १५ व्या शतकांत असलेल्या बोम्मरस कवींनीं रेवणसिद्धेश्वर पुराण, याच शतकांतील मल्लण्ण कवींनीं रेवणसिद्धेश्वर काव्य, १७ व्या शतकांत असलेल्या चन्नबसव कवींनीं रेवणसांगत्य ग्रंथ तयार केलेले आहेत. परंतु प्राचीन संस्कृत कवींनीं या आचार्यांच्या लीला जशा पूर्णपणें वर्णिलेल्या आहेत तशा कन्नड कवींनीं त्या वर्णिलेल्या नाहींत. बोम्मरसादि कन्नड कवींनीं या महात्म्यांच्या सत्य लीलांचें यथार्थ वर्णन न करतां व कालगणनांचाही उल्लेख न करतां आपल्या इच्छेस वाटेल तसें लिहिलेलें आहे. या ग्रंथांच्या लिहिण्यास मान्यता दिल्यास रेणुकाचार्य हे ७-८ शें वर्षांपूर्वीं होते असें म्हणावें लागेल. हा विषय केवळ असंबद्ध आहे. कारण आतां सुमारें १५०० वर्षांपुर्वीं सिद्धांत शिखामणी रचणाऱ्या शिवयोगी शिवाचार्यांनीं त्या ग्रंथाच्या शेवटीं श्रीरेणुकाचार्य यांचा शिवलोकगमन-

विषय स्पष्टपणें लिहिलेला आहे. शिवाय ९८० वर्षांपुर्वी रेणुकविजय नांवाचा ग्रंथ तयार केलेल्या सिद्धनाथ शिवाचार्यांनीं आपल्या ग्रंथांत रेणुकांचें सोमनाथ लिंगैक्य दाखविलें आहे.

आतां श्रीरेणुकाचार्य सुमारें ३३०० वर्षांपुर्वी अवतरले असावेत असे म्हणावें लागेल. यांचे या चरित्रांत, लोकविख्यात् अशा अगस्ति महर्षींना शिवसिद्धांत उपदेशिलेला विषय रावणाचा भाऊ बिभीषण याचे इच्छेनुसार तीन कोटी शिवलिंगें स्थापून त्याला शिवतत्त्वाचा उपदेश केलेला विषय, श्री शंकराचार्यांना चंद्रमौळीश्वर लिंगाचा अनुग्रह केलेला विषय, उज्जयिनीस राज्य करणाऱ्या शककर्त्या विक्रम महाराजास खड्गाचा अनुग्रह केल्याचा विषय, इत्यादि विषय प्रामुख्यानें सांगितलेले आहेत. या सर्व गोष्टी निदान दोन हजार वर्षांपूर्वी झालेल्या आहेत असे यांच्या चरित्रांवरून दिसून येतें. यावर अगस्ति कोणत्या काळांतले, बिभीषणचा काल कोणता, कलियुगाला व त्यांना संबंध काय अशी शंका कांहींना आल्यास हा त्यांचा अज्ञानाचा परिणाम असें म्हणावें लागेल. कारण अगस्ति, बिभीषण, हनुमंत इत्यादि हे योगसामर्थ्यानें चिरंजीव झाले आहेत, असें धर्मशास्त्र घंटाघोषानें सांगत आहे. त्यायोगानें शिवाज्ञानुसार ते श्री रेणुकाचार्यांच्या तत्त्वोपदेशानें कलियुगांत कृतार्थ झाले असें सांगणें मुळींच संशयास्पद नाहीं. अलीकडील चरित्रशोधक अगस्त्यादि हे ३ हजार वर्षांपूर्वी होऊन गेले असा अभिप्राय देतात. याद‍ृष्टीनें पाहिलें असतांही अगस्त्यादि हे श्रीरेणुकाचार्यांच्या समकालीन होत, असें म्हणावें लागेल. असो.

आणखी कांहीं लोक श्रीशंकराचार्यांना व श्रीरेणुकाचार्यांना कांहीं संबंध नाहीं, श्रीचंद्रमौलीश्वरलिंग श्रीरेणुकाचार्यांकडून दिलें गेलें नाहीं. या गोष्टी मानण्यास आम्ही केव्हांही तयार नाहीं, असें म्हणतात. पण हा केवळ त्यांचा भ्रम आहे, सत्य कांहीं नाहीं. कारण—सिद्धनाथ शिवाचार्यांकडून रचिला गेलेल्या रेणुकविजय ग्रंथांत चंद्रमौलीश्वर लिंगासंबंधी विषय प्रामुख्यानें लिहिण्यांत आला आहे. आणखी हा विषय शिवतत्त्वरत्नाकर, वेदांतसारवीरशैवचिंतामणी, वगैरे ग्रंथांतसुद्धां वर्णिलेला आहे. शिवाय १०० वर्षांपूर्वी श्रीशृंगेरी मठाला अधिपती झालेल्या श्रीसच्चिदानंद भारतीस्वामी नांवाच्या महात्म्यांनीं त्यावेळीं सदर मठाला अस्थानपंडित म्हणून असलेल्या श्रीकाशीलक्ष्मण शास्त्री नांवाच्या कविपुंगवाकडून आद्यशंकराचार्यादि सर्व स्वामींचें चरित्र 'गुरु वंशकाव्य' या नांवाचें संस्कृत भाषेंत पद्यरूपानें लिहविलें आहे. हा ग्रंथ शृंगेरी मठाच्या लायब्ररींत मिळत असून, म्हैसूर श्रीमन्महाराजांचे आस्थान धर्माधिकारी विद्याविशारद वे. शा. कुणिगल रामशास्त्र्यांकडून तपासला जाऊन, मद्रास इलाख्यांतील श्रीरंग एथें असलेल्या वाणीविलास प्रेसमध्यें छापला आहे. या ग्रंथाच्या तिसऱ्या सर्गांतः—

श्रीशंकराचार्यांनीं भरतखंडभर संचारकरून, काश्मीर देशाला जाऊन, तेथें असलेल्या शारदादेवीला आणून तिची शृंगेरी मठांत स्थापना केली, नंतर आपण कांची क्षेत्राला जाण्यास तयार होऊन, सुरेश्वराचार्य म्हणून आपल्या प्रथम शिष्याला शृंगेरी मठाचा पट्टाधिकार देऊन मग सुरेश्वराचार्याला 'हे सुरेश्वराचार्या, तूं श्रीरेणुका-

चार्यांनीं मला प्रथम अनुग्रह केलेलें हें श्रीचंद्रमौलीश्वरलिंग व रत्नगर्भ गणपती यांची पूजा कर.' अशी आज्ञा करून कांची क्षेत्राला गेले. असें सांगितलें आहे. त्या ग्रंथांतील श्लोक उदाहरणादाखल दिले आहेत.

श्रीचंद्रमौलीश्वर लिंगमस्मै । सद्रत्न गर्भंगणनायकंच ॥
सविश्वरूपाय सुसिद्ध दत्तं । दत्वान्यगादीच्चिरमर्चयेति ॥ ३३ ॥
सुरेश्वराचार्य सरस्वतींत्वं । संपूजयन्नास्स्वचिरादिहेति ॥
दत्त्वाऽभ्यनुज्ञां विनयताय तस्मै । शिष्यैस्समस्तैस्स जगामकाचीं ॥३४॥

३३ व्या पद्यांत असलेल्या 'सुसिद्ध दत्तं' पदालाः—

सुसिद्धेन रेवणसिद्ध महायोगीना दत्तं श्री चंद्रमौलीश्वर लिंगम्, सद्रत्नगर्भं सद्रत्नं माणिक्यं गर्भे यस्य सःतथोक्तस्तं गणनायकं विघ्नेश्वरंच ॥

अशी हा ग्रंथ तयार करणारे कवींनींच संस्कृतांत एक टीका लिहिलेली आहे. शिवाय या चंद्रमौलीश्वर लिंगाचा विषय याच काव्यांत ६ व्या सर्गांत आलेला आहे. हे ग्रंथकर्ते ग्रंथाच्या प्रारंभीः—

प्रायेणान्वयमात्रेण व्याख्यायत इयं कृतिः ॥
प्राचामसम्मतं नैव लिख्यतेऽत्र नचाधिकं ॥

अशी प्रतिज्ञा करून 'प्राचीन ग्रंथांना संमत असलेला विषयच लिहितों' असें सांगितल्यावरून शंकराचार्यांच्या विषयासंबंधीं प्राचीन ग्रंथांत चंद्रमौलीश्वरलिंगप्रदानविषय स्पष्टपणें लिहिला गेला आहे,

असें दिसून येतें. शंकराचार्यांच्या विषयांतः—‘ बृहच्छंकर विजय ’ नांवाचा ग्रंथ प्राचीन पंडितांकडून लिहिला गेला आहे असें त्या ग्रंथांत रेवणसिद्ध व शंकराचार्य यांचा संवादरूपी ‘ सिद्धसंकर संवाद ’ नांवाचा भाग आहे असेंही ऐकतो.

मद्रास गव्हर्नमेंटचे सीनियर ट्रान्सलेटर म. रा. बी. रामराव एम्. ए. एल्. एल्. बी. आणि मद्रास गव्हर्नमेंट ओरिएंटल लायब्ररीचे अ. व्यवस्थापक म. रा. विद्वान् पी. सुंदर शास्त्री यांनीं ‘ शिवतत्त्व-रत्नाकर ’ नांवाचा उद्ग्रंथ देवनागरी लिपींत छापवून तो म्हैसूरचे श्री मन्महाराजांना अर्पण केला आहे. या ग्रंथांतील चौथ्या कल्लोलाच्या (भागाच्या) १२ व्या तरंगांत विद्यारण्यांचा विषय लिहितांनाः—

ततःस रेवणासिद्धसंप्रदाय प्रवर्तिनां ।
शंकराचार्यवर्याणां पारंपर्यक्रमागतं ॥ ९ ॥
संन्यासिनमुपाश्रित्य विनयावनतोऽधिकं ।
वृत्तांतमखिलं तस्मैयतयेस्वंव्यजिज्ञपत् ॥ १० ॥

म्हणूनः—

रेवणासिद्धं संप्राप्तं चंद्रमौलीशमप्यदात् ।
आख्यच्चानेन लिंगेन तवाभीष्टाप्तिरित्यपि ॥

असें लिहिलेलें आहे. या १२ व्या तरंगावरून शिवधर्म नांवाचा एक ब्राह्मण दारिद्र्याच्या दुःखामुळें रेवणसिद्धाचे सांप्रदायी असलेले श्रीशंकराचार्य यांचे पीठाला अधिपति झालेले विद्याशंकर-

तीर्थस्वामी यांचेकडे येऊन आपली वस्तुस्थिति निवेदन केल्यानंतर श्रीस्वामींनीं त्यांना श्रीचक्राचा अनुग्रह करून त्याची पूजा करण्यास आज्ञा केली. श्रीचक्रपूजेच्या सामर्थ्यानें तो (शिवधर्म) महाज्ञानी होऊन त्या स्वामींकडून संन्यासदीक्षा घेऊन विद्यारण्य नांवांनीं प्रसिद्ध झाल्यामुळें श्री स्वामींनीं आपल्या त्या विद्यारण्य शिष्याला—आरंभीं श्रीरेणुकाचार्यांकडून श्रीशंकराचार्यांना प्राप्त होऊन गुरु-परंपरेनें आलेलें चंद्रमौळीश्वर लिंग देऊन 'तूं या लिंगाची पूजा करीत जा म्हणजे तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील.' अशी आज्ञा केली; हें दिसून येतें.

श्रीरेणुकाचार्यांचें चरित्र अनेक कवींनीं लिहिलें असलें तरी त्यांच्या सर्व लीलांचें यथोचित वर्णन कोणत्याही ग्रंथांतून केलेलें नाहीं. बंगलोर जिल्यांतील क्लोसपेठ तालुक्यांत या महात्म्याच्या नांवानें 'रेवणसिद्धेश्वर बेट्ट (डोंगर), म्हणून पवित्र पर्वत शोभत असून त्यावरील स्वामींच्या देवालयाची व्यवस्था म्हैसूर सरकारच्या खास आज्ञेनें उत्तम तऱ्हेनें ठेवली जात आहे, तुमकूर जिल्ह्यांत 'सिद्धर बेट्ट' नांवाचा पर्वतभाग या महात्म्याच्या पवित्र वसतिस्थानानें शोभत आहे, सातारा जिल्ह्यांतील विटे तालुक्यांत असलेल्या 'रेणावी' नांवाच्या गांवी या महात्म्याच्या नांवाचें एक मोठें देवालय असून तें पवित्र क्षेत्र म्हणविलें जातें. गुलबुर्गा जिल्ह्यांतील 'रेवगी' गांवांत गुरुसार्व-भौमांचें देवालय असून तें महाक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. कोल्हापूर संस्थानांत या महात्म्याच्या पुण्याभिधानानें रेवणसिद्धन गुड्डा (रेवण-सिद्धाचा डोंगर) म्हणून पर्वत विराजमान आहे. हें पवित्र क्षेत्र

बेळ्ळद बागेवाडी स्टेशन पासून १२ मैल लांब आहे. सोलापुरांत या महात्म्याचे नांवानें रेवणसिद्धेश्वर नांवाचें एक पवित्र देवस्थान आहे. इत्यादि अनेक पुण्य ठिकाणें कर्नाटक व महाराष्ट्र या प्रांतांत विराजमान् आहेत. याप्रमाणें आंध्र (तेलंगण), द्रविड, कोंकण इत्यादि भागांत या महात्म्याच्या नांवाचीं अनेक प्रसिद्ध क्षेत्रें असल्याचें सर्व प्रसिद्ध आहे.

वर सांगितलेल्या ठिकाणीं या महात्म्यांच्या घडलेल्या लीला यांच्या कोणत्याही चरित्रग्रंथांत स्पष्ट झालेल्या नाहींत.

अनेक कानडी कवींनीं या गुरु सार्वभौमांचें चरित्र लिहिलें असलें तरी त्यांनीं आपापल्या मनास वाटेल तसें वार्धिकषट्पदी-रूपानें सांगत्यरूपानें रगळेरूपानें लिहिलेलें आहे. त्यामुळें खऱ्या वस्तुस्थितीचें दिग्दर्शन होत नाहीं तें व्हावें व खरी वस्तुस्थिति दिसून यावी या उद्देशानें त्यांच्या त्या त्या पवित्र ठिकाणीं संचार करून त्या त्या ठिकाणीं असलेल्या स्थानिक पुराणांचें संशोधन करून वे. पं. काशीनाथ शास्त्री यांच्या मिळविलेल्या माहितीप्रमाणें वे. मू. नंजनगूड महाकवि श्रीकंठशास्त्री यांनीं गायनास योग्य अशा भामिनीषट्पदीछंदांत ‘श्रीरेणुक विजय पुराणं’ नांवाचें मनोहर सुरस पुराण रचलें आहे. त्यांत गुरु सार्वभौम श्रीरेणुकाचार्य यांच्या लीला यथार्थ वर्णिलेल्या आहेत.

हें तेलगू व कानडींतून असलेलें वीरशैव धार्मिक वाङ्मय मजसारख्या महाराष्ट्रियाला अगदींच पारखें झाल्यामुळें तें मराठींत कसें येईल? हा प्रयत्नानें मराठींत आणल्यास तें महाराष्ट्रीय सर्व वीर-

शैवांकरितां न होतां स्वतांपुरतेंच होईल. तसें न होतां तें सर्वोपयोगी कसें होईल? अशा अडचणींचा डोंगर पुढें उभा राहिला. परंतु 'सत्य संकल्पाचा दाता भगवान्' संताच्या या उक्तीप्रमाणें परमपूज्य ष. ब्र. चन्नवीर शिवाचार्य स्वामी बृहन्मठ होटगी यांची वीरशैव समाजाविषयींची कळकळ जाणून भक्तीनें अतिशय उचंबळलेले धर्मवीर, दानशूर, श्रीमंत शरणप्पा अण्णा फत्तेपूर, दुबलगुंडी यांनीं वीरशैव धर्मग्रंथांचे छपाईकरितां उदार अंतःकरणानें वीस हजार रुपयांची देणगी दिल्याचें वृत्त कळतांच मला मोक्षपदापेक्षांही अधिक आनंद झाला. कारण मोक्षानंद हा मोक्षपद प्राप्त होणारालाच असतो, परंतु या देणगीचा आनंद मलाच नसून तिच्याद्वारा या महाराष्ट्र भाषेंत छापल्या जाणाऱ्या वीरशैव धर्मग्रंथ वाङ्मयानें महाराष्ट्रीय सर्व वीरशैव वाचकांनाही तो होईल. यामुळें मला समाजसेवा करण्याची सुवर्णसंधी पण मिळेल, अशाप्रकारचा आशांकुर उत्पन्न झाला.

याप्रमाणें उद्भवलेल्या आशांकुराच्या वाढीचे प्रयत्नाकरितां परमपूज्य श्री ष. ब्र. चन्नवीर शिवाचार्य स्वामी बृहन्मठ होटगी यांचेकडे जाऊन माझा वरील उद्देश त्यांना निवेदन केला व त्यांचेकडून वे. मू. साहित्यरत्नम् पंडित जगदीशशास्त्री नालवार यांनीं संस्कृतांत रचलेल्या श्री चन्नबसव विजय नांवाच्या पुराणाचें मराठींत भाषांतर करण्यास त्यांची आज्ञा झाली. सदर मराठी भाषांतर करण्याचेंकामीं पं. जगदीशशास्त्री यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन मला सदर संस्कृताचा अर्थ कानडींत सांगून त्याचा मराठींत अनुवाद केल्यानंतर तो यथार्थ झाला तरच ते पुढील श्लोकास हात घालीत, याप्रमाणें मजकडून

समाजसेवेचें काम अत्यंत सुलभतेनें करून घेतलें. अशा प्रकारें आशांकुर वाढीस लागून श्री ष. ब्र. चन्नवीर शिवाचार्यस्वामी बृहन्मठ होटगी व पंडित जगदीशशास्त्री नालवार यांच्या कृपाशीर्वादरूपी पोषक द्रव्यांनीं त्याचें धर्मवीर ग्रंथरत्न मालेचें प्रथमरत्न श्री चन्नबसव विजय पुराणाचें मराठी टीकारूपी प्रथमपुष्प शके १८६४ च्या माघ शु॥ ७ स रथसप्तमीचे शुभमुहूर्तावर विकसित झालें.

श्री. होटगी स्वामींच्या द्वितियाज्ञेप्रमाणें वे. मू. नंजगूड महाकवि श्रीकंठशास्त्री यांनीं रचलेल्या श्री रेणुक विजय पुराणाचें मराठींत अनुवाद करण्याचें काम हातीं घेऊन वे. मू. पंडित जगदीशशास्त्री नालवार यांच्या पूर्ण मदतीनें प्रस्तुतचें श्री रेणुक विजय हें द्वितिय पुष्प–सदर ग्रंथ मालेचें द्वितिय रत्न म्हणून–विजयादशमीचे शुभमुहूर्तावर विकसित होत आहे.

सदर दोन्ही पुस्तकांतून त्या त्या महात्म्यांचीं नुसतीं चरित्रेंच नसून वीरशैव म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आचार विचार कसे असावेत, याबद्दल साधार व सकारण पण सहजगम्य अशी माहितीही दिलेली आहे.

शेवटीं प्रस्तुत पुस्तकास आधारभूत अशा कानडी रेणुक विजय पुराणाचे कर्ते वे. मू. नंजगूड महाकवि श्रीकंठशास्त्री यांच्या सदर पुराणाचा अत्यंत उपयोग झाला म्हणून त्यांचा—

आशांकुरास प्रोत्साहन देऊन वाढीस लावलेल्या परमपूज्य श्री ष. ब्र. चन्नवीर शिवाचार्य स्वामी बृहन्मठ होटगी यांचा व पूर्ण

वाढ करून वीरशैव समाज सेवेस योग्य अशीं वरील पुष्पें तयार करण्यास मदत केलेले वे. मू. साहित्यरत्नम् पं. जगदीशशास्त्री नालवार श्रीमद्वीरशैव गुरुकुल प्रधानाध्यापक सोलापूर यांचा—

सूर्यविकासी कमळें ज्याप्रमाणें प्रत्यक्ष सूर्यदर्शनावांचून पूर्णपणें विकास पावूं शकत नाहींत व दरवळूं शकत नाहींत, त्याप्रमाणें वरील माझ्या प्रयत्नरूपी तयार झालेल्या कळ्यांचा पूर्ण विकास होऊन त्यांतील वीरशैव धर्म मकरंद चाखूं इच्छिणाऱ्या वीरशैव भ्रमरांना तो चाखतां येण्यास, श्री बालतपस्वी कृपापोषित धर्मवीर दानशूर, श्रीमंत शरणप्पाअण्णा फत्तेपूर दुबलगुंडीरूपी सूर्याकडून, सदर कार्यास अत्यंत उदार अंतःकरणानें किरणरूपी द्रव्यनिधीचें सहाय्य झाल्यामुळें प्रस्तुत पुस्तकांतील विषय सूर्यप्रकाशरूपी मुद्रणानें अत्यंत सुलभ झाला आहे म्हणून त्यांचा—

वे. मू. पंडित काशीनाथ शास्त्री नागनूर बृहन्मठ यांनीं आपल्या ग्रंथमालेंतील अष्टादशपुष्प रेणुक विजय महापुराणाचें मराठी भाषांतर करण्यास उदार अंतःकरणानें परवानगी दिली व सदर पुस्तकांत घालण्यांत आलेले श्री रेणुकाचार्यांच्या लीलांचे फोटो त्यांनीं स्वतां मुद्रण करून विनामूल्य पाठवून देऊन आंतील विषयाभिरुची वृद्धिंगत केली यांबद्दल त्यांचा—

सदर पुस्तकाच्या मुखपृष्टावरील श्रीमंत शरणप्पाअण्णा फत्तेपूर यांच्या फोटोस उत्तम प्रकारें झालेलें ब्लॉकचें नक्षीकाम एथील वे. मू.

बाळय्यास्वामी किणीकर यांनीं अतिशय काळजीपूर्वक व सुबक करून दिलें म्हणून त्यांचा—

लेखक अत्यंत ऋणी आहे.

आपला

सिद्रामय्या शिवय्या जंगम (पाकणीकर)

अध्यक्षः—**श्रीमज्जगद्गुरु रेणुकाचार्य संघ सोलापूर,**

हेडमास्तर—म्युनिसिपल मराठी शाळा, सोलापूर.

विषयानुक्रमणिका.

(४) चतुर्थ मंजरी–

(५) पंचम मंजरी–



श्री जगद्गुरु शिवानंद राजेंद्र शिवाचार्य महास्वामी
बाळेहोन्नूर सध्याचे पिठालंकृत.



श्री. पंडीत काशीनाथ शास्त्री.

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ॥



श्री रेणुक विजयः

प्रथम मंजिरी.

जीयाच्छ्री रेणुकाचार्यः शिवाचार्य शिखामणिः ।
यो वीरशैव सिद्धान्तं स्थापयामास भूतले ॥

या भूतलावर वीरशैव सिद्धांताची स्थापना करणाऱ्या शिवाचार्यांतील प्रमुख अशा श्रीरेणुकाचार्यांचा जयजयकार असो.

वन्दे ब्रह्माच्युतेन्द्राद्यमर मुकुटरत्न प्रभासंवृताङ्घ्रीम् ।
सर्वज्ञत्वादिशक्त्याश्रयमतुल परानंद सांद्र स्वरूपम् ॥
नंदीशाद्यैर्गणेशैरमित महिमभिर्वीर माहेश्वरैःस्तैः ।
सेव्यं सांभं महेशं श्रुतिनिचयनुतं शुद्ध वागर्थ सिध्द्यै ॥१॥

श्रीमत्कैलासपर्वतावर वीर, नंदी, भृंगी, वृषभ, स्कंद वगैरे प्रमथवर्यांकडून सेविला जाणारा, दिव्य रत्नांनीं मंडित अशा सिंहासनावर आरूढ झालेला, दुर्वास, अत्रि, भरद्वाज वगैरे वीरमाहेश्वर

मुनिवर्यांकडून ध्यान केला गेलेला, सर्वज्ञत्वादि सहा गुणधर्मांनीं सुशोभित, निरुपमानंदस्वरूपी, नित्यशुद्ध, नित्यमुक्त, मुक्तिसाम्राज्याधिपति, भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारा; ब्रह्मा, विष्णु इत्यादि तेहतीस कोटी देवतांच्या मुकुटांतील रत्नांच्या तेजानें जिचे चरणकमल प्रकाशित होतात अशा उमेसहित महेश्वराला-श्रीमज्जगद्गुरु रेणुकाचार्यांचे असाधारण महिमाशाली चरित्राचें वर्णन करतांना माझ्या तोंडांतून निघणाऱ्या शब्दसमुच्चयाचे अर्थशुद्धीसाठीं-मी वदंन करतों.

ये वांछन्तीष्ट सिद्धिं जगति पशुपते त्वां विनान्यैः कुदेवैः ।
शुष्काभ्यो वालुकाभ्योऽप्यमलतिलरसं ते विमूढालभेरन् ॥
पश्येयुर्वाजिशृंगं मरुभूमिसलिलं साधयेयुःसलीलम् ।
वर्णानभ्रेलिखेयुः स्फुटमतुल पटान् कूर्म रोम्णात्रयेयुः ॥२॥

प्रमथश्रेष्ठ अशा हे गणपते, या जगांत तुझ्याशिवाय इतर कुदेवतांकडून जे लोक आपले मनोरथ पूर्ण करून घेऊं इच्छितात, ते मूर्खलोक-कोरड्या वाळूंमधून शुद्ध तिळाचें तेल मिळवूं इच्छिणाऱ्या, घोड्याचें शिंग पाहूं इच्छिणाऱ्या, सहजासहजी मरु (वाळू) भूमींत पाणी मिळविण्याची अपेक्षा करणाऱ्या, आकाशांत अक्षरें लिहूं इच्छिणाऱ्या अथवा मोठमोठीं वस्त्रें कासवाच्या केसांनीं विणूं इच्छिणाऱ्याप्रमाणें-हास्यास्पद होतात. करितां हे विघ्नेश्वरा ग्रंथ समाप्तीसाठीं तुझी कृपाच मुख्य असल्यामुळें ग्रंथारंभीं काया, वाचा, मनेंकरून तुझी स्तुती करतों.

शैलाधीश्वर भूरिभाग्यलहरी भक्तौघ संपत्करी ।
या त्रैलोक्य शिवंकरी कालिमल प्रत्यक्ष पाटच्चरी ॥
पादांभोजनतामरीसुमशर प्रत्यर्थिचेतोहरी ।
सा साक्षात्परमेश्वरी दिशतुनः कल्याण पारंपरीम् ॥३॥

पर्वतश्रेष्ठ हिमालयाला विशेष भाग्य स्वरूप असलेली, भक्तसमूहाचे वैभव वाढविणारी, त्रैलोक्यांचें कल्याण करणारी, कालियुगांतील दोषांचें प्रत्यक्ष हरण करणारी; लक्ष्मी, सरस्वती व शचि या देवतांकडून जिचे चरणकमल वंदिले आहेत अशी, मदनसंहारकाचेंही मन हरण करणारी, त्रैलोक्याची माता अशी साक्षात् परमेश्वरी पार्वती, श्रीजगद्गुरु रेणुकाचार्यांचा महिमा गाण्यास तयार झालेल्या माझ्यासारख्या अल्पमती माणसाला मांगल्याची परंपराच देवो.

पूर्वं सृष्टिसमुद्भवात्परशिवादुद्भूय सद्वैभवात् ।
सिद्धान्तं श्रुतिसिद्धमद्भुततमं संस्थाप्य संविश्रुताः ॥
सिद्धस्तोम सुरद्रुमाः सुरवरैः संसेव्यमानाः सदा ।
पंचाचार्य गुरूत्तमाः स करुणं सिद्धिं वितन्वन्तु मे ॥४॥

सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीं परशिवापासून सद्वैभवानें उत्पन्न होऊन, अद्भुत व श्रुतिप्रणित वीरशैवसिद्धांत प्रस्थापित करून जे नामांकित झाले, जे सिद्धांनीं स्तविलेल्या कल्पवृक्षाप्रमाणें आहेत व जे देवाधिदेवांकडून नेहमीं सेविले जातात ते गुरुश्रेष्ठ पंचाचार्य माझ्यावर कृपा करून सिद्धि देवोत.

अणिमादि अष्टैश्वर्यसंपन्न, कोल्लीपाकी क्षेत्रांतील सोमेश्वर लिंगांतून ज्यांचा उद्भव झाला आहे; बिभीषण, विक्रमार्क, नीलगल वगैरे सार्वभौमांकडून ज्यांचे चरणकमल पूजिले गेले आहेत, वसिष्ठ, वामदेव, अत्रि, भरद्वाज, दुर्वास वगैरे महान् ऋषिजनांकडून ज्यांचा महिमा गाइला गेला आहे; प्राणीमात्रांची उत्पत्ति, लय, गमन, आगमन वगैरे षड्गुणांची सिद्धि असलेले; तपस्वीजनांचें आश्रयस्थान; सत्पुरुषांचा उद्धार करणारे; शक्तिविशिष्टाद्वैतमताची प्रतिस्थापना करणारे; शिवज्ञानानंदघन; अतिवृष्टि अनावृष्टि वगैरे आपत्तिरूपी पर्वतांना वज्रायुधासारखे; शमदमादि सद्गुणांचा सांठा असलेले, दिव्य शरीरधारी, वर्णाश्रमधर्म संस्थापक, वेदमयशरीरी, गुरुजंगम सार्वभौम, प्रमथश्रेष्ठ अशा रेणुकाचार्य नामक गुरुवर्यांचे चरणकमल योग्य प्रकारें इष्टार्थसिद्धि करून देवोत.

अल्पविचारी व मंदमति असा मी, अतिशय महिमाशाली अशा श्रीमद्रेवणसिद्धयोगीश्वरांचा चरित्रसागर अल्पबुद्धीच्या नावेनें तरून जाण्याचा प्रयत्न करीत आहें;! हें खरें. तरीपण कोट्यावधि ब्रह्मांडांची उत्पत्ति, स्थिति, लय करणाऱ्या त्या परमेश्वराच्या कृपाकटाक्षानें असाध्य असें काय आहे? (कांहीं नाहीं.) (श्रीरेणुकाचार्यांचें अगाध चरित्र रचण्यास मी जरी असमर्थ असलों तरीही जगन्नियामक शिवाच्या अनुग्रहानें हें चरित्र लिहून खास पूर्ण करीन.)

भूलोक, भूवर्लोक, वगैरे चतुर्दश लोकांना आधार असलेला; दिव्य तेजानें युक्त; बत्तिसकोटी योजन प्रमाण वलयांकित; गगन-

चुंबित शिखरांनींयुक्त; योगिजनांच्या ज्ञानदृष्टीलाच मात्र गम्य; चंद्र-मौलीश्वराचें संचारस्थान असा पूर्णवैभवशाली व भव्य कैलासलोक, ब्रह्मांडाच्या अग्रस्थानीं शोभायमान झालेला आहे.

तेथें आत्मानंद सेवन करणारे; परशिवाचे ध्यानांत मग्न असलेले; अंडज, उद्भिज, स्वेदज, जरायुज वगैरे चतुर्विध प्राणिमात्रांच्या संरक्षणाचा विचार करीत असलेले, धर्मस्वरूपी सदाचरणांत विख्यात् असलेले; कामक्रोधादि षड्रिपूंच्या बाधांतून मुक्त असलेले; श्रद्धा—भक्तीनें शिवचरणांचें पूजन करणारे, वीरशैवाचारयुक्त; निरुपम-आनंदयुक्त असे प्रमथश्रेष्ठ वास करतात.

या कैलास लोकांच्या पूर्वेस एक लाख योजन विस्तीर्ण असलेल्या ऋग्वेदमय महाद्वाराच्या पुढील भागांत वेदिका असून तिच्यावर चंद्रकांतमय गुळगुळीत दगड आहे. त्यावर हातांत झगझगीत रौप्य-दंडधारण करून द्वारपालक नंदिकेश्वर बसला असून तो आपापल्या अधिकारावरून निवृत्त होऊन विश्रांतिसुख घेत असलेल्या व महोत्सवकालीं जगत्पति महादेवाच्या दर्शनासाठीं समूहानें आलेल्या ब्रह्मवृंदाला व इंद्रादि अनेक देवतांना केवळ नेत्रकटाक्षानेंच जेथल्या तेथें थांबवीत होता.

या कैलास लोकाच्या दक्षिणेस एक लाख योजन विस्तीर्ण यजुर्वेदमय गोपुरयुक्त अशा महाद्वारांत दक्षब्रह्माच्या यज्ञाचा नाश करण्याचा संकल्प केलेला; ज्याच्या नामस्मरणानें सर्व पापांचा नाश होतो; कोटीसूर्यसम तेजस्वी; भद्रकालीचा प्राण-वल्लभ असा श्रीवीरभद्र हात जोडून उभा आहे.

कैलास लोकाच्या पश्चिमेस एक लाख योजन विस्तीर्ण सामवेदमय शुभ्रवर्णाचा महाद्वाराचे अंगणांत पशुपति वगैरे हजारों रुद्रांचा प्रमुख नीललोहित महारुद्र प्रकाशत होता व उत्तरेस एक लाख योजन विस्तीर्ण अथर्वणवेदमय महाद्वारांत असंख्य प्रमथगणांचा नायक महाकाल हात जोडून उभा आहे.

अशा या कैलास लोकांच्या मध्यभागीं पाचूचें सिंहासन शोभत असून त्याच्या चारी कोपऱ्यांस चार वज्रस्तंभ आहेत. त्यावर इंद्रनील मण्यांच्या चार कमानी असून त्यांचे चारी कोपऱ्यांस बसविलेले पुष्यरागाचे चार सिंह असून या सिंहाचे तोडांत लोंबत असलेल्या दिव्य मोत्यांचे घोश शोभायमान् दिसत होते. या सिंहासनाच्या मध्यभागीं—पहाणाऱ्यांचें मन व नेत्र आकर्षित करणारा परमेश्वराचा मुख्य मंडप प्रकाशत होता. या मंडपाचे मध्यभागांत पद्मराग, वज्र वैडूर्य वगैरे अनेकविध अमूल्य रत्नांनीं मंडित; आदिशेष ज्याचें देंठ आहे; विद्याधिदेवता ह्या ज्यांतील केसर आहेत व जे सूर्य, चंद्र, अग्नि यांप्रमाणें तळपत आहेत असें अष्टदलकमलपीठ आहे.

या कमलपीठावर कोटी सूर्यप्रभासम तेजस्वी; कोटी चंद्रांप्रमाणें सौम्यकांतियुक्त; सनक सनातन सनत्कुमारादि ऋषींच्या ज्ञानदृष्टीला गोचर, भक्तांचे अध्यात्मिक आदिभौतिक व आधिदैविक तापत्रय हारक; आदिशेष हेंच यज्ञोपवित धारण करणारा; पंचमुखी, दशनेत्रधारी; स्फटिकाप्रमाणें शुभ्रकांतियुक्त त्रिशूल, डमरू वगैरे अनेकविध आयुधें दाही हातांत धारण करणारा, मस्तकावर चंद्र, जटेंत गंगा, कपाळावर अग्निनेत्र, देहावर गजचर्म, भस्माचे त्रिपुंड्र, कंठी रुद्राक्षांच्या

माला व गळ्यांत सर्पधारण करणारा, श्रीपरशिवस्वामी सकललोकोद्धार सूचित स्मित करीत बसलेला आहे. या देदिप्यमान् कमलपीठाच्या एका बाजूस मंत्राची अधिदेवता श्रीगणेश; दुसऱ्या बाजूस षण्मुख; मागील बाजूस श्वेतछत्रधारी गायत्री व पीठाचे अग्रभागीं पार्वती बसली असून परमेश्वराचें तें वैभव अनिमिष नेत्रांनीं कितीही पाहिलें तरी तृप्ति न झालेली ती अर्धांगी शिवाच्या अतिरम्य शरिराकडे पहातच राहिली.

तेथें खरोखरच श्रुति-वचनें प्रसवणारी सावित्री सुवर्णदंडाचें छत्र घेऊन उभी होती; गंगा, गोदावरी वगैरे तीर्थ-देवता रत्नखचित सुवर्ण पादुका आपापल्या हस्तकमलांत घेऊन परमेश्वरांचें सभांगण पवित्र करीत होत्या; नंदीश्वर, दुंडी, महाकाळ वगैरे प्रमथ-पुंगव आपापल्या असंख्य परिवारांसह शिवदर्शनोत्सुक होऊन शिवदर्शनाची वाट पहात होते; दिवांधमुख, शरभमुख, शार्दुलमुख, सिंहमुख, अश्वमुख वगैरे भूत-गण तेथें होता; सात्विक भक्तीनें अनेक शिवस्तोत्रें रागालापयुक्त गाणारे नारदादि मुनीजनही तेथें होते; गोकर्ण, सूरघोश, कुंभोदर, सूर्यपातन सोमपातन वगैरे प्रमथ-श्रेष्ठ तेथें होते; ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद यांचे पठण एकसमयावच्छेदें करीत असलेला ब्रह्मवृंद तेथें होता, परमेश्वराच्या सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान या पंचमुखांतून उत्पन्न झालेले रेणुक, दारुक, घंटाकर्ण, धेनुकर्ण विश्वकर्ण हे पंचाराध्य तेथें होते; कालाग्निरुद्र, ईशान, कालांतक, महाशंख, बलविकर्ण, बलचंडेश वगैरे महाप्रमथ तेथें होते; शंख, चक्र, गदा, पद्म, श्रीवत्स, कौस्तुभ वगैरे अलंकार धारण

केलेली लक्ष्मी व तिच्या बरोबर—उमललेल्या कमलाप्रमाणें विशालनेत्री काळमेघवर्णशरीरी सप्तकोटी महामंत्रांत श्रेष्ठ असलेल्या प्रणवसहित पंचाक्षर मंत्राचा जप करीत असलेले भक्तियुक्त असे अनेक नारायण तेथें होते. अशावेळीं सभांगणांत शिवदर्शनोत्सुक होऊन जमलेल्या देवांना उद्देशून "यावेळीं शिवदर्शनाला समय नाहीं, चला, आणखी केव्हांतरी या, असें उगीच गर्दी करून उभे राहणें अनुचित होय" असें कठोरपणानें कंकाळधर, भीम, महाकाल वगैरे द्वारपाल ह्मणत होते, त्यावेळीं नाट्यशास्त्रांत प्रविण असे भृंगी व रिटी हे वाजवित असलेल्या मृदंगाचे तालावर रंभादि अप्सरा रागालापयुक्त गान करीत नाचत होत्या, व लिंगांगसामरस्यबोधक नाटकही परमेश्वरापुढें चाललें होतें हें सर्व पाहून जमलेला समाज चित्रांतील बाहुल्याप्रमाणें जेथल्या तेथें स्तब्ध व स्थिर झालेला दिसत होता.

नाट्यशास्त्रविशारद भृंगीनें तत्वमस्यादि महावाक्यांचें इंगित सूचक व लिंगांगसामरस्यबोधक हृदयंगम असें नाटक चालविलें असतां लीलाविग्रहदेहधारी महादेव संतुष्ट होऊन त्यांनीं जवळच बसलेल्या प्रमथ श्रेष्ठांतील पंचाचार्यांपैकीं श्री रेणुकगणाधीश्वरांना नेत्रकटाक्षानें समीप बोलावून पुढीलप्रमाणें आज्ञा केली.

"माझेच प्रतिस्वरूप असलेल्या रेणुकगणाधीशा, सप्तद्वीपांमध्यें सुप्रसिद्ध असलेल्या जंबुद्वीपांत अतिशय वैभवशाली असा त्रिलिंग (तैलंग) नामक एक देश आहे. त्या देशांतील कोल्लीपाकी नामक दिव्य क्षेत्रांत विराजत असलेल्या श्री सोमेश्वर लिंगांतून तूं अवतरून परममोक्षसाधक अशा वीरशैव मताला ग्लानी आली असल्यामुळें

तें मत सर्वतोमुखीं होईल अशा रीतीनें त्याची वृद्धि कर. तूं मम-मुखांतून उत्पन्न झालेला आहेस, परंतु पंचभूतात्मक शरीर, अत्यंत परिशुद्ध आत्म्यालाही मोहांत पाडणारें असल्यानें तुझी ज्योति-रूपा-नेंच-तसें मोहजनक असें स्थूल शरीर धारण न करितां नित्यानंदाला विरोध नसणाऱ्या तुझ्या सोमेश्वर लिंगांतून—अवतरून ठिकठिकाणीं संचार करीत तुझा महिमाप्रभाव भूलोकावरील जनतेला दाखवीत वीरशैव सिद्धांताचा प्रसार करून सातशें वर्षें गुप्तपणें व सातशें वर्षें प्रगटपणें भूलोकावर संचार करून वीरशैव सिद्धांताचा प्रसार कर; आणि माझ्या भक्तांचे हृदयक्षेत्रांत माझे स्वरूपसाक्षात्काराला साधन असें शिवमंत्ररूपी बीजारोपण करून माझें समग्र रूप ह्मणजे इष्टलिंग त्यांचे आंगावर धारण करवून व माझे स्वरुपाचा साक्षात्कार करून देणारा शिवमंत्र देऊन, आणि शिवस्तोत्राचें रहस्य सांगून (भाष्यादिकांच्याद्वारा प्रचार करून) शाश्वत असा कीर्तिध्वज भूलोकावर उभारून परत माझे-प्रत येऊन मीळ." अशी परमेश्वरानें श्री रेणुकाचार्यांना आज्ञा केली.

मातीचें बनविलेलें मडकें जसें मातीशिवाय निराळें असूं शकत नाहीं तद्वत् परशिवापासून पंचाचार्य उत्पन्न झाल्यामुळें शिवस्वरूपीच असलेले रेणुकगणाधीश्वर निखिल लोकोद्धारक व परमकृपाळू अशा परमेश्वराची वरील प्रकारची आज्ञा शिरसावंद्य मानून वेदागमोप-निषदांतून सांगितलेलें व विष्णू ब्रह्मादि देवतांकडून सन्मानिलेलें शक्ति-विशिष्टाद्वैतमत भूलोकांत सिथिल झाल्यामुळें त्या वीरशैव सिद्धांताचा प्रचार करण्यासाठीं आनंदित मनानें कैलास सोडून निघाले.

कैलासानंतर वैकुंठलोक, सत्यलोक, स्वर्गलोक, ध्रुवलोक, सूर्यलोक, चंद्रलोक वगैरे देवलोक हे सर्व वायुवेगानें व मनोवेगानें (वायुवेगापेक्षांही जास्तवेगानें) ओलांडित समुद्राचे शेवटीं भूमंडल-रूपी—कमलाच्या मध्यभागीं कर्णिकेप्रमाणें शोभणारा—मेरू पर्वत रेणुकाचार्यांनीं पाहिला.

त्या पर्वतश्रेष्ठाच्या दाक्षिणेस अंग, वंग, कलिंग, काश्मिर वगैरे अनेक देश पहात पहात—अतिमनोहर अशा मोठमोठ्या शहरांनीं व्याप्त, लहान लहान खेडीं, अग्रहार व इतर वस्तींनीं गजबजलेला; केळी, आंबा, फणस, नारळ, जांभूळ वगैरे फळांनींयुक्त अशा विशेष वृक्षांनीं, व या फळांच्या रसांनींच जणूं काय वाढलेल्या रम्य अशा भाताच्या शेतांनीं आणि या भाताच्या लोंब्या आपल्या चोंचींनीं तोडून त्यांतील रसपान करीत उडत असलेल्या पक्षांमुळें आकाशांतील देवतांच्या गळ्यांत जणूंकाय पांचूच्या मण्याचे हारच घातलेले आहेत असा भास करून देणाऱ्या पोपटांच्या रांगांनीं शोभणारा; त्याचप्रमाणें प्राणी समूहाला भरपूर आनंद देणारा; वैकुंठाच्या रमणीयतेला मागें टाकणारा; अल्कापुरीप्रमाणें ऐश्वर्यशाली; शिवभक्तींचें माहेरघर, सर्व ऐश्वर्यांची खाणच असलेला; भवमोदास्पद असूनही विभव मोदास्पद असलेला; भालेंदु शेखराच्या (शिवाच्या) नगराची जणूं काय प्रतिकृति असलेला; अशा त्रैलिंग देशांत देशिकाग्रणी रेणुकाचार्यांनीं प्रवेश केला.

विहिरी, तळीं, लहान लहान झरे, तलाव व नद्या यांनीं शोभायमान्; फलपुष्पांच्या बागांनीं भरलेला; रंगित व गगनचुंबित

अशा माड्यांनींयुक्त; मधुपान करून मस्त झालेल्या भ्रमरांच्या गुंजारवानें निनादित; वीणा, बांसरी, मृदंग, नगारा वगैरे वाद्यांच्या निनादानें प्रतिध्वनित अशा देवालयांनीं; वेदाध्ययन संपन्न अशा वीरशैव ब्राह्मणांच्या वाड्यांनीं; प्रजारक्षणतत्पर अशा राजांच्या राजवाड्यांनीं शोभत असलेला तो त्रिलिंग देश पाहून रेणुकगणाचार्य विस्मित व आनंद भरित झाले; त्या देशाचें तें अपार वैभव पहात गुरुसार्वभौम श्रीरेणुकगणाधीश्वर आनंदानें चालले असतां त्या देशाची राजधानी व पवित्रक्षेत्रांतील मुकुटमणी अशा कोल्लीपाकी नगरींत त्यांनीं प्रवेश केला.

आंध्रदेश-रूपी कमलाच्या कर्णिकेप्रमाणें असलेली; इंद्रपुरी-प्रमाणें भासणारी; श्रीसोमनाथाच्या रुचिरमंदिरामुळें रमणीय झालेली अशी ती कोल्लीपाकी नगरी त्यांनीं पाहिली. ती नगरी चुना दिलेल्या गगन चुंबित माड्यांनीं; मंगलवाद्यांच्या निनादानें सतत प्रतिध्वनित झालेल्या मंदिरांनीं; वेदाध्ययन संपन्न वीरशैव ब्राह्मणांच्या अग्रहारांनीं; व प्रजाहित–दक्ष व शिवभक्ति धुरंधर अशा नृपांच्या प्रासादांनीं शोभायमान झाली होती.

कोल्लीपाकी क्षेत्राच्या देवालयांतून ब्रह्मचारी शिवभक्तब्राह्मण वेदाध्ययन करीत होते. घरांच्या पुढीलभागीं असलेल्या लहान लहान वृक्षांच्या सावलींतील–स्फटिक दगडांनींयुक्त अशा–ओट्यांवर बसून पद्मिनीसारख्या गृहिणी हावभावयुक्त रागालाप काढून मंजुळस्वरानें गान करीत होत्या. या गानरसानें पल्लवित होऊन फुललेल्या नागकेसर

वृक्षांवर पक्षीगण मुक्त-कंठानें कलकल असा ध्वनी करीत होते. या क्षेत्रांच्या चारी दिशांना असलेल्या महाद्वारांतून हत्तीवर बसलेले द्वारपाल पहारा करीत होते. कोठेंही नजर टाकली तरी आपापल्या कुलधर्माचें पालन करण्यांत मग्न असलेले लोकच दिसून येत होते. सर्वत्र संतुष्ट, ऐश्वर्यशाली, रुद्राक्ष व भस्मधारी शिवभक्तच दिसत होते. ठिकठिकाणीं पुन्नाग, चंपक, जाई, जुई, नागकेशर, चाफा, निशिगंध वगैरे फुलझाडांनीं भरलेलीं उपवनें होतीं. तें क्षेत्र-स्थान कमलांतील कर्णिकेप्रमाणें, मौक्तिकहारांतील पदकाप्रमाणें, स्त्रियांच्या शिरोरत्नाप्रमाणें व भूदेवीच्या कुंकुमतिलकाप्रमाणें शोभत होतें.

त्रैलोक्याचा जनक असलेल्या सोमेश्वराचें निवासस्थान व शिवभक्तांचें भाग्यस्थान अशा त्या पवित्रक्षेत्रांत श्रीरेणुकगणाराध्यांनीं मोठ्या आनंदानें प्रवेश केला. मेरू, मंदर, कैलास वगैरे पर्वत व काशी, कांची, कालहस्त, चिदंबर, रामेश्वर वगैरे क्षेत्रें यांच्यापेक्षां कोल्लीपाकीक्षेत्र अधिक रम्य वाटलें ह्मणूनच कीं काय, सोमेश्वर या नांवानें परमेश्वरानें तेथें निवास केला असें वाटत होतें.

आपली प्रिय मुलगी पार्वती व प्रमथगणांसह जामात परमेश्वर कैलासपर्वत सोडून गेलेले पाहून ठिकठिकाणीं शोधून कंटाळलेला पर्वतराज हिमालय आपल्या परिवारांसह पुंडरिकाक्ष विष्णूंनीं दिलेल्या बातमीवरून कोल्लीपाकी क्षेत्राजवळ येऊन पुत्री आणि जामात यांना पाहून आनंदभरित होऊन तेथेंच राहिला आहे कीं काय असेंच सोमेश्वर मंदिरापुढील पर्वतराजी पाहून वाटतें.

विजय मिळविलेल्यांचें औदार्य; सम्यक्ज्ञानांतील मोक्ष; दिव्यांतील प्रकाश; नीतिधर्मांतील संतोष; रत्नांतील कांति; अग्नींतील उष्णता वगैरे जशी स्वभाविक आहेत, तसेंच कोल्लीपाकीक्षेत्रांत सोमेश्वराचें वास्तव्य स्वभाव-सिद्ध आहे.

दिव्यदेहधारी योगिराज, श्रीरेणुकगणाधीश्वर, मनोहारक व शिवभक्त-मंडित अशा त्याक्षेत्रांत असलेल्या सोमेश्वर मंदिरांत सूक्ष्म-रूपानें प्रवेश करून शांताकार अशी ती लिंगमूर्ति पहात व तिचें ध्यान करीत त्या मूर्तींत प्रवेश करण्याची वाट पहात आनंदसागरांत मग्न होऊन उभे राहिले; त्यावेळीं स्नानादिकांनीं ज्यांचे देह पुनीत झाले आहेत, शरदृतूंतील मेघांप्रमाणें शुभ्रवस्त्रें परिधान केलेले; भस्म-त्रिपुंड्र चर्चित कपाळ, बाहु, कंठ, छाती व हात असलेले; ज्यांच्या वक्षस्थलावर इष्टलिंग व शिवसूत्र आहे; रुद्राक्षधारी, सदाचारी, कर-कमलांत पुजासाहित्य धारण केलेले; पाशुपतादि आगमांत तज्ञ असलेले वीरशैव ब्राह्मण सात्विक भक्तीनें सोमेश्वर मंदिरांत प्रवेश करून अर्घ्यपाद्यादि षोडशोपचारांनीं ईश्वराचें पूजन करूं लागले.

त्याचप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचे समूह; श्रोत्रिय, पुराणिक, शास्त्री, कवि, शिवागमज्ञ व वीरशैवोत्तमलोक त्या शिवलिंगाचेसमोर मुखानें स्तोत्रें पुटपुटत व डोळे अर्धवट मिटून हात जोडून रोमांचित झालेले असे ते ध्यानमग्न होऊन उभे होते.

मृदंग, वीणा, बांसरी वगैरे वाद्यें वाजविणाऱ्या व पदकमलांत नूपुरें घालून नृत्य करणाऱ्या देवदासी वगैरे परमार्थपरगीतें नृत्य-वादनांसह गात होत्या.

कांहीं शिवभक्त—‘ हे परमेश्वरा सोळा वर्षांच्या मार्कंडेय नांवाच्या सद्भक्ताला प्रसन्न होऊन तूं शिवलिंगांतून उद्भवून त्यास पाशबद्ध केलेल्या क्रुर यमाचें गर्वहरण करून त्याचें रक्षण केलेंस व त्याला चिरंजीव केलेस; गिरिराज हिमालयाची मुलगी पार्वती ही उग्र तप आचरून नाशरहित अशा तुझ्याशीं विवाहबद्ध होऊं इच्छित असतां तूं तिला आपली अर्धांगी बनविलीस; दुधाची इच्छा धरून तुझी प्रार्थना करणाऱ्या उपमन्यूला तूं क्षीरसागरच दिलास; याप्रमाणें तुझें दातृत्व, दयाशीलता व भक्ताधीनता आहे ’ याप्रमाणें प्रार्थना करीत होते.

याप्रमाणें देवदासींचें गायन व नर्तन; भक्तजनांचे स्तोत्रपाठ आणि नट व गायकांचें नटन व गायन उच्च स्वरानें चाललें असल्या-मुळें त्याच्या आवाजानें आकाश दुमदुमून गेलें असतां वरीलप्रमाणें पूजिलेल्या सोमेश्वर लिंगांत सूक्ष्म रूपानें प्रवेश करून श्रीरेणुकगणा-धीश्वर हळू हळू वर येऊं लागले. तो अश्रुत व अपूर्वदृष्ट प्रकार आणि कोटीसूर्यप्रकाशमय आश्चर्यकारक अशी ती तेजोमूर्ति पाहून तेथें असलेले सर्वजण भिऊन चित्रांतील बाहुल्याप्राणें तटस्थ झाले.

त्या शिवलिंगांतून एकाएकीं अत्यंत अद्भुत व हजारों सूर्यांच्या प्रभेप्रमाणें तेजस्वी असें कांहींतरी निघत असलेलें ते लोक पहात असतां मस्तकावर लिंग धारण केलेले, शरिरावर ठिकठिकाणीं रुद्राक्ष व भस्म त्रिपुंड्र धारण केलेले, हसतमुख, मस्तकावर जटा व अग्निनेत्र धारण केलेले असे ते श्रीरेणुकगणाधीश्वर पूर्व समुद्रांतून बालचंद्र निघाल्याप्रमाणें सोमेश्वर शिवलिंगांतून वर आले.



श्री जगद्गुरु रेणुकभवत्पादाचे कुल्लयपाक सोमेशलिंगातून अवतार.

त्या महात्म्याच्या शुभोदयामुळें सर्व भूमंडळ पवित्र झालें, त्याच्या चरण स्पर्शानें भूदेवी कृतार्थ झाली त्याच्या दर्शनानें सर्व जीवगण धन्य झाला भूलोकांचें वर्णन याहून अधिक करणें कोणालाही शक्य नाहीं. स्वर्गलोकांतील देवांनीं 'जय जय' ध्वनी करून पुष्पमाला भूलोकावर टाकल्या, देवांगना नर्तन करूं लागल्या, वारा शीतल व सुगंधयुक्त वाहूं लागला, यज्ञ शाळेंतून प्रतिष्ठित असलेले वैतानिक अग्नि प्रज्वलित झाले. आकाश निरभ्र झालें व जलाशय स्वच्छ झाले.

श्रीरेणुकगणाधीश्वर कैलासामध्यें शिवसान्निध्यांत असतांना त्यांनीं हरित भस्म परिधान केलें होतें, ललाट भागीं जो अग्निनेत्र होता, मस्तकावर जो जटाभार होता, अंगावर शुभ्र भस्माचें जें त्रिपुंड्र होतें, हातांत जो धर्मदंड होता, मस्तकावर जें इष्टलिंग होतें, कानांत जीं कुंडलें होतीं तीं सर्व जशींच्या तशींच चिन्हें भूलोकावर शिवलिंगांतून अवतरल्यावरही श्रीरेणुकाचार्यांचे देहावर विराजमान होती.

पापरूपी पर्वतांचें छेदन करण्यांत वज्रासमान, कामिकादि वातुलांत अठ्ठावीस दिव्यागमांतून ज्याची स्तुति आहे, जनन-मरणरूपी संसारसागरांत बुडत असलेल्या जीवांना तारण्यांत जो नौकासमान, सूर्याप्रमाणें तेजस्वी, पाप्यांना शासन करण्यांत यमाप्रमाणें निष्ठुर, वरीलप्रमाणें लिंगोद्भूत, सर्व कर्मांचा ज्यानें निरास केला आहे. सर्जनकर्मांत कमलासनब्रह्मदेवाप्रमाणें प्रवीण; विष्णूप्रमाणें विश्वपालन शील, महारुद्राप्रमाणें संहारक, सर्व विद्येमध्यें सनत्कुमाराप्रमाणें परिणत बुद्धीचा; चंद्राप्रमाणें चंद्रशेखराचे मनास आल्हाददायक; विनायका-

प्रमाणें सर्वविघ्न विनाशक; कुमतांचा नाश करण्यांत अग्नीसम; परमतरूपी पर्वतांच्या खंडनांत वज्रासमान; पापवृक्षांचें छेदन करण्यांत परशुसमान; शिवनिंदकरूपी मेघांना झंजावातासारखा; पाखंडरूपी कुमुदिनींना सूर्यासमान; मांगल्याचें निवासस्थान; अणिमादि अष्टसिद्धींचा सांठा; याचकांना चिंतामणीसमान; वेदागमांचा वेत्ता; सूर्योपनिषद्भाष्यांचा कर्ता; सकळ भुवनांचा भर्ता; सर्व क्लेशांचा हर्ता; शिवकलांना धारण करणारा; शड्रिपूंचा जेता; मुमुक्षुजनांचा नेता; धर्मनियमांचा शास्ता; शठांना शाप देणारा; कैवल्यफलाचा दाता; अधोगती बंद करणारा; लिंगांगसामरस्ययोगाचें सुख चाखणारा; सुजनांचा बंधू; सर्वजनांना संतोष दायक; अपार महिमाशाली असे भगवान् श्रीरेणुकगणाधीश प्रथमारंभीं अगस्ति महर्षींचा उद्धार करण्यास तत्पर झाले.

वज्राचीं कुंडलें ज्याच्या कपाळावर शोभत आहेत; शुद्धशिवसूत्र (यज्ञोपवीत) धारी; कौशेय (रेशमी) कौपीनधारी; पिंगट जटाधारी; नानारत्न वितान (समूह) बद्धमुकुटधारी; पंचसूत्रमय अष्टलिंग ज्यानें मस्तकावर धारण केलें आहे; अशा त्या जगद्गुरुवर्यांस आनंदातिशयानें सर्वांनीं साष्टांग प्रणाम केला.

उजव्या हातांत योगदंड व डाव्या हातांत कमंडलु धरलेल्या गणश्रेष्ठ अशा श्रीरेणुकाचार्यांना तेथें जमलेल्या समुदायानें पाहून अष्टसात्विकभावनायुक्त होऊन 'तुझी प्रभारूपी आकृति शिवलिंगोद्भव व हीं अप्राकृत अशीं शिवचिन्हें पाहून आश्चर्य चकित होऊन तुझें खरें स्वरूप तुझ्याकडूनच समजून घेऊन धन्य व्हावें, या इच्छेनें तूं कोण? लोकविलक्षणपणें असें अवतरण्याचें कारण काय? वगैरेची

माहिती द्यावी.' अशी प्रार्थना करीत असतां कौतुकानें विचारणाऱ्या त्या लोकांना उद्देशून हसत मुखानें दयार्द्र अंतःकरणानें जगद्गुरु रेणुकाचार्य ह्मणाले, "हे शिव-भक्तांनो, तुमची भक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहें तुमच्या इच्छेप्रमाणें मी माझें यथार्थस्वरूप सांगतों लक्ष-पूर्वक ऐका. मला शिवलोकांत शिवाजवळ असणारा रेणुकगणाधीश्वर असें ह्मणतात. कैलासाधिपति शंकर कोणे एके समयीं ज्ञानदृष्टीनें भूलोकावरील समाचार अवलोकून चार्वाकादि, नास्तिकमताच्या वाढी-मुळें शिवमत दिवसेंदिवस क्षीण होत आहे, असें पाहून समोर बसलेल्या मला हे रेणुका, भूलोकावर शिवमत नाश पावत आहे, यापुढें तें समूळ नष्ट होणार, करितां तूं आतांच भूलोकाला जाऊन अज्ञानभरित अशा नास्तिकमताचें खंडन करून माझा अतिशय महिमा लोकांत प्रकटवून, शिवाद्वैतसिद्धांत वेदागमोपनिषत्सूत्रांनीं दृढ करून, पवित्र अशा शिवभक्तीची स्थापना करून, दुष्टांचा संहार व सज्जनांचा उद्धार करून, मोक्षांचें साधन जें क्रियाज्ञानस्वरूप त्याचा मुमुक्षूंना उपदेश करून पुन्हां मजप्रत यावें. अशी आज्ञा झाल्यावरून त्या शिवाच्या आज्ञेनुसार या प्रसिद्ध क्षेत्रांत विराजमान असलेल्या श्रीसोमेश्वर लिंगांतून उद्भवलों आहें. अशा प्रकारें सांगण्यांत आलेलीं प्रसाद वाक्यें ऐकून सर्वजण आनंदित अंतःकरणाचे होऊन श्रीजगद्गुरु रेणुकाचार्यांच्या पदकमलांना प्रणाम करीत अतिशय भक्ति-युक्त अंतःकरणानें हात जोडून नेत्रांतून आनंदाश्रु ढाळीत जयघोषानें त्यांनीं नभोमंडल दुमदुमून सोडलें.

हें रेणुकचरित्र जे कोणी भक्तियुक्त अंतःकरणानें या जगांत ऐकतील, ते बऱ्याच काळापासून संततिविहीन असलेतरी संततिशाली होऊन सुखानें जगतील, आयुष्य संपत आलें असलें तरी आयुष्यवृद्धि होईल; व्याधिग्रस्तांना आरोग्य प्राप्त होईल; दरिद्री असतील ते वैभव-संपन्न होतील; भाग्यशाली असलेले अधिक संपन्न होतील; मूढही पंडित होतील.

श्रीरेणुक विजय प्रथम मंजिरी समाप्त.

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ॥



श्री रेणुक विजयः

द्वितिय मंजिरी.

श्रीरेणुकाचार्यांनीं सोमेश्वर लिंगांतून उत्पन्न होऊन कोल्लीपाकी क्षेत्रांतील शिवभक्तांना शिवतत्वोपदेशानें कृतकृत्य करून मुक्तिभुक्ति-दायक असलेल्या इष्टलिंगाराधनेचा विधि सर्वजनांना दाखविण्यासाठीं दर्भासनावर पद्मासन घालून हात पवित्र करून आचमन, प्राणायाम, तत्वशुद्धि, अंगन्यास, करन्यास, विभूतीधारण, रुद्राक्षधारण वगैरे पूर्वकर्मे समाप्त करूक शिवलिंगाला रुद्राभिषेक करून अर्घ्यपाद्यादि अर्पण केलें व शांताकार अशा शिवलिंगावर निश्चल दृष्टी ठेवून महा-मंत्राचा उच्चार करीत क्रमानें निर्वातजागीं असलेल्या दीपाप्रमाणें निश्चलपणें ह्मणजे इंद्रियव्यापार बंद करून ते ज्योतिर्लिंगांत लीन झाले व ब्रह्मानंदरूपी क्षीरसागरांत पूर्णपणें गढून गेले. नंतर कांहीं वेळानें त्यांनीं समाधि उतरविली. व तर्पणादि करून पुष्पांजली वाहून शिव-लिंगाचें विसर्जन केलें. सोमेश्वर लिंगाची ही अपूर्व महापूजा व श्रीरेणुकाचार्यांचें दिव्यतेज पाहून तेथील लोक रोमांचित झाले व जगन्नायक परमेश्वरच आपल्या उद्धारासाठीं गुरुरूपानें अवतरला

आहे, असें मानून त्यांनीं सोमेश्वरलिंग व रेणुकाचार्य यांना साष्टांग नमस्कार घातला व भक्तियुक्त स्तोत्रें गाइलीं. लीलावतारी श्रीरेणुकाचार्यांनीं त्यांना आशीर्वाद देऊन मलयाचलावरील अगस्ति महर्षींना शिवतत्त्वोपदेश करण्यासाठीं ते आकाश मार्गानें निघाले.

वाटेंत कांची, चिदंबर, कुंभकोण, मदुरा वगैरे प्रसिद्ध शिवक्षेत्रें; गोदावरी, कृष्णा, कावेरी वगैरे नद्या; पुण्यतीर्थें; निरनिराळे देश; अरण्यें; सिद्धाश्रम वगैरे पहात पहात मलयपर्वतावर श्रीरेणुकाचार्य आले.

भयंकर सिंह, क्रूर वाघ, हत्तींचे कळप, लांडग्यांच्या टोळ्या, कोल्हे, उग्र माकडें, गेंडे, अस्वलें, गवे वगैरे वन्य पशूंनीं व अंबा, फणस; नारळ, जांभूळ, बेल, चिंच, साग, वड, पिंपळ, आवळी, अशोक, औदुंबर, स्यंदनाक्ष, चंदन, अकोळ वगैरे वृक्षांनीं अगदीं निबिड बनलेला मलयाद्री रेणुकाचार्यांनीं पाहिला.

कडक उन्हांत प्रसव वेदना असह्य झाल्यामुळें तडफडत असलेल्या सर्पिणीला पाहून आपला वैरभाव विसरून दयेनें आपला पिसारा फुलवून तिच्यावर सावली करणारे मयूर; हत्तींच्या पिलांना—आपलें आजन्म वैरविसरून-जिभेनें चाटणाऱ्या व प्रेमानें पाजणाऱ्या सिंव्हिणी; यमनियमादिकांचें पालन करणाऱ्या, शमदमादि गुणधारण करणाऱ्या, शांतजितेंद्रिय, तेजस्वी अशा ऋषींना समिधादि यज्ञाचें सामान गोळा करण्यासाठीं एका जंगलांतून दुसऱ्या जंगलांत नेणारे हत्ती वगैरे प्रकार पाहून या पर्वतावर असणारा प्राणीवर्ग आपापसांतील

नैसर्गिक वैरभाव विसरून परस्पर सहकार्य करीत असलेले पाहून हा महातपस्वी अशा अगस्ति महर्षींचाच प्रभाव होय असें रेणुकाचार्यांनीं ओळखलें.

मौक्तिकांची जन्मदात्री नदी ताम्रपर्णी माझ्या शेजारूनच वाहते, अमोलिक रत्नांची मी खाणच आहें. चंदनवृक्ष माझ्यावर आहेत, अगस्ति महर्षि माझ्याठायींच वास करून राहिले आहेत. ह्मणून या जगांत माझ्यापेक्षां श्रेष्ठ कोण आहे. अशा अहंकारामुळेंच कीं काय तो मलयाद्रि शोभत होता,

शिवाय अतिशय तीक्ष्ण असे खिळे पर्वतशिखरांवर रोवून त्यांवर उभे राहून चारी दिशांना अग्नि पेटवून आकाशांत प्रकाशणाऱ्या सूर्याकडे दृष्टी ठेवून तपश्चर्या करणाऱ्या असंख्य मुनींनीं; कंदमूलादि आहार-साहित्य सिंह, वाघ, हत्ती, वगैरे पर्वतांतील प्राण्यांवर लादून आपल्या शिष्यसमुदयांसह संचार करणाऱ्या ऋषींनीं; देवदार, बकुळ, कुरवक, कृतमाल, तमाल, चंपक, चंदन, माकंद वगैरे घनदाट वृक्षांच्या समूहांनीं; सर्वत्र पडलेल्या ताडवृक्षांच्या फुलांतील केसरांच्या शुभ्रतेनें; निरनिराळ्या फुलांतील मध मनसोक्त पिऊन मस्त बनलेल्या भ्रमरांनींयुक्त अशा नव्या आम्रवृक्षांनीं; थंडगार, सुगंधयुक्त व शांत अशा वाहणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकांनीं; फलपुष्पांनीं भारावलेल्या वृक्षांच्या उपवनांनीं; वृक्षांना लटकलेल्या वेलींच्या झोंपाळ्यांवर निजलेल्या मुनिबालकांवर प्रेम करणाऱ्या मृगशावकांनीं; व्याप्त असा तो त्रिभुवनप्रिय मलयपर्वत विशेष शोभायमान दिसत होता.

हा मलयगिरी पर्वत मातंगांनींयुक्त[१] असूनही अतिशय पवित्र असलेला, द्विजराजांनींयुक्त[२] असूनही अंधकारमय असलेला, शिवमंदिराप्रमाणें अजहरियुक्त[३] असलेला, विष्णूप्रमाणें नृसिंह, वराह, वामन, कूर्म इत्यादिकांनींयुक्त असलेला, ब्रह्मदेवाप्रमाणें हंसांनींयुक्त असलेला, सांख्य शास्त्राप्रमाणें कपिलाश्रय[४] होऊन असलेला यामुळें सत्यलोक-(ब्रह्मलोक)च या भूलोकावर स्थापित झाला आहे कीं काय! असा भास होत होता. याप्रकारच्या पवित्र अशा पर्वताच्या मध्यभागीं असलेला अगस्ति महर्षींचा आश्रम पाहून श्रीरेणुक गणाधीश्वर अतिशय आनंदित झाले.

या पर्वतावरील आश्रमांतील रोपट्यांच्या आळ्यांतून असलेलें पाणी मृगशावक पीत होते. आश्रमवासिय ऋषि-पुत्रांनीं झाडांच्या फांद्यांवरून मृगाजिन व वल्कलें वगैरे वाळत टाकलेलीं होतीं; परस्पर विरोधी असे सिंह व हत्ती, गरुड व सर्प, वाघ व गाय वगैरे प्राणी आपापलें उपजत वैरही—अगस्तिमुनींच्या तपोबलामुळें—विसरून जाऊन त्यांच्या आश्रमांत प्रेमानें एकत्र क्रीडा करीत होते. अशा त्या निर्वैर व शांत आश्रमाचे मध्यभागीं श्रीचंदनाच्या एका वृक्षाचे छायेंत दर्भासनावर भस्माचें त्रिपुंड्र धारण केलेले; मंत्र ह्मणत असल्यामुळें ज्यांचें मुखकमल वारंवार विकसित होऊन शुभ्र दंत-पंक्तीची शोभा दिसत असलेले; ज्यांच्या खांद्यावरून यज्ञोपवित रुळत आहे;

---

१ चांडाळ, हत्ती, २ चंद्र, ब्राह्मण, ३ अज-ब्रह्मदेव, बोकड, हरी-विष्णू, सिंह, ४ कपिल मुनि, गाय.

ज्यांच्या कंठांत रुद्राक्षमाला आहेत व ज्यांनीं सर्वांगांवर वल्कलें धारण केलीं आहेत, असे ते अगस्तिऋषि विराजमान् झालेले होते.

त्या मुनीश्रेष्ठांनीं स्थैर्यमध्यें भूदेवीला. गांभिर्यामध्यें सागरांना, शीतलतेमध्यें पूर्णचंद्राला, व निर्मलपणांत आकाशाला, खालीं मान घालावयास लाविलें होतें. तसेंच ते द्विजाधिप ह्मणजे गरुडाप्रमाणें किंवा द्विज ह्मणजे ब्राह्मण अधिप ह्मणजे मुख्य (ब्राह्मण श्रेष्ठ) असलेले; शरत् समयाप्रमाणें संक्षीण वर्षें असलेले अथवा वय झालेले; कचास वाढविणाऱ्या बृहस्पतीप्रमाणें अथवा कच ह्मणजे जटा वाढविलेले; सत्यव्रताला आश्रय देणाऱ्या शंतनुप्रमाणें किंवा सत्यव्रत पाळणारे; करुणासागर प्रवाहशाली; विषयरूपी विषवृक्षाला कुऱ्हाडी-प्रमाणें, संतोषरूपी अमृतरसाला समुद्राप्रमाणें; षड्रिपुरूपी घोरसर्पास गरुडमंत्राप्रमाणें; मांगल्य परंपरेचें क्रीडास्थान झालेलें एवढेंच नव्हेतर सर्व आगमांकडून ते समुपाश्रित असले तरी एकाच दंडाचा आश्रय करणारे; दोषाकरशेखर ह्मणजे समुद्र प्राशन करणारे असले तरी दोषांचे आगर असलेल्या दुर्जनांना दूरलोटणारे; विषमाक्ष ह्मणजे शिवाची आराधना करीत असले तरी विषमाक्ष ह्मणजे पक्षपातीदृष्टी नसलेले असे भगवान् लोपामुद्रापति अगस्तिऋषींना श्रीरेणुक-गणाधीशांनीं पाहिलें.

पर्वतांमध्यें श्रेष्ठ असलेल्या मेरूप्रमाणें, हत्तीमध्यें श्रेष्ठ असलेल्या ऐरावताप्रमाणें, नवग्रहांत श्रेष्ठ असलेल्या सूर्याप्रमाणें, सर्व ऋषिमंडळांत दर्भपीठस्थ अगस्तिमुनी शोभत होते.

वर वर्णन केल्याप्रमाणें असलेलें मलयपर्वताचें वैभव व कुंभोद्भव अगास्तिऋषींचें विशेष तेंच बारकाईनें निरीक्षण करून श्रीरेणुक-गणाधीश नभोमंडळांतून भूलोकीं सत्वर अवतरले. पुढें आनंद-भरित होऊन मलयाचल मध्यवर्ती अगस्त्याश्रमांत जगद्गुरु कुंभोद्भूत मुनीला भेटण्याच्या इच्छेनें प्रवेश करते झाले.

आश्रमांत असणारे अगास्तिऋषीसुद्धां त्रिकाळज्ञानी असल्यामुळें सकलमुनिसमुदयांसह श्रीरेणुकाचार्यांचें दिव्य तेज पाहून माझ्या उद्धाराकरितां परमात्माच श्रीरेणुकाचार्य नांव धारण करून आला आहे! असा मनाला निश्चय करून प्रमथ श्रेष्ठ अशा श्रीरेणुकाचार्यांचा महिमा मुनिसमुदायांस सांगण्यास सुरवात केली.

हे मुनिजनहो, चार्वाकादि दुर्मतांचें खंडन करून शिव-भक्तांच्या हृदयांत बऱ्याच कालापासून पसरलेल्या दुष्टाचाररूपी अंधःकाराचा नाश सद्बोध चंद्रिकेनें करण्यासाठीं परमेश्वराच्या आज्ञे-नुसार कोल्लीपाकी क्षेत्रांतील सोमनाथ नामक लिंगांतून श्रीरेणुकेश शिवभक्तांना तारण्यासाठीं पृथ्वीवर अवतरले आहेत.

अनेक देश फिरत जगन्नियामक परमेश्वराचा साक्षात्कार व्हावा ह्मणून बऱ्याच काळपर्यंत उग्र तप आचरित असलेल्या आप-णांस निजतत्वोपदेश करून शिवानंदाचें पान करविण्यासाठीं लोको-द्धाराचाच मुख्य हेतु मनांत असलेले श्रीरेणुकगणाधीश आज एथें आले आहेत. यांना प्राकृतपुरुष समजूं नका. आपण या महापुरुषांचें

आदरातिथ्य व सेवा सुश्रुषा करून कृतकृत्य झालें पाहिजे. कसलाही प्रयत्न न करितां आकस्मिकपणें या महात्म्याचें दर्शन झाल्याबद्दल विचार केल्यास आम्ही किती पुण्यवान् आहोंत ह्मणून सांगूं ! आपली तपश्चर्या आज सफल झाली; यांच्या दर्शनानें आमचें तेज पवित्र झालें, आतां आपण आजपर्यंत शिवरूपी ज्या ज्योतिर्लिंगाची तपश्चर्या करीत होतों तें ज्योतिर्लिंग आपलीं असाधारण अशीं चंद्रधरत्व, गंगाधरत्व, नीलकंठत्वादि रूपें गुप्त ठेवून घेऊन या प्रकाराच्या योगपुरुषांचे रूपानें या ठिकाणीं आलें आहे. त्यामुळें आपण सर्व धन्य आहोंत. असें अगास्तिऋषि अति आनंदानें त्या महात्म्यांचे यथार्थ स्वरुपाचा उपदेश करीत असतां श्रीरेणुकगणाधीशांचें त्या आश्रमांत आगमन घडलें.

तेव्हां सर्व मुनींनीं उत्थापन देऊन (उठून उभे राहून) जगद्गुरूंचें स्वागत केलें व त्यांना दर्भपीठावर बसवून त्यांचे चरणकमल धुतले. नंतर अर्घ्यपाद्यादिकेंकरून त्यांचें पूजन केलें. मैत्रावरुणी अगास्तिमुनी, हात जोडून साष्टांग नमन करून गद् गद् स्वरानें व कुतुहलानें पुढील प्रमाणें विचारते झाले.

हे महात्मन्, आपण परशिवांच्या गणांचे अग्रणी आहांत, हें मी जाणतों. परमेश्वराच्या आज्ञेनुसार भूतलावर आपण अवतरला आहांत हेंही मी जाणतों. परमशिवलिंगांतून आपण भवज्वलानें पीडित झालेल्या जीवांना सोडविण्यासाठीं उद्भूत झाला आहांत. आतां हे जगद्गुरो, स्वामिन्, कृपा कटाक्षेंकरून माझें सदैव रक्षण करा.

अधिक काय वर्णावें! अनेक जन्मीं केलेल्या कोट्यावधि पुण्यकर्मांचें फळ देण्यासाठींच कीं काय? सुरासुरांनाही ज्यांचा महिमा अगम्य आहे असें आपण माझ्या आश्रमांत आलांत.

महाराज, आपल्या आगमनाचें कारण काय? व येथें आज माझ्याकडून काय केलें गेलें पाहिजे ते सांगा. आज्ञा वचनांनीं माझ्यावर अनुग्रह करून, या पृथ्वीतलावर मला मानार्ह करा.

याप्रमाणें बोलणाऱ्या, विचक्षण, अद्भूत कार्यें करणाऱ्या, शैवमतविरोधियांना रडविणाऱ्या, मुमुक्षुजनांच्या परिषदेचे अध्यक्ष अशा अगस्ति महर्षींना-शरणागत रक्षणीं बद्ध-कंकण झालेल्या रेणुकाचार्यांनीं साक्षात् पाहून त्यांची परीक्षा करण्यासाठींच कीं काय? त्या कुंभसंभव मुनींना मेघगर्जनेंप्रमाणें असलेल्या आपल्या वाणीनें आदरयुक्तपणें रेणुकदेशिकेंद्र ह्मणाले—

हे मुनिपुंगवा, तुमचा महिमा काय वर्णावा? सर्व पर्वतांमध्यें पूर्वीं उंच असलेला विंध्याद्रि एकदां जगद्रक्षक सूर्यचंद्रांची गतिच थांबवून धरून लोककंटक बनला असतां, आपण त्याचे जवळ जाऊन व त्याला पायाखालीं दडपून ह्मणालांत कीं, “हे विंध्यपर्वता, तूं सूर्यचंद्रांना अडवून धरल्यामुळें आस्तिकांची जपानुष्ठानेंच बंद पडलीं, सतत अंधकारच व्यापून राहिल्यामुळें निशाचरांना नेहमींच वावरतां येऊं लागलें, पशुपक्ष्यांना मनमुराद हिंडतां येईनासें झालें आहे. असाच जर तूं उद्धट राहिलास तर कांहीं काळानंतर सारें जगच

नामशेष होईल. ह्मणून माझ्या परवानगीशिवाय तूं उंच होऊं नकोस" अशी खडतर आज्ञा करून विंध्यपर्वतावर हात ठेवल्यानें तेव्हांपासून विंध्यपर्वत ठेंगणा झाला. आपण हा चमत्कार केला नसतां तर, जगाचे व्यवहार चाललेच नसते. चक्रवर्ती नहुशानें शंभर यज्ञ करून स्वर्गारोहण केल्यावेळीं परमेश्वराच्या आज्ञेनुसार सप्तर्षी त्याला पालखींत बसवून इंद्राच्या दरबाराकडे नेत होते, तेव्हां इंद्रासनावर सत्त्वर बसावें या इच्छेनें ‘लवकर लवकर चला’ असें नहुशराजा सप्तर्षींना ह्मणाला. त्या सप्तर्षींत आपण एक होता. राजाची घमेंड आपणांस असह्य होऊन आपण रागावून म्हणालात कीं, हे राजा, यज्ञ केलेल्यानें शांतपणें असावें, ही मर्यादा तूं मोडली आहेस, यावरून तूं मदोन्मत्त बनला आहेस; हा तुझा दैवदुर्विलासच होय. अहंकारमदानें तूं आम्हांला—“लवकर चला”—चला ह्मणजे सर्प—, सर्प म्हणालास. तेव्हां आतां तूंच सर्प हो असें त्या राजाला म्हणतां क्षणींच नहुशराजा सर्पाकार बनून भूलोकीं पडला. त्याचप्रमाणें वातापि व इल्वल हे दोन राक्षस मदोन्मत्त बनले असतां आपण त्यांच्याकडे भिक्षेस गेल्यावेळीं इल्वलनें वातापीला ठार मारून त्याचें मांस शिजवून आपणांस घातलें तें आपण खाल्लें; तेव्हां हे वातापि, ‘तूं पोट फोडून बाहेर ये’ असें इल्वल म्हणूं लागला. कारण तसें जिवंत होण्याचा त्याला वरच होता. पण काय चमत्कार! आपण म्हणाला कीं, “हे वातापि माझ्या पोटांतच भस्म होऊन जा” व तसेंच घडलेंही; अफाट असा सप्तसमुद्र आपण एकाच आचमनांत गिळून टाकले! हे तुमचे अतुल तपप्रभाव या जगांत

कोणता मनुष्य जाणण्यास समर्थ होईल? आपल्या तपस्तेजाचा सूर्यच भूमीवर दिवसा तळपत असतो व तुमच्या प्रसादानेंच रात्रीं चंद्र प्रकाशतो; असेंच सर्व लोक समजतात. म्हणून आपणच धन्य आहांत, आपणच जगन्मान्य आहांत, परमेश्वर भक्तींत आपणच श्रेष्ठ आहांत, या भूलोकावर जन्मणाऱ्यांच्या अनेक जन्मांतील मोठ्या भाग्यामुळेंच भक्तिं पुरःसर होईल.

रेवणसिद्धांनीं वरीलप्रमाणें स्तुस्ती केल्यानंतर अगस्तिऋषि हात जोडून भक्तिभावानें प्रेरित होऊन ह्मणाले "आपल्यापुढें मी सूर्यापुढील दिवटीसारखा आहें. उगाच माझ्यासारख्या अल्पव्यक्तीला महत्त्व कां देतां? समुद्रापुढें जसें डबकें तसा मी आपल्यापुढें आहे. आपण दिव्य देहधारी आहां, व मी भौतिक देहधारी आहे, आपण सर्वज्ञ व मी अल्पज्ञ, आपण तत्त्वज्ञानी तर मी तत्त्वज्ञानापेक्षी, आपण मायातीत व मी मायाग्रस्त. मीं कितीही चमत्कार केले, कितीही वेदवेदांगादिशास्त्रें वाचलीं आणि कितीही तपश्चर्या केली तरीही निज तत्त्वानुभवांत अनभिज्ञच आहे. एखाद्या स्त्रीनें कितीही अलंकार घातले तरी, कुंकुमतिलकावांचून ते जसे व्यर्थ, तसेच मी कितीही खडतर तपें, अनुष्ठानें केलीं तरी शिवतत्त्वज्ञान मला झालें नसलेमुळें माझी तीं सर्व कर्में मला फलदायक झालीं नाहींत. म्हणून हे गुरुवर्य, अखिल तत्त्वरूपी-मालेच्या-मध्यभागीं असणाऱ्या पदका-प्रमाणें शोभत असणाऱ्या शिवतत्त्वांचा मजवर अनुग्रह करून तत्त्व-साक्षात्काराचें साधन षट्स्थल रहस्याचा उपदेश करून मला कृतार्थ करावें ह्मणून साष्टांग नमस्कार करून मी प्रार्थना करीत आहें.

श्रीरेणुकाचार्य वरील विज्ञप्ति ऐकून संतुष्ट झाले व अगस्ति-मुनीवर कृपाकटाक्ष टाकीत आणि मस्तक हालवीत हास्य वदनानें ह्मणाले, “हे मुनीश्वर, आपण बरोबर विचारलेत. वेदागमांचें सार असलेलें, शक्ति विशिष्ट, परशिवतत्त्वस्वरूप, वीरमाहेश्वरमत अमंगल विनाशक असल्यामुळें षट्स्थलोपदेशासहित मी सांगतो त्याप्रमाणें मला परमेश्वरी प्रेरणाच झालेली आहे ह्मणून सावधान चित्तानें ऐका. या तत्त्वोपदेशामृताच्या पानाला आपणच योग्य आहांत. आपल्या-मध्येंच तत्त्वज्ञानांचें बीज फळास येईल.

साधन चतुष्टयाची प्राप्ती करून घेऊन सद्गुरूंच्या कृपा-कटाक्षानें जो निःश्रेयसासाठीं झटतो तोच या जगांत धन्य होय त्याचाच जन्म सफल होय.

योग, सांख्य, पाशुपत, पांचरात्र व प्रस्थानत्रयी हींच हे योगिश्रेष्ठा, हल्लीं या जगांत मान्यता पावलेलीं शास्त्रें आहेत. त्यांमध्यें वैदिकमत उत्कृष्ट मानलें जातें. शैवतंत्र वैदिकमतांतर्गत आहे, ह्मणून हें मत वेदांइतकेंच नेहमीं प्रमाण होय युक्तिवादानें खंडित होणारें हें मत नव्हे.

हे कुंभसंभवा, हें शैवतंत्र वाम, दक्षिण, मिश्र व सिद्धांत अशा चार विभागांत विभागलें असून त्यांपैकीं सिद्धांत विभाग परशिवाच्या मुखकमलांतून स्पष्टोच्चारपूर्वक बाहेर पडलेल्या कामिकादि-वातुलांत अठावीस दिव्यागमरूप संकलित वचनांनीं बनलेला आहे. शिवागमांचें

सार असलेल्या या सिद्धांतागमांत जीव ब्रह्मैक्य किंवा लिंगांग सामरस्यरूप मोक्ष साधक षट्स्थलस्वरूपाचें चांगलें वर्णन केलेलें आहे. जीव किंवा अंग हे १ भक्त, २ माहेश, ३ प्रसादि, ४ प्राणलिंग, ५ शरण व ६ ऐक्य या प्रमाणें सहाप्रकारचे आहे. यांतील भक्तस्थल भक्ति उत्पन्न करतें, माहेशस्थल कर्मक्षय करतें, प्रसादिस्थल, परशिव परीक्षाभियोग करून देतें, प्राणलिंगस्थल तत्त्वविचार उत्पन्न करतें, शरणस्थल अहंकार नष्ट करतें व ऐक्यस्थल आपलें सच्चिदानंद स्वरूप व्यक्त करतें. त्याचप्रमाणें परशिव किंवा लिंग हें आचार लिंग, गुरूलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग व महालिंग अशा सहा प्रकारचें आहे. या सहा सहा भेदांत पुन्हां उपभेद उत्पन्न होऊन एकंदर एकशें एक स्थलभेद होतात.

हे महर्षे, चराचरात्मक जगाला आधारभूत असलेल्या परशिवास स्थल ह्मटलें आहे. "यतो वा इमानि भूतानि जायंते ।" आणि यत्रादौस्थीयते विश्वं प्राकृतं पौरुषं यतः । लीयंते पुनरंतेच स्थलं तत्प्रोच्यते बुधैः ॥ हीं वेद वचनें प्रमाण होत. त्यांमध्यें हें विश्व स्थिर होतें, ह्मणून त्याला "स्थ" ह्मटलें. त्याचमध्यें तें लीन होतें ह्मणून त्याला "ल" ह्मटलें जगाच्या स्थिति लयाला शंभूच कारण आहे. ह्मणूनच त्याला स्थल ही संज्ञा प्राप्त झाली.

स्थलसंज्ञा वाचक सच्चिदानंद परमात्मा आपल्यामध्यें अविनाभाव-संबंधानें असलेल्या स्वशक्तीच्या चलनमात्रें करून-लाटा नसलेल्या ह्मणजे शांत अशा समुद्रांत लाटा उत्पन्न झाल्याप्रमाणें-लिंग व अंग

अशा दोन रूपानें प्रगट झाला, ज्या रूपांत शिवांश अधिक होता त्याला लिंग ह्मटलें व ज्यांत तो कमी होता त्यास अंग ह्मटलें.

तें परमात्मारूपलिंग इष्ट, प्राण व भाव असें तीन प्रकारचें झालें. इष्टलिंगाचे-आचारलिंग व गुरुलिंग; प्राणलिंगाचे-शिवलिंग व जंगमलिंग आणि भावलिंगाचे-प्रसादलिंग व महालिंग असे आणखी भेद पडले.

या लिंगांना समष्टिस्वरूप असलेला परशिव, क्रिया शक्तियुक्त होऊन आचार लिंगाचे रूपानें घ्राणेंद्रिय गोळकांत सूचित्तनामक हस्तानें वास ग्रहण करतो; ज्ञानशक्तियुक्त होऊन गुरुलिंगाचे रूपानें जिव्हेंद्रियस्थानीं सुबुद्धि नामक हस्तानें रस ग्रहण करतो; इच्छाशक्तियुक्त होऊन शिवलिंगाचेरूपानें नेत्र गोलकांत निरंहकार नामक हस्तानें रूपग्रहण करतो; औन्मुख्यशक्तियुक्त होऊन जंगमलिंगाचे रूपानें त्वगेंद्रिय गोलकांत सुमनोहस्तानें स्पर्शाचें ग्रहण करतो; पराशक्तियुक्त होऊन प्रसाद लिंगाचेरूपानें श्रोतेंद्रियांत सुज्ञाननामक हस्तानें शद्बग्रहण करतो; चिच्छक्तियुक्त होऊन महालिंगाचे रूपानें मनोगोलकांत सद्भाव नामक हस्तानें आनंद ग्रहण करतो. याप्रमाणें चैतन्यस्वरूपी शिव घ्राणेंद्रियादिमधीलगंधादि षट् पदार्थ ग्रहण करीत असतांना एकेका इंद्रियांत एकेक स्वतंत्र नांव धारण करतो.

शिवांशाधिक्यानें झालेल्या लिंगविभागाचे भेदांप्रमाणेंच अल्पांशानें झालेल्या अंगविभागांचेही भेद पडले. प्रथम त्यागांग, भोगांग, व योगांग असे भेद झाले. नंतर त्यागांगाचे—१ भक्त व २ महेश; भोगां-

गाचे—१ प्रसादि व २ प्राण; आणि योगांगाचे—१ शरण व ऐक्य असे एकूण सहा भेद पडले.

पृथ्वीतत्त्व चिद्‌भूतिस्वरूपानें भक्तस्थलांत; आपतत्त्व चिदाप्यायन स्वरूपानें महेशस्थलांत; तेजतत्त्व चिदुज्वलनस्वरूपानें प्रसादिस्थलांत; वायुतत्त्व स्वतंत्रतालक्षण स्पंदनस्वरूपानें प्राणलिंग स्थलांत; आकाशतत्त्व चिद्व्याप्तिस्वरूपानें शरणस्थलांत; आत्मतत्त्व चिदानंद स्वरूपानें ऐक्यस्थलांत क्रमाक्रमानें लय पावतें याप्रमाणें तत्त्वसहित षट्‌स्थलें आचारादि षड्‌लिंगांत लय पावतात.

त्याचप्रमाणें आचारलिंग गुरुलिंगांत, गुरुलिंग शिवलिंगांत, शिवलिंग जंगमलिंगांत, जंगमलिंग प्रसादलिंगांत, प्रसादलिंग महालिंगांत, महालिंग घनलिंगांत लय पावतें. या प्रमाणें लिंगांग सामरस्यसिद्धि झाल्यावर जसें दुधांत दूध पाण्यांत पाणी किंवा तेजांत तेज एकरूप होऊन जातें, त्याप्रमाणें अ विभाज्य संबंधानें अज्ञान निवृत्तिपूर्वक तत्त्वज्ञान होऊन अंगरूपी जीवाला लिंगरूपी परशिवांत—" यथानद्यः स्यंदमान समुद्रेअस्तंगच्छंति " या श्रुतीच्या अभिप्रायास अनुसरून नद्या आपापलें नाम, रूप, क्रिया सोडून समुद्रांत एकरूप झाल्याप्रमाणें—एकरूपता प्राप्त होते. म्हणजे शिव व जीव किंवा लिंग व अंग यांना अ विभाज्य असा परस्पर नित्यसंबंध प्राप्त होतो- यालाच लिंगांग सामरस्य म्हणतात.

लिंगांग तत्त्वात्मक सिद्धांत तत्वोदित असें सामरस्य अगास्ति महर्षींना याप्रमाणें श्रीरेणुकाचार्यांनीं विवरण करून सांगितलें.



श्री जगद्गुरु रेणुकाचार्यांकडून श्रीमुनीश्रेष्ठ अगस्ती ऋषीस
लिंगांग सामरस्योपदेश.

वेदागमांत प्रसिद्ध असलेले लिंगांगसामरस्यस्वरूप षट्स्थल जाणून जो तें बाणून घेतो, त्या महापुरुषासमान या त्रैलोक्यांत दुसरा कोणी नाहीं; तो प्रत्यक्ष शिवस्वरूपीच होय.' असें श्री रेणुकाचार्यांनीं सांगितल्यावर अगस्ति महर्षि म्हणाले, “ हे जगद्गुरो, भवरोगाला सिद्धौषधी समान असलेला, अश्रुतपूर्व, अत्यंत परिशुद्ध, मोक्षदायक व वेदागमांचें रहस्य असलेला हा शिवसिद्धांत ऐकून मी कृतकृत्य झालें आहें. आपल्या तत्त्वोपदेशानुसंधानानें माझ्या हृदय-कोहरांतील अज्ञान-तिमिर नाहींसा झाला आहे.” असें म्हणून ब्रम्हानंदतुंदिल होऊन मैत्रावरुणी श्रीरेणुकाचार्यांना वरचेवर आपला सेवकभाव व्यक्त करून हात जोडून साष्टांग नमस्कार करते झाले. तेव्हां श्रीरेणुकाचार्य म्हणाले, ‘ हे महर्षे; यापुढें हे मुने, हा पवित्र शिव-सिद्धांत ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें इतर अधिकारी जीवांनाही उपदेशून त्यांचें अज्ञान दूर कर, आपल्या आत्मभूमींत पेरलेलें हें शिवतत्त्वाचें बीज अंकुरित व पल्लवित होऊन त्याला फलपुष्पें येवोत, असा आशीर्वाद देऊन व आपल्यापुढील कार्यांचा विचार करीत हे अगस्तिऋषि, ‘ मी आतां येतों ’ असें सांगत असतांच निमिषार्धांत अंतर्धान पावून उमाकांताचें चिंतन करीत त्याच मलयपर्वताच्या मध्यभागीं असलेल्या भद्रतर भद्रानदीचे कांठावर विराजमान् असलेल्या प्रत्येक युगांत स्वतांच स्थापलेल्या श्रीमद्रंभापुरी धर्मपीठाला मोडकळीस आलेलें पाहून तेथें न उतरतां तसेंच आकाश मार्गानें पूर्वसमुद्राचे कांठीं श्रीरेणुकाचार्य प्रवेश करते झाले.

तो समुद्र, किनाऱ्यावर अफाट असलेल्या लाटांच्या मालिकांनीं उग्र मकरांनीं, मोठमोठ्या पाणहत्तींनीं, फुललेल्या पर्वतप्राय माशांनीं व कासवांनीं, व्यापारासाठीं देशोदेशीं भटकणाऱ्या व्यापाऱ्यांच्या जहाजांनीं भरलेला असून महाभाग्यशाली पुरुषांच्या हातावरील मकर, कूर्म, चक्रादि चिन्हांप्रमाणें आणि इंद्रपुरीप्रमाणें अनिमिषानंद सर्वांना देणारा, मोठ्या वनांतील कमलाप्रमाणें पुंडरिकांनीं सुशोभित असा तो समुद्र श्रीरेणुकगुरूत्तमांनीं पाहिला.

त्याचवेळीं सीतेचें अपहरण करणाऱ्या रावणास ठार मारण्यासाठीं नल नीलादिकांनीं बांधलेला सेतु व रावणादिकांच्या वधामुळें लागलेल्या दोषांचे शांतीसाठीं श्रीरामचंद्रांनीं प्रतिष्ठापित केलेले प्रदीप्त व यतीवर आणि नरश्रेष्ठ यांजकडून वंदित असें वालुकामय रामेश्वरलिंग श्रीरेणुकाचार्यांनीं पाहिलें.

तेव्हां तेथें त्या देवाधिदेवाच्या दर्शनासाठीं अनेक देशांहून आलेले अनेक राजे, मुनीगण, गुरुसार्वभौम अशा रेणुकाचार्यांच्या दर्शनानें धन्य झाले. जगदाचार्यांच्या शुभ दर्शनानें आनंदित झालेले मुनीगण, 'हे जगाच्या उद्धाराकरितां अवतरलेल्या गुरुश्रेष्ठा, आपणांकडून शिवसिद्धांततत्त्वोपदेश ऐकून धन्य व्हावें या इच्छेनें आम्ही आपली प्रार्थना करतों' असें म्हणून त्या रेणुकगणाधीशांस प्रार्थिते झाले. त्यांचे प्रार्थनेनुसार श्रीरेणुकगणाधीश्वरांनीं शिवसिद्धांत तत्त्वांचा उपदेश करून सर्वांना धन्य केलें. मुक्तिदायक असा शिवसिद्धांत तत्त्वोपदेश ऐकून पवित्र अंतःकरणाचे होऊन ते मुनीगण साष्टांग

नमस्कार करून वर उठतात न उठतात इतक्यांत गुरुसार्वभौम हे, फार दिवसांपासून आपली मार्गप्रतीक्षा करीत आपल्या चिंतनांत आसक्त झालेल्या बिभीषणाची इच्छा पूर्ण करण्याच्या हेतूनें गगन मार्मानें सुवर्णानें मारलेल्या रेषेप्रमाणें जेथें सोन्याच्या घरांच्या रांगा आहेत, ऐश्वर्यकांतीमुळें जिनें इंद्रपुरीलाही मागें टाकलें आहे, शत्रूचें भय नसलेली व सुमंगल अशा लंकापुरीला येऊन पोहोंचले.

मोक्षाला कल्पवृक्षासमान, ज्ञानसागर, अज्ञजीवांना अभयदायक, लीलाकल्पित देहधारी, वरदहस्त, परतर असे श्रीरेणुकगणाराध्य ठिकठिकाणीं संचार करीत असतां त्यांच्या लीला व असाधारण असें वैभव ऐकून राक्षसश्रेष्ठ अशा राजा बिभीषणानें आपला महान् संकल्प पूर्ण करण्यासाठींच हे महापुरुष आले असतील, असें मानून जगद्गुरूंच्या समोर जाऊन साष्टांग नमस्कार घालून त्यांना आपल्या राजवाड्याकडे आणिलें, व रत्नमय सुवर्णपीठावर बसवून अर्घ्यपाद्या-दिकेंकरून, त्यांच्या चरणकमलांचें पूजन करून, राजा बिभीषणानें त्यांना अतिशय भक्तीनें वंदन केलें.

श्रीरेणुकगणाधीश्वरांचे-भवतारक अशा-चरणकमलांची विधियुक्त पूजा करून बिभीषण राजा हात जोडून म्हणाला, हे गुरुश्रेष्ठा, सकल इच्छा पूर्ण करणाऱ्या, भक्तवत्सल, प्राणरक्षणांत निपुण, निग्र-हानुग्रह समर्थ, मंगलकारक, आनंदघन, दयानिधे, तूं माझ्या दृष्टीस पडून माझें आतिथ्य स्वीकारून माझ्या राजवाड्याकडे आल्यामुळें हा वाडा व ही लंकापुरी पवित्र झाली असून माझा वंशही अत्यंत पवित्र

झाला. त्रैलोक्यांत माझ्यासारखा भाग्यशाली दुसरा कोणीही नाहीं, असें मी समजतों. असें म्हणून प्रार्थना करीत भक्तिमग्न होऊन ज्यांना आपण दृष्टिगोचर झालांत ती माझी लंकापुरी, माझा राक्षस वंश व मी स्वतः हीं सर्व कृतार्थ झालीं आहेत.

या प्रमाणें बोलणाऱ्या शुद्धहृदयी, श्रेष्ठधर्मोपासक, परमभक्त व विलोलचित्ताच्या बिभीषणाला श्रीरेणुकाचार्य संतोषयुक्त अंतःकरणानें म्हणाले,

'हे विशेषज्ञ बिभीषणा, तुझ्या भक्तीनें मी संतुष्ट झालों आहें, म्हणून हे भक्तराज, तूं इच्छित वर माग, मी द्यावयास तयार आहे.'

श्रीरेणुकाचार्यांचें हें शुभदायक व उत्तम असें वचन ऐकून बिभीषण राजा संतुष्ट झाला व आपली इच्छा प्रदर्शित करतां झाला.

'हे गुरुवर इंद्रादिदेवांचा शत्रु असा माझा भाऊ रावण, अयोध्याधीश दशरथाची सून जनकसुता पळवून घेऊन आल्यानंतर कोपाविष्ट झालेल्या रामानें प्रचंड सैन्य घेऊन येऊन समरांगणावर त्याला पाडलें असतां मला पुढें पाहून म्हणाला, 'बाळ नऊकोटी शिवलिंगांची प्रतिष्ठा मी करीन असा संकल्प सोडला होता. पण त्यांपैकीं सहाकोटी शिवलिंगांची प्रतिष्ठा मात्र मी आजपर्यंत केली आहे. दुर्दैवानें माझा संकल्प पूर्ण झाला नाहीं. आतां माझा अवसान काल (मरण काल) प्राप्त झाला असल्यामुळें उरलेल्या तीन कोटी शिवलिंगांची प्रतिष्ठा करून तूं मला प्रतिज्ञा पूर्ण केलेला बनीव.'

असें रावणानें म्हटल्यावर मी म्हणालों, 'हे बंधो, बालपणापासून मी विष्णु-भक्त आहे. म्हणून शिवलिंगाऐवजी विष्णुमंदिरें स्थापून मी तुझी प्रतिज्ञा पूर्ण करीन.' तेव्हां रावण म्हणाला, 'बाळ स्वतः विष्णूच परमशिवभक्त आहे मत्स्यावतारामध्यें त्यानेंच याच नगरींत मत्स्येश्वर नामक शिवलिंग स्थापन केलें आहे. सर्वदेवांमध्यें शिवच सार्वभौम आहे, याची साक्ष एथील मत्स्येश्वरलिंगच देत आहे. म्हणून तूंही 'शिवच सर्वोत्तम देव आहे' असें जाणून मला सद्गति प्राप्त व्हावी म्हणून तीन कोटी शिवलिंगें स्थापन कर.' असें म्हणून व माझ्याकडून तसें वचन घेऊन शिवाचें ध्यान करीत परमशिवभक्त अशा दशाननानें आपला देह सोडला. रावणाचें तें वचन ऐकून त्याच्या सद्गतीसाठीं तें कार्य त्वरित करण्याचें मीं ठरविलें.


एकाच सूमुहूर्तावर देवांचा वैरी असलेल्या माझ्या भावाच्या सद्गतीसाठीं गुरूंकडून तीनकोटी शिवलिंगें स्थापन करण्याचा निश्चित विचार मनांत बाळगून मी लंकापुरीहून ताबडतोब माझे वडील विश्रवसमुनी यांच्या आश्रमाला गेलों व त्याला वंदन करून म्हणालों कीं,

मुमूर्शावस्थेमध्यें (मूर्च्छावस्थेंत) असतांनाच माझ्या बंधूनें तीनकोटी शिवलिंगांची प्रतिष्ठापना करण्यास मला सांगितलें आहे, त्या कामीं आपल्या सहाय्यानेंच मला सर्व अनुकूलता प्राप्त होईल, असें वाटून 'हे तात, मी आपणांला शरण आलों आहें. तेव्हां कृपा करून माझें रक्षण करा.' तेव्हां

'वत्सा, तूं एथें आलास? लंकापुरींतच महाविष्णूनें स्थापना केलेलें मत्स्येश्वरलिंग आहे, त्याची भक्तीनें पूजा कर. त्याच्या अनुग्रहानेंच तुझें इच्छित पूर्णपणें सिद्धीस जाईल, आजच तूं एथून स्वनगरीला परत जा' असें म्हणून मला वडिलांनीं परत पाठविलें.

त्या प्रमाणें मी लंकापुरीस परत येऊन अतिशय भक्तीनें मत्स्येश्वराची पूजा करून सतत त्याचेंच ध्यान अंतरंगांत करीत निजलों असतां एके दिवशीं रात्रींच्या शेवटल्या प्रहरांत स्वप्नांत परमेश्वराचा साक्षात्कार झाला कीं:—'हे भक्तिभूषित बिभीषणा, कलियुगाच्या प्रथम चरणांत श्रीरेणुकशिवाचार्य नामक कोणीतरी सिद्धराज महाप्रभावी, महानुभाव, तुझ्या लंकानगरींत आपण होऊनच येऊन तुझा मनोरथ पूर्ण करील' पुढें जागा झाल्यानंतर अतिशय आनंदानें मी बराच काळ घालविला. पण आतां माझा भाग्योदय झाल्यामुळें आज माझ्यावर अनुग्रह करण्यासाठीं साक्षात् परमेश्वराप्रमाणेंच आपण आचार्य होऊन आला आहांत. असें मला वाटतें, म्हणून आतां एकाच मुहूर्तावर तीनकोटी शिवलिंगें स्थापन करून माझा मनोरथ पूर्ण करा.' अशी विनंती बिभीषणानें रेणुकाचार्यांना केली.

तेव्हां रेणुकगणाधीश्वर म्हणाले,' हे बिभीषणा, मत्स्येश्वराचेठिकाणीं असलेली तुझी भक्ति पाहून मी फार संतुष्ट झालों आहें. तुझ्या इच्छेप्रमाणें एकाच मुहूर्तास तीनकोटी शिवलिंगांची यथासांग प्रतिष्ठा करून सत्यसंकल्प अशा त्या रावणास मी सद्गति मिळवून देईन; या कार्यांसाठींच मी येथें आलों आहें. तेव्हां तीनकोटी लिंगांच्या प्रतिष्ठा-



श्री जगद्गुरु रेणुकाचार्यांनी बिभीषणास प्रार्थनानुसार तीन कोटी
स्वरूप धारण करून एकाचवेळीं तीन कोटी लिंग
स्थापन करतात.

पनेला लागणारें साहित्य, त्यासाठीं योग्य भूमी वगैरे जुळवाजुळव करून योग्य मुहूर्त ठरीव' शिवाचार्यांच्या वरील आज्ञेप्रमाणें पंचसूत्रासहित तीन कोटी शिवलिंगें, त्यांच्या प्रतिष्ठापनेला लागणारी सर्व सामुग्री सज्ज करून बिभीषणानें ज्योतिष्यांना विचारून सुमुहूर्त ठरविला. त्या मुहूर्तास महान् तपस्वी, गणेंद्र श्रीरेणुकाचार्यांनीं तीन कोटी आचार्यांचें रूप धारण करून तीन कोटी शिवलिंगांची प्रतिष्ठापना विधिपूर्वक एकाच वेळीं केली.

त्यावेळीं 'जय जय अनंत महिमोज्वल, जय जय भक्तबंधो, जय जगद्गुरो, श्रीरेणुकाचार्य महाराज-की जय' अशा मंगलध्वनीनें सर्व आकाश दुमदुमून गेलें. गुरुवर्यांनीं विराटरूप धारण केलेलें होतें. शांतमूर्ती, बिभीषणाचें वांछित पूर्ण करून-शिवभक्तीनें ज्याचा चेहरा तेज:पुंज झाला आहे अशा—त्या बिभीषणाला श्रीरेणुकगणाधीश्वरांनीं शिवसिद्धांताचा उपदेश केला. तेव्हां तो बिभीषण वंदन करीत असतां श्रीजगद्गुरु त्याच्यापुढें अदृश्य झाले. तेथून ते आकाशमार्गानें प्रयाण करीत वाराणशी क्षेत्राला गेले. परमेश्वराच्या आज्ञेनुसार तेथील विश्वेश्वर लिंगांतून प्रकट झालेल्या जगद्गुरु श्रीविश्वाराध्यांच्या मठांत त्यांनीं प्रवेश केला वीरशैव सिद्धांत प्रस्थापित करण्यासाठींच त्यांनीं प्रख्यात् अशा विश्वाराध्य आश्रमांत प्रवेश केला. तेथील वेदागमदर्शन पठनांत परायण असलेले, योगनिष्ठेंत श्रेष्ठ असे योगीश्वर, ब्रह्मचारी, शिवलिंगांग सामरस्य संपादन करण्यांत मग्न झालेले, अनेक संन्यासी कोटिसूर्यांच्या प्रभेप्रमाणें अनेक तेजांच्या समूहानें प्रकाशित केलेला अंतर्भाग यानें वेष्टित होऊन बसलेल्या त्रिभुवनाचार्य विश्वाराध्य

जगद्गुरूंना पाहून, आनंदानें रोमांचित झालेले श्रीरेणुकाचार्य पृथ्वी-पर्यटनांतील आपला वृत्तांत परस्परांना सांगून गंगातीरावर गेले. तेथें असलेले, शिवज्ञान संपन्न तपस्वी, जगद्गुरूंना पाहून आनंदित झाले व गंगावतरणाचें आख्यान करण्यास त्यांनीं विनविलें असतां जगद्गुरु श्रीरेणुकाचार्य म्हणाले:—

'तपस्वी जनहो, प्राचीनकाळीं सूर्यवंशांतील सगरचक्रवर्तीनें इंद्रपद मिळविण्यासाठीं शंभर यज्ञ करण्याचा संकल्प करून नव्याण्णव यज्ञ पुरे केले. व शंभराव्या यज्ञासाठीं दिग्विजयार्थ घोडा सोडला. अशावेळींही जर आपण उदासीन राहूं तर सगर राजाकडून स्वर्गाधिपत्य मिळविलें जाईल असा विचार करून इंद्र, गुप्तपणें मृत्युलोकीं आला व गुप्तवेशानें घोडा पळवून नेऊन पाताळांत तपश्चर्या करीत बसलेल्या कपिलमुनींच्या मागें बांधून आला. इकडे यज्ञशाळेंत यज्ञ-कंकण बांधून बसलेला सगरराजा 'अश्व अजून कां आला नाहीं? आतां काय करावें? यज्ञाला विघ्न उपस्थित झालें.' असें म्हणूं लागला. तेव्हां त्याच्या साठहजार पुत्रांनीं सर्वपृथ्वी पालथी घातली तरीही अश्व आढळला नाहीं, हें पाहून ते पाताळलोकांत गेले असतां, उग्र तपश्चर्या करीत बसलेल्या शीघ्रकोपी अशा कपिलमुनींचे आश्रमांत त्यांना तो दिसला. या तपस्व्यानेंच अश्व आणला, असें समजून त्यांनीं त्याच्यावर दगड फेकण्यास सुरवात केली. विनाकारण होत असलेला हा त्रास कपिलमुनींना सहन न होऊन त्यांनीं आपली क्रोधानलयुक्त दृष्टि त्या साठहजार सगर पुत्रांवर फेकली. त्यामुळें ते जागच्या जागींच जळून खाक झाले. इकडे यज्ञ संपूनही गेला,

कांहीं कालानें सगरराजा पुत्रशोकानें मरण पावला. भस्मीभूत झालेले ते साठ हजार सगर-पुत्र भूतयोनींत जन्मून संचरत होते. सगर-वंशांत पुढें अनेक जन जन्मले पण त्यांना भूतयोनींतून सोडविण्याचें काम कोणाचेंही हातून झालें नाहीं.

याप्रमाणें अनेक वर्षें लोटल्यानंतर सगरवंशांत जन्मलेल्या भगीरथानें आपले साठ हजार पूर्वज सद्गति प्राप्त न होता भूतयोनींत आहेत हें जाणून त्यांना आपण सद्गति मिळवून न दिल्यास आपण जन्मल्याचें सार्थक काय? असा विचार करून व त्यांना सद्गति प्राप्त करून देण्याचा दृढसंकल्प करून त्यानें कपील मुनीकडे प्रयाण केलें, त्यांनीं प्रसन्न होऊन पूर्वजांना सद्गति देण्याचा मार्ग त्याला सांगितला. त्याप्रमाणें भगीरथानें संसार त्याग करून गोकर्णक्षेत्रीं जाऊन जलाहार, वाय्वाहार, निराहार, वगैरे करून पंचाग्नीचे मध्यभागीं बसून अतिशय उग्र अशी तपश्चर्या करण्यास सुरवात केली. त्याच्या तपश्चर्येचें तेज त्रैलोक्याला असह्य होऊं लागल्यामुळें सर्व देव महादेवाकडे गेले. महादेवांनीं देवांना अभयदान देऊन भगीरथाचे तपाला प्रसन्न होऊन हा मोठा राजा असतांही सर्वस्वाचा त्याग करून आपल्या पितरांच्या सद्गतीकरितां प्राणार्पण करण्यास तयार होऊन किती खडतर तपाचें आचरण करीत आहे! अशी कठीण तपश्चर्या करणारे तपस्वी भूलोकावर आहेत! हा माझा परमभक्त म्हणून, याचे मनोरथ आतांच पूर्ण करावे. कारण अवकाश केल्यास याच्या तपज्वालांनीं सर्वलोक भस्मीभूत होऊन जाईल, म्हणून—ते भगीरथाकडे गेले व म्हणाले, 'हे भक्ताग्रणी भगीरथा, तुझी पितृभक्ति, तपस्या व दैवभक्ति पाहून मी

संतुष्ट झालों आहें, तुझ्या या कठोर तपश्चर्येमुळें त्रैलोक्याला त्रास होत आहे. म्हणून ती आतां पुरी कर. सर्व देवता तुझ्या तपोज्वालांनीं हाहाःकार करीत आहेत. तुझ्या इच्छेप्रमाणें देवलोकांतील गंगा मी भूलोकावर पाठवितों, तिच्या जलानें पितरांना पवित्र कर! असें म्हणून त्याचें समाधान करून व अंगावर हात फिरवून देवांनीं गंगेला भूलोकीं जाण्याची आज्ञा केली. परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें गंगामाता सारें जग व्यापून टाकून आकाशमार्गानें येत असतां आकाशांत प्रकाशत असलेले चंद्रादिग्रह वाहून जाण्यास सुरवात झाली. सूर्याच्या रथाचे घोडे सारथी अरुण वाटेल तिकडे वळवूं लागला, गंगौघाच्या प्रचंड निनादामुळें सर्व विश्व दुमदुमून गेलें. अशाप्रकारें गंगानदी आवाज करीत येत असलेला प्रकार पाहून भगीरथानें घाबरून डोळे झाकले व परमेश्वराची प्रार्थना करूं लागला, कीं 'हे महादेवा, गंगा जर भूलोकावर पडली तर सारी पृथ्वीच लयास जाईल, तिचा वेग व विस्तार मी नुसत्या डोळ्यांनीं पाहूंसुद्धां शकत नाहीं, रक्षणकर! रक्षणकर!! असें म्हणून परमेश्वरास शरण गेला, तेव्हां महादेवांनीं सर्वतोमुख होऊन स्वर्गांतून वहात येणाऱ्या गंगेला आपल्या मस्तकावर घेतलें त्यामुळें सर्वव्यापी महादेवाच्या जंगलासारख्या घनदाट जटेंतच सर्व गंगानदी जिरून जाऊं लागली म्हणून भगीरथ पुन्हां चिंतातुर झाला आणि घनघोर तपश्चर्येचें फळ मिळालें तरी तें लाभेना! म्हणून दुःखित होऊन परमेश्वराचा धांवा करूं लागला. तेव्हां महादेवांनीं गंगानदीचा एक पाट आपल्या जटेंतून खालीं सोडला त्या गंगेस घेऊन भगीरथ पाताळांत जात असतां वाटेंत जन्हुऋषींचा

आश्रम लागला तो जलमय झाल्यामुळें जन्हुऋषींनीं संतापून गंगाप्रवाहच पिऊन टाकला; तेव्हां भगीरथ पुन्हां निराश झाला व त्यानें जन्हुऋषींची अतिशय विनवणी केली, तेव्हां त्यांनीं प्रसन्न होऊन तें गंगाजल कानावाटें सोडून दिलें, म्हणून गंगानदीला जान्हवी हें नांव प्राप्त झालें आहे. शेवटीं भगीरथानें गंगामाईला पाताळांत नेऊन भूतयोनींतील आपल्या पितरांना पावन करून त्यानें स्वर्गाला पाठविलें तीच परमपावन गंगानदी ही होय' असें श्रीरेणुकाचार्यांनीं त्या तपस्व्यांना सांगितलें.

महत्प्रयासानें गंगामाईला स्वर्गांतून पाताळांत नेऊन कपिलमुनीच्या क्रोधाग्नीनें भस्म होऊन पिशाच्च बनलेल्या आपल्या पूर्वजांना गंगाजलानें पावन करून त्यांना स्वर्गाप्रत पाठवून दिलें अशा प्रकारें भगीरथराजा कृतकृत्य झाला.

सर्व पापांचें निवारण करणारें व सर्व वैभवदायक असें गंगावतरणाख्यान तपस्व्यांना सांगून व त्यांना वीरशैव तत्त्वज्ञानाचा बोध करून श्रीरेणुकाचार्य आकाश मार्गानें हिमालयावर गेले.

तेथें असलेल्या तपस्व्यांनीं जगद्गुरु रेणुकाचार्यांजवळ जाऊन -पूर्वीं परमेश्वरानें टोणग्याचें रूप धारण करून संचार केला, असें ऐकतों. असें करण्याचें कारण काय घडलें याची कथा सांगून आम्हांला पुनीत करा.—अशी प्रार्थना केली. तेव्हां, ते म्हणाले 'हे मुनीजनहो, द्वापारयुग संपून कलियुग सुरू होणार, म्हणून पांडवांना

चिंता पडली, तेव्हां त्यांनीं आपला नातू परीक्षिती याजकडे सर्व राज्य कारभार सोंपवून परमेश्वराला शरण जाऊन मुक्ति मिळवावी, म्हणून ते कैलासास गेले. पण त्यांना महादेव कोठेंही आढळले नाहींत. याप्रकारें ते हिंडत असतां एकदां भीमसेन अनेक गुहा असलेल्या दोनपर्वतांच्या शिखरांवर दोनपाय ठेवून उभा असतां खालून अनेक रानटोणगे जातांना त्यांना दिसले. त्यांत गवेही होते. त्यांपैकीं एक गवा इतरांपेक्षां अगदीं निराळा होता. त्याचा विलक्षण आकार, विचित्र गति व चमत्कारिक लीला पाहून भीमसेनानें तो धर्मराजाला दाखविला; त्यावेळीं तो डोकें मातींत खुपसून मागीलभाग वर उचलून शेपूट हालवीत होता. तेव्हां धर्मराज, त्या रेड्याचा विनोद पाहून ही परमेश्वरी लीलाच आहे असें मानून सर्व बंधूंसह तेथें हात जोडून उभा राहिला, व हे परमेश्वरा, तुझ्या दर्शनासाठीं राज्य सोडून वैराग्य स्वीकारून या अरण्यांत आम्ही बरेच दिवसांपासून भटकत आहोंत. यापुढें आम्हीं काय करावें व कोठें जावें तें सुचत नसल्यामुळें दिङ्मूढ झालों आहों, म्हणून आम्हांला पुढील मार्ग दाखवून आमचें रक्षण कर, अशी त्यांनीं प्रार्थना केली.

त्यांचें हें भाषण ऐकून त्या महिषानें आपलें शेंपूट उत्तरेकडे हालविलें, ती सूचना समजून धैर्यानें पांडव उत्तरेकडे प्रयाण करून तेथें एकांत–स्थळीं परमेश्वराचें ध्यान करीत असतां ईश्वर प्रत्यक्ष होऊन त्यांचे इच्छेप्रमाणें त्यांना मोक्ष दिला. असा पूर्ववृत्तांत त्या मुनिगणांना सांगून व त्यांना शिवतत्त्वोपदेश करून आशीर्वाद देऊन पुढें प्रयाण करते झाले.

पांडव उत्तरेकडे गेले, तेव्हां एका गुप्तगुहेंत त्यांना परमेश्वराचें मूळस्वरूपांत दर्शन झालें. त्यामुळें त्यांना मुक्ति मिळाली. हा वृत्तांत सांगून व वीरशैवतत्त्वोपदेश करून श्रीरेणुकाचार्य पुढें चालले. हिमालयांत अनेक महर्षि व यतिसमूह यांनीं सेविला जाणारा श्रीमज्जगद्गुरु एकोरामाचार्य यांचा मुनिगणमंडित मठ आहे तेथें ते गेले.

बर्फानें आच्छादित शिखरांनीं सुशोभित आणि संन्यासी जनांकडून सेवित, सिंह, वाघ, हत्ती, वगैरे श्वापदांनीं व्याप्त, अशा त्याभागांतील आश्रमांत श्रीरेणुकगणाधीश आनंदानें प्रवेश करते झाले.

तेथें वैराग्यसिंहासनावर शिष्यगणांसमवेत श्रीएकोरामाचार्य सिंहाप्रमाणें विराजमान झालेले होते. शिष्यांना शिवतत्त्वोपदेश करीत असतांना ते श्रीरेणुकाचार्यांचें आगमन झालेलें पाहातां—क्षणींच संतुष्ट होऊन त्यांचा अभ्युत्थानादिकांनीं सत्कार करून त्यांना मंगल आसनावर बसविते झाले.

श्रीरेणुकाचार्यांना अकस्मात् आलेले पाहून त्यांच्या पवित्र दर्शनानें श्रीएकोरामाचें अंतःकरण भरून आलें. त्यांचा देव शिवलिंगांकित होता, त्यांच्या मस्तकावर इष्टलिंग होतें त्यांनीं मदनाचा मनोभंग केला होता. शिष्यगणांसह ते श्रीरेणुकाचार्यांना सामोरे गेले व आचार्यांना उचित अशा उपचारांनीं त्यांचा सत्कार करून त्यांना पीठावर आरूढ केलें. शिवाज्ञेनुसार भूलोकावर शिवसिद्धांताची स्थापना करण्यास आलेल्या त्या दोघांनीं आपण केलेलीं कार्यें परस्परांना निवेदन केलीं. त्यामुळें संतुष्ट होऊन त्यांनीं पुढील

संचाराचे कार्यक्रमही ठरविले. शिवयोगानंदयुक्त स्थितींत कांहीं दिवस तेथें राहून, विभांडक मुनींचा पुत्र ऋष्यशृंग याचा आश्रम जेथें होता त्या ककुद्गिरीला आकाशमार्गानें श्रीरेणुकाचार्य गेले. या जगद्गुरूंना येतांना दुरूनच पाहून सर्व मुनीगणांसह त्यांचें यथोचित स्वागत करून ऋष्यशृंग महर्षि म्हणाले, 'हे जगद्गुरो, आपल्या आगमनानें हा आश्रम पवित्र झाला आहे. आपल्या दर्शनानें आम्ही सर्व धन्य झालों आहोंत, आतां आपल्या मुखांतून या ककुद्गिरीचें महात्म्य ऐकण्याची आमची इच्छा आहे.'

श्रीरेणुकाचार्य म्हणाले, 'हे मुनीजनहो, प्राचीनकाळीं या पर्वतावर कणादनामक मुनी वास करीत होते. ते नेहमीं भगवद्वाक्यांत आसक्त असून कांहीं दिवस पर्णाहार, कांहीं दिवस जलाहार, कांही दिवस पवनाहार, करीत करीत शेवटीं गवताच्या काडीच्या टोकांवरून गळणाऱ्या पाण्याइतकें पाणी एकवेळ पिऊन पंचाग्निसाधनासारखें उग्र तप ते मुनि करीत असत, म्हणून त्यांना 'कणाद' हें नांव पडलें होतें. या उग्र तपस्येमुळें त्यामुनींचा देह शुष्क होत चाललेला पाहून परमेश्वरानें प्रसन्न होऊन आपल्या मस्तकावर असणारे गंगाजळ त्यांच्यावर शिंपडलें व त्यांना म्हणाले, हे कणादा, तुझी घनघोर तपश्चर्या पाहून मी संतुष्ट झालों आहें. प्राणाधार असलेले अन्नादिकवर्ज करून या पर्वतावर तूं ही उग्र तपश्चर्याकरीत असल्यामुळें तुझा देह क्षीण झाला आहे. तुझ्यासारखा तपस्वी मिळणें अशक्य आहे म्हणून आतां ही उग्र तपस्या पुरी कर. तुझें नाम व हें क्षेत्र त्रैलोक्यामध्यें सतत विख्यात राहो.'

तेव्हांपासून हें क्षेत्र सर्वत्र विख्यात आहे. असें सांगून श्री रेणुकाचार्यांनीं ऋष्यशृंगादि मुनीजनांना शिवतत्त्वोपदेश परशिवमहिम्न व शिवाच्या पंचवीस लीला सांगितल्या आणि त्यांची पूजा घेत तेथेंच कांहीं दिवस राहिले, तेथून मग श्रीरेणुकाचार्य आकाशमार्गानें संयमीऋषींचे बरेच आश्रम व सिद्ध, विद्याधर, गंधर्व वगैरेही ज्या पर्वतावर होते, अशा त्या कुष्मांडपर्वतावर गेले. ऋषींच्या तपप्रभावामुळें सिंह, वाघ, हत्ती वगैरे सर्व प्राणिमात्र आपापलें उपजत वैर विसरून सख्य भावानें रहात होते. अशा प्रकारें चोहोंकडून हा पर्वत शोभायमान दिसत होता.

त्या पर्वतावर गुहगिरी, ब्रह्मगिरी, विष्णुगिरी, नंदगिरी, दिव्यागिरी असे पांच उपपर्वत होते. त्यांवरून क्षीरापगा वगैरे पवित्र व मनोहर नद्या वहात होत्या. त्यांच्या जलाचें स्नान, पान, दर्शन व स्पर्शसुद्धां जन्ममरणाच्या फेऱ्याचे पाश तोडण्यास समर्थ होतो. परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठीं गजानन, षडानन, चतुरानन, नारायण वगैरे देवांनींही त्या पर्वतावर उग्र तपाचरण करून परमेश्वराच्या कृपेनें इष्टार्थ प्राप्ति करून घेतली. अशा या पवित्र पर्वतावर पुलस्त्य, कौशिक, भृगु, दधिचि, रोमश, गौतम, अत्रि वगैरे महर्षि रहात होते. त्यांनीं श्रीरेणुकाचार्यांना पाहून साष्टांग प्रणाम केला. व म्हणाले, ‘ हे जगद्गुरो, आमच्या पुण्यप्रभावानेंच आपलें दर्शन आम्हांला झालें; म्हणून आम्ही धन्य होय. या कुष्मांडगिरीला नंद-गिरी, म्हणतात तें कां? त्याचें वर्णन करून आपण आम्हांला उपकृत करा.’

तेंव्हां श्रीरेणुकाचार्य म्हणाले, 'हे मुनीजनहो, पूर्वी नंदीश्वर, -'भ्रमराच्या ध्यासानें कीटकही भ्रमर होतो' त्याप्रमाणें—शिवध्यानानें शिवस्वरूपी बनून शिवसान्निध असतांना, एकदां परमेश्वरानें आपल्या अर्धांगी पार्वतीस बोलाविण्यास त्याला पाठविलें. शिवस्वरूपसमान नंदीश्वराला पाहून पार्वतीला प्रत्यक्ष परमेश्वरच आपल्याकडे आल्या-सारखें वाटलें; तरीपण पार्वतीला घेऊन नंदीश्वर परमेश्वराजवळ आला.

भक्ताग्रणी नंदीश्वराला तो प्रकार पाहून विशाद वाटला. 'जगज्जननी मलाच शिव समजली! माझ्या हातून हा केवढा अपराध घडला? आतां याला उपाय काय? असा विचार करीत तो परमेश्वरासमीप आल्यावर त्यानें आपला मित्र कुष्मांडक याला जवळ बोलावून म्हटलें, 'मित्रा, चंद्रशेखरत्त्व, गंगाधरत्त्व, वगैरे शिवसमान गुणप्राप्त झालेल्या मला पाहून जगन्माता पार्वतीला परमेश्वरच आल्याची भ्रांति झाली. हा प्रकार माझ्या मनाला सारखा खात आहे. यांतून सुटका होण्यास उपाय काय?' तेंव्हां त्याचें सांत्त्वन करून कुष्मांडक म्हणाला, 'तूं याच क्षणीं भूलोकीं जाऊन कुष्मांडक पर्वतावर राहून तपश्चर्या कर. असें करून जर तूं दयाघन परमेश्वराला संतुष्ट करशील तर तत्क्षणींच तुझें सर्व पाप दूर होईल आणि त्रैलोक्यभर तुझी कीर्ति पसरेल.

त्याप्रमाणें कुष्मांडक पर्वतावर तप आचरून या पापापासून मुक्त झाल्यावर नंदीश्वर रजतपर्वतावर गेला. शिवसायुज्यता पुन्हां त्याला प्राप्त झाली व त्यामुळें या पर्वताला हें नांव प्राप्त झालें.

याप्रमाणें तेथील मुनीजनांना सांगून श्रीरेणुकाचार्य तेथून निघाले. वाटेंत त्यांनीं पंपाक्षेत्र पाहिलें. हें क्षेत्र चारी दिशांना किन्नरेश्वर, जंबुकेश्वर, सोमेश्वर व पाणिभद्रेश्वर या द्वारपालक देवतांकडून संरक्षित, तुंगभद्रातीरालंकृत व वाटसरूंचे श्रम हरण करण्यास योग्य असलेल्या हवेनें युक्त असें होतें. तेथें विरुपाक्ष क्षेत्राधिपति होऊन कोट्यावधि भक्तांचा उद्धार करीत असे. अशा या पवित्र क्षेत्रांत श्रीरेणुकाचार्यांनीं कांहीं कालपर्यंत वास करून नंतर गोगिरी, भैरवगिरी वगैरे पर्वतांनीं वेष्ठित व अगणित शिवलिंगांनीं मंडित असें उज्जयिनी क्षेत्र आहे; तेथें गेले. या क्षेत्रामध्यें हराप्रमाणें पार्वतीसहित किंवा सर्व मंगलोज्वल, नारायणाप्रमाणें लक्ष्मीविलासास्पद किंवा ऐश्वर्यशाली व पाताळाप्रमाणें नागरत्न विराजमान किंवा ऐरावतयुक्त, अशा उज्जयिनी क्षेत्राजवळ शोभत असलेल्या वटक्षेत्रामध्यें 'सद्धर्मपीठ' अशा या धर्मपीठांत वेदाध्ययन करणारे अनेक ब्रह्मचारी रहात होते. पीठाधिपतींच्या दर्शनास अनेक सामंत व चक्रवर्ती येत असत. आपल्या संचारांनीं भूमंडल पावन केलें आहे, लिंगांगैक्यस्वरूपी शिवविद्येंत पारंगत असलेले, दुष्टशासन व शिष्यरक्षण या कामांत निष्णात असलेले, धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त करून देण्यास समर्थ व ज्यांची कीर्ति दिगंत पसरली आहे. असे श्रीजगद्गुरु मरुळाराध्य या पीठावर शोभत होते. अशा या उज्जयिनी क्षेत्रांत प्रवेश करून श्रीरेणुकाचार्यांनीं श्रीमरुळाराध्यांची भेट घेतली. परस्पर, नमस्कार, समाचार कथन झाल्यावर दोघांनीं स्थापन केलेल्या वीरशैवसिद्धांताच्या प्रचार कार्यासंबंधीं आपापसांत

वाटाघाट केली. व कांहीं दिवस तेथें राहून सर्व मंगलांचें आगर अशा मंगळवेढें नगरीस आकाशमार्गानें श्रीरेणुकगणाधीश्वर गेले.

या नगरींत परम शिवभक्त असा बिज्जळराजा राज्य करीत होता. तो बऱ्याच काळापासून राजनीतीचें उल्लंघन करून धन, सत्ता व यौवन वगैरेमुळें मदोन्मत्त होऊन प्रजेला फार छळीत होता. नगरींत संचार करतांना त्यांनीं, प्रजा परस्परांत राजासंबंधीं करीत असलेली टीका ऐकिली. त्याला ताळ्यावर आणण्यासाठीं लीलामात्रें-करून श्रीरेणुकाचार्य राजवाड्यांत गेले व हे राजा, कांहीं भिक्षा वाढ; फार भूक लागली आहे; असें जोरानें म्हणाले. उन्मत्तस्वभावाचा असा वीर बिज्जळ त्या भिक्षुकाचा दीन आवाज ऐकून थोडीसुद्धां करुणा न येतां युक्तायुक्ततेचा विचारही न करतां कोणीएक धूर्त शिखामणी माझ्या राजवाड्यांत येऊन निर्भयपणें भिक्षामागत आहे त्याचें धैर्य व गर्व केवढा आहे! असें अंतःकरणांत बडबडत जाऊन स्वयंपाक्याला बोलावून 'कढत अशी खीर आणून त्याचे हातांवर वाढ' अशी आज्ञा केली. त्याप्रमाणें चुलीवर शिजत असलेली खीर आणून पुढें केलेल्या ओंजळीत ओतली त्या बरोबर श्रीरेणुकगुरुवर्यांनींही त्या राजाची अशी असाधारण दुर्वृत्ति पाहून कठोर अंतःकरणाला स्मरत ओंजळींत वाढलेली शिजत असलेली ती खीर समोरच असलेल्या खांबाला लेपली. लगेच तो खांब पेटून त्यानें सर्व राजवाडा भस्मसात केला. हा प्रकार पाहून प्रजा ठिकठिकाणीं उभी राहून हाहाःकार करीत होती. तो प्रकार पाहून पश्चात्ताप अंतःकरणानें मूर्च्छित होऊन व अल्पावकाशानें सावध होऊन राजा म्हणाला, अहाहा!

माझा गर्वच माझे नुकसानीला कारणीभूत झाला मजकडून प्रजेला होणारीं दुःखें परमेश्वराला सहन न होऊन मला ही शिक्षा झाली आहे. हा, ईश्वरप्रेरणेनें आलेल्या महात्म्याशिवाय दुसरा कोणी नाहीं. तसें जर नसतें तर सामान्य माणसाकडून हें कार्य होतेना. असा विचार करीत व भयभीत होऊन हात जोडून गुरूसमोर येऊन ‘हे कृपासागरा, दीनबंधो, दुष्टांना शिक्षा करणाऱ्या, माझे सर्व अपराध क्षमा कर. हे जगद्गुरो, माझ्यासारखा पापी दुसरा कोणी नाहीं. करूं नये असें घनघोर कृत्य मीं केलें आहे; त्याची क्षमा करा. अमृतमय अशा आपल्या अंजलीमध्यें मीं कढत खीर ओतली ना! अरेरे! किती मी निर्दय! पुन्हां मी असला अपराध करणार नाहीं, माझें रक्षण करा.’ मीं पुन्हां देतों ती भिक्षा स्वीकारा. तेव्हां श्रीरेणुकाचार्य म्हणाले माझ्या सर्व शिष्यगणांला तूं भिक्षा देशील तरच ती मला इष्ट आहे; एरवीं नाहीं.

असें म्हणून त्यांनीं आपल्या लीलेनें असंख्य प्रमथ तेथें प्रगट केले. दाही दिशा व्यापलेले ते प्रमथ गण पाहून राजा म्हणाला, हे गुरुवरा, इतक्यांना अन्नदान करण्याची शक्ति मला नाहीं, मी यःकश्चित पामर आहें, तेव्हां श्रीरेणुकाचार्य म्हणाले, तुझा गर्व हरण करण्यासाठींच मीं हा चमत्कार केला. आतां एक पावशेर तूप व पावशेर तांदूळ मात्र दे.

राजानें तेवढें दिल्यावर श्रीरेणुकाचार्यांनीं तें घेतलें व तेवढ्या-साहित्यावर विविध, भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य, पाणीय इत्यादि रूपानें पदार्थ निर्माण करून त्यासर्व प्रमथगणांना अमृतान्नानें तृप्त

केलें. असा हा संतांचा प्रभाव असतो. तो प्रकार पाहून राजा व प्रजागण चकित झाला, व जगद्गुरूंच्यापुढें लीन झाला. गर्व सोडून राजा म्हणाला, ‘हे जगद्गुरो, मी आपणांला प्रथम सामान्य मनुष्य समजलें, आपल्या प्रभावामुळें माझा सर्व अहंकार नष्ट झाला आहे. मदोन्मत्त होऊन मीं पुष्कळ अनाचार व अत्याचार केले आहेत, दानधर्माला राक्षसीकाम मानलें. त्रैलोक्यांचा स्वामी मीच आहें असें मी समजलों. माझ्यासारखा मूर्ख कोणीच झाला नसेल. आपल्या चमत्कारामुळें माझ्या अंतःकरणांत ज्ञानसूर्य उगवला व गर्वांधःकार दूर झाला, त्यामुळें आतां मला पाप व पुण्य यांतील फरक कळूं लागला आहे, माझी सर्व पापें माझ्या डोळ्यांपुढें येत आहेत; आतां माझें रक्षण करा.’ तेव्हां श्रीरेणुकाचार्य म्हणाले, ‘हे राजा भूलोकावर मजसमान कोणीही नाहीं हा तुझा गर्व नाहींसा करून तुझ्यामध्यें आस्तिक्यभाव उत्पन्न करण्यासाठींच मी हा चमत्कार केला, यापुढें तूं प्रजेचें चांगलें रक्षण कर. कारण प्रजारक्षण हेंच राजधर्माचें मूळ आहे. हा देह बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर आहे. सारें वैभव दीपज्योतिप्रमाणें चंचल असतें, कमलपत्रावरील जलबिंदूप्रमाणें आयुष्य अस्थिर आहे, चतुर्विध पुरुषार्थांत ‘मोक्ष’ हाच मुख्य होय. मोक्षप्राप्तीसाठीं धर्माचरण केलें पाहिजे. लोककल्याणासाठींच राजधर्म सांगितलेला आहे, दुष्टांना त्यांच्या अपराधानुसार शासन कर, कारण शासनाशिवाय प्रजारक्षण होणार नाहीं. कामक्रोधादिकांना वश होऊन मनुष्यमात्र परस्परांना पीडक होतात. ती पीडा नाहींशी करण्यासाठींच राजधर्म सांगितला आहे. जो राजा प्रजेकडून अन्यायानें द्रव्य घेतो तो

धर्मद्रोहीच होय, त्याला नरकच प्राप्त होतो. प्रजेंत विद्या; नीति, वैभव वगैरेची वाढ करीत प्रजेच्या सुखदुःखांतच आपलें सुखदुःख पाहाणारा राजाच परमेश्वराच्या कृपेला पात्र होतो; म्हणून तूं, हें शरीर नित्य आहे असें समजून धर्म न संपादल्यामुळें नाश पावूं नकोस, तूं धर्मशील झाल्यास पुढें अतिसंपन्न होशील, प्रजेकडून स्तुतीस पात्र होशील, गर्वानें अनेक राजांचा नाश झाला आहे; प्रजेचें पुत्र भावनेनें रक्षण कर, पापकृत्याकडे मन ठेवूं नकोस, गुरुजन व ईश्वर यांच्याठिकाणीं भक्ति करणारा हो. असा उपदेश करून आशीर्वाद दिला.

याप्रमाणें बिज्जळराजाचें गर्वहरण करून व त्याला सद्बोधामृत पाजून लीला-मूर्ति जगद्गुरु रेणुकाचार्य पुढें चालले असतां राजानें खिन्न अंतःकरणानें 'शिवागमोक्त व प्रभावी असें तत्त्वज्ञान सांगा' अशी प्रार्थना केल्यावरून जगद्गुरूंनीं वेदागमांत वर्णिलेलें गुरुभक्तिप्रधानात्मक षट्स्थल, अष्टावरण, पंचाचार वगैरे वीरशैवतत्त्वज्ञान राजाला सांगितलें.

शेवटीं राजाचे नमस्कार स्वीकारीत व त्याला आशीर्वाद देत श्रीजगद्गुरु रेणुकाचार्य आकाशमार्गानें श्रीशैल पर्वताला गेले.

श्रीरेणुक विजयः द्वितीय मंजिरी समाप्त.

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ॥



श्री रेणुक विजयः

तृतिय मंजिरी.

ब्रह्मा, विष्णू, इंद्र, अग्नि, यम, वायु वगैरे देवतांचें निवासस्थान; सर्प, हत्ती वगैरे प्राण्यांचें स्वतंत्रपणें संचरण्याचें स्थान, अशा श्रीशैल पर्वतावर आल्याबरोबर श्रीरेणुकाचार्यांना अतिशय समाधान झालें. सकल जगज्जननी भ्रमरांबा व श्री मल्लिकार्जूनस्वामी यांचें वास्तव्य एथें होतें. गगनचुंबित पर्वत शिखरें, तपस्व्यांच्या पर्णशाला, वगैरेंनीं हा पर्वत शोभायमान झाला होता. वाघ, सिंह, लांडगे वगैरे हिंस्त्र पशू; हरिण, ससे, गवे, हत्ती वगैरे वन्यप्राणी यांचें हा पर्वत माहेर-घर बनला होता. यापर्वतावरील लताकुंजांतून सिद्ध, साध्य, गंधर्व वगैरे देवतांचीं जोडपीं वेणू वादनासह गीतें गात फिरत होतीं. हे रागालाप ऐकून सर्प, पशु, पक्षी वगैरे प्राणी तल्लीन होत होते. पारधी वगैरे जंगलांतच राहणारे लोक गुहांतून आपापल्या कुटुंबांत रममाण झाले होते.

या पर्वताच्या पूर्वेस त्रिपुरारी शिवलिंग, पश्चिमेस ब्रह्मेश्वर शिवलिंग, दक्षिणेस ज्योतिःसिद्धवट, उत्तरेस महेश्वरलिंग व मध्यभागीं मल्लिकार्जून नांवाचें महालिंग असल्यामुळें श्रीशैलपर्वत सर्व पर्वतांमध्यें श्रेष्ठ ठरला होता. पृथ्वीला आधार असलेल्या सात पर्वतांस व मेरू पर्वतासही श्रीशैलपर्वत मागें टाकीत होता.

जगद्वल्लभ परमेश्वराच्या जटेंत मी असणारी, माझ्या जलाचें स्नानकरून सर्व लोक पापमुक्त होतात, यज्ञयागादि कर्में न करतां सुद्धां देव, मनुष्य व तिरीयंच माझ्या जलपानमात्रें करूनच मोक्षपद मिळवितात, इतर नद्यांप्रमाणें कोणत्यातरी पर्वतांत उगम पावून ऋषि, मुनी माझ्यातीरांवर रहातात, म्हणून पावन झालेली मी नव्हे. मी स्वर्गांतून परमेश्वराच्या आज्ञेनें मर्त्य व पाताळ लोकांत आल्यामुळें मूलतःच पावन आहे. माझ्यासारखी यात्रैलोक्यांत कोणी नाहीं असें म्हणून जणूंकाय? हासतच आहे. अशा स्फटिकप्राय शुभ्र जलाची पाताळगंगा या पर्वताजवळूनच वहात आहे.

कलि कलुष विभंगा पादकोद्यत्तरंगा ॥
मनुज मृग पतंगा स्वाद्य मानांबु भंगा ॥
कलित लसद नंगा राति चूडानुषंगा ॥
वहति महिम तुंगा यत्र पातालगंगा ॥ १ ॥

याप्रमाणें पूज्य असलेल्या या पाताळगंगा नदीच्या दोन्ही तीरांवर आंब्रा, फणस, केतकी, सागवान वगैरे प्रचंड वृक्षांच्या रांगा वाढल्या असून क्षेत्र दर्शनासाठीं येणाऱ्या यात्रेकरूंचें स्वागत गंगादेवी फलपुष्प-

युक्त हस्तांनीं करीत आहे कीं काय? असेंच त्या रांगा पाहून वाटतें. आपली सेवा करण्यास येणाऱ्या भक्तांना ती स्वहस्तानें प्रसाद देत आहे कीं काय? असें तिच्या लाटांनीं उत्पन्न झालेला फेस हा कांठाला येऊन सांठत होता त्यावरून वाटत होतें. अशी ती पाताळगंगा व श्रीशैलपर्वत पाहून श्रीरेणुकाचार्यांचा प्रवासांतील शीण नाहींसा झाला. जगद्गुरूंनीं पाताळगंगेचें स्नान करून व दर्भासनावर बसून भस्म व रुद्राक्ष हीं धारण केलीं. आणि नमक, चमक; पंचब्रह्म इत्यादि-मंत्रांनीं इष्टलिंगास अभिषेक करून सहस्रनामांनीं लिंगाराधन केलें, व जपजाप्य आटोपून आणि गंगाजलानें कमंडलू भरून घेऊन श्रीशैलाच्या मध्यभागीं असलेल्या मल्लिकार्जून लिंगमंदिरांत शिव-नामोच्चार करीत त्यांनीं प्रवेश केला. व तेथें पुढीलप्रमाणें प्रार्थना केली. ‘हे देवाधिदेवा, वेदागमवेद्या, मुनीजनमानसराजहंसा, तुझ्या आज्ञे प्रमाणें कैलासाहून निघून भूलोकावर अवतरलों व पृथ्विर संचार करून वीरशैवसिद्धांताची प्रतिस्थापना करीत पवित्र अशा तुझ्या या स्थानीं आलों आहें. तेव्हां यापुढील कार्यक्रम आतां सांग! असें म्हणून शिवलिंगाचें ध्यान लावून श्रीरेणुकाचार्य उभे असतां कोटि-विजांच्या कडकडाटा-प्रमाणें आवाज झाला. कारण-त्या मल्लिकार्जून लिंगांतून त्रिशूलधारी, दशहस्त, त्रिनेत्रविभूषित, सुवर्णजटाधारी, कोटि-सूर्यसमप्रभ, सर्पभूषण, व्याघ्रचर्मांबरधारी, सद्योजातादि पंचमुखयुक्त, चंद्रकलाधारी, गंगाधर, वृषभवाहन, असे पार्वतीसहित परमेश्वरच, प्रत्यक्ष प्रगट झाले. त्यावेळीं ब्रह्मदेव आपल्या चारमुखांनीं ऋग्वेदादि चार वेद म्हणत होता. शंख, चक्र; गदाधारी विष्णू श्रीरुद्राध्याय म्हणत

होता, नंदीश्वर सुवर्णदंड हातीं धरून समोर उभा होता; उजव्या बाजूस मूशकवाहन गणराज व डाव्या बाजूस मयूरवाहन षण्मुख विराजमान झाला होता; महाकाल, चंडेशादि प्रमथगण सभोंवार उभे असून शिवस्तवन करीत होते. ती शिवसभा पाहून जगद्गुरु श्रीरेणुकाचार्य आनंदानें रोमांचित झाले. परमेश्वरांनीं मंदहास्य करून त्यांच्याकडे पाहून म्हटलें, 'हे प्रमथाधिपा, तुझ्या इच्छेप्रमाणें प्रगट झालों आहें, तूं जेथें आहेस तेथें मी आहेंच; स्वस्थ चित्तानें तूं आपल्या कार्यांत मग्न रहा, आतांपर्यंत तूं माझ्या इच्छेप्रमाणें भूलोकांतील जनांना शिवसिद्धांत व शिवोपासना सांगितली आहेस; तसेंच पुढेंही कार्य करून त्यांचें कल्याण कर. तत्त्वसाक्षात्काराला कारण असलेल्या ज्ञानक्रियेचें स्वरूप ओळखून शिवभक्तीचा प्रसार करून तुझ्या धर्मपीठाला गुरुपट्ट स्थिर करून परत माझ्याकडे ये. कलिकाल प्रारंभापासून लोकांत अधर्म वाढत आहे व धर्मनिष्ठा कमी होत आहे. अधर्माच्या वाढीला आळा बसेल असें करून मानवांच्या हृदय भूमींत शिवभक्तीचें बिजारोपण कर. त्याला विवेकाचें पाणी मिळत राहील व नास्तिकमताचें तण वाढणार नाहीं. असा बंदोबस्त करून परत ये. त्या बीजाचा मोठा वृक्ष होऊन पुढें त्याला मुक्तीचीं फळें येतील. लोकरक्षण राजांचे हातीं आहे, पण ते राजे धार्मिक असतील तरच तें होईल व त्यांची प्रजाही धर्मशील राहील. कांहीं राजे विषयांध बनून प्रजापीडक बनतात. त्यांचा बंदोबस्त करून नैतिक, धार्मिक, तात्त्विक, वगैरे नियमांची स्थापना कर. गुरुशिष्य संबंधाचें महत्त्व व तें नातें तोडल्यास होणारी हानि यांचें स्पष्टीकरण

वेदागमांतील आधार दाखवून कर. जलांतील कमलाप्रमाणें तूं निर्लेप रहा, तुझ्या धर्मकार्याचा विजय होवो, या जगांत तुझी कीर्ति शैव-साम्राज्यशासक म्हणून होवो. असा आशीर्वाद देऊन परमेश्वर अंतर्धान पावले.

श्रीजगद्गुरु रेणुकाचार्य शिवाज्ञा प्रमाण मानून श्रीमल्लिकार्जुन मंदिराबाहेर आले व त्याच पर्वतावर असलेल्या जगद्गुरु श्रीपंडिताराध्यांच्या आश्रमाकडे गेले. महाज्ञानी पंडिताराध्यांनीं रेणुकाचार्यांना पाहतांच संतोषित होऊन अभ्युत्थान वगैरे उचित सत्कार करून त्यांना पीठावर बसविलें. व आपापलें कार्य परस्परांनीं निवेदन केलें. शेवटीं रेणुकाचार्य म्हणाले, 'हे गणपुंगवा, आपल्या दर्शनानें मला आनंद झाला आहे शिवाज्ञेनुसार हिमाचल, मलयाचल वगैरे नानाक्षेत्रीं जाऊन महर्षि अगस्त्यादि मुनींना षट्स्थलादि शिवसिद्धांताचा बोध करून व शिवोपासनेची प्रतिष्ठापना करून आतां मी या पवित्र स्थानीं आलों आहें.' नंतर श्रीपंडिताराध्यांनीं केलेल्या शिवसिद्धांत प्रचारकार्याची हकिकत त्यांच्या मुखानें ऐकून संतोषित होऊन तेथें कांहीं दिवस राहून, श्रीरेणुकाचार्य त्यांची आज्ञा घेऊन आकाशमार्गानें पुन्हा मलयगिरीला परतले.

श्रीशैलक्षेत्रीं श्रीशंकराचार्य, चंद्रमौलीश्वराचा साक्षात्कार होण्यासाठीं अनशन (कांहीं न खाणें) व्रत पत्करून शिवध्यान करीत अनेक दिवस तपश्चर्या करीत बसले होते. त्यांची ती उग्र तपश्चर्या पाहून परमेश्वर एक दिवस आकाशवाणीनें म्हणाले, 'हे मुने, तूं

चंद्रमौलीश्वरनामक लिंग प्राप्त करून घेऊन त्याचें पूजन व ध्यान कर, म्हणजे मी तुला प्रत्यक्ष दिसेन, तें शिवलिंग तुला श्रीरेणुकाचार्य-नामक गुरूत्तमाकडून मिळेल.' ती आकाशवाणी ऐकून आश्चर्यचकित होऊन श्रीशंकराचार्य आपल्याशींच म्हणाले, 'माझे मनोरथ आज सफल झाले, आतां श्रीरेणुकाचार्यांचा शोध करून मी यशस्वी होईन.' असा निर्धार श्रीशंकराचार्यांनीं केला व शिवस्मरण करून श्रीरेणुकाचार्यांच्या शोधाकरितां त्यांनीं तेथून प्रयाण केलें. पुढें त्रिलिंग, अंग, वंग, कलिंग, कोंकण, केरळ, कुंतल, नेपाळ, चोळ, काश्मिर, गुर्जर, मालव, मगध, पांड्य, पारियात्र, पारसिक वगैरे अनेक देशांतून संचार करीत श्रीशंकराचार्य चालले असतां, त्यांना श्रीरेणुकाचार्य कोठेंही न भेटल्यामुळें ते फार खिन्न झाले. शेवटीं सर्व संपत्तीचें माहेरघर, अतिवृष्टि व अनावृष्टि वगैरे आपत्तीरहित, नानातऱ्हेच्या पिकांनीं मनोहर बनलेला, अतिशय दुधाळगाईंचें आगर, व नारळी, पोफळी, आंबा, फणस वगैरे फळांच्या बागांनीं रमणीय बनलेला कर्नाटक अशा देशांत ते आले. तेथील सर्व तपोवनें व आश्रम पहात, पहात ते सर्व पर्वतांत शिखारत्न समान असलेल्या मलयगिरीवर आले. त्यापर्वताचे मध्यभागीं भ्रमरांच्या गुंजारवानें भरलेल्या आम्रवृक्षांनीं व नानातऱ्हेच्या लतांनीं व्याप्त असलेल्या श्रीरेणुकाचार्यांच्या आश्रमांत ते आले. त्या आश्रमांत सत्याहत्तर हजार महर्षि शिवज्ञान संपादन करून शिवसायुज्य मुक्तीची वाट पहात राहिले होते, त्यांपैकीं कांहीं शिवपूजेसाठीं दर्भ, पत्र, फल, पुष्प वगैरे जमविण्यांत गुंतले होते. तर कांहींजण चंदनवृक्षांचे

फांद्यांवर आपलीं वल्कलें सुकत टाकण्यास गुंतले होते, कांहींजण जवळच वहात असलेल्या कल्याणकारक व पवित्र अशा भद्रानदींत स्नान करीत होते, तर कांहींजण तेथील झाडांच्या सावलींत बसून शिवयोगानुष्ठानांत मग्न झाले होते, कांहींजण तत्वमस्यादि महावाक्यांचें परिशीलन करीत होते, तर कांहींजण ऋषिपुत्रांना पाठ सांगत होते; ऋषिकुमार वाघांवर बसून इकडे तिकडे खेळत होते, आश्रमापुढील आंगणांतून धान्य वाळत टाकलें होतें; ऋषिपत्न्या ईश्वरीमहात्म्य वर्णन करणारीं गाणीं म्हणत होत्या, कांहीं मृग रवंथ करीत ठिक-ठिकाणीं बसले होते, द्विजपात म्हणजे ब्राह्मणांचा अधःपात किंवा पक्ष्यांचें पतन या आश्रमांत कधींही होत नसून म्हातारपणीं मात्र द्विजपात म्हणजे दंतपतन (दातपडणें) होत होतें. श्रीफलाची म्हणजे वैभवांची इच्छा तेथें कोणीच करीत नसे, मात्र श्रीफलाची नारळ, किंवा बेलफळांची इच्छा वानर करीत. भोग कोणालाही नको होते मात्र तेथील नागांना भोग म्हणजे फणा होती; येथें असमाधान त्यांच्या शत्रूशिवाय कोणालाही नव्हतें; भूति म्हणजे संपत्ति कोणाजवळही नसून भूति म्हणजे राख मात्र विस्तवावरच होती, पक्षपात म्हणजे कपट कोणामध्येंसुद्धां नव्हतें मात्र पक्षपात म्हणजे पिसांचे पतन पक्ष्यांच्या बाबतींत होतें, कुलहति म्हणजे कुलक्षय येथें कोणाचाही होत नसून वाइटाची कुलहति म्हणजे परंपरा नाश येथें होतो. गणासक्ति कोणालाही नव्हती मात्र ती मृगांना होती; येथें अधोगति रोपट्यांच्या मुळांशिवाय कोणाचीच होत नव्हती; काठिण्य कोणामध्येंही नव्हतें मात्र तें दगडांत होतें.

अशा या परमपवित्र आश्रमाच्या मध्यभागीं सूर्यासारखें प्रकाशमान छत्तीस रुद्राक्षांच्या मालेनें मंडित अशा जटा मस्तकावर धारण करणारे; हिरवें वस्त्र, अश्वत्थ (पिंपळ) दंड, हिरव्या रंगाचा कमंडलू, भस्माची धुंटिका व भिक्षापात्र या पांचमुद्रा धारण करणारे, रुद्राक्ष म्हणजे शंकराचे नेत्र, हरण करणाऱ्या पार्वतीप्रमाणें रुद्राक्षहारी परमेश्वराप्रमाणें भस्मधारी, प्रसादपंचाक्षरी मंत्राचा जप करणारे, त्रिभुवनाचार्य, अशा श्रीरेणुकाशिवाचार्यांना सिंहपीठावर विराजमान असलेले त्या शंकराचार्यानें पाहिले.

तेव्हां त्या मुनीनें प्रणाम करून अर्घ्यपाद्यादि उपचारानें त्यांचें पूजन करून आनंदित होऊन आपणाला कृतकृत्य मानून घेतलें व परमेश्वरासमान तेजोमय मूर्ति अशा आचार्यांची स्तुति अत्यंत भक्तीनें करण्यास त्यांनीं सुरवात केली.

नमो नमस्ते शिवभक्त पक्ष ।
नमो नमस्ते सुजनालि वक्ष ॥
नमो नमस्ते परवादि रुक्ष ।
नमो नमस्ते विजितारिवलाक्ष ॥ १ ॥

हे सुजनांच्या समुदायाचे रक्षण कर्त्या, शिवभक्तांच्या पक्षपाती आचार्य, परमतांचें खंडन करणाऱ्या व सर्वांना जिंकणाऱ्या अशा तुला वारंवार नमस्कार असो.

नमो नमो मोक्ष विचार दक्ष ।
नमो नमो वेद विदान शिक्ष ॥
नमो नमः पापकृतां विपक्ष ।
नमो नमो रेवण कल्पवृक्ष ॥ २ ॥

हे मोक्षमार्गाचा विचार करण्यांत दक्ष असणाऱ्या, वेदविधीचा उपदेश देणाऱ्या, पापी लोकांच्या शत्रो, हे कल्पवृक्षा रेवणसिद्धा तुला पुन्हा पुन्हा नमन असो.

भद्रांकुराय भजतामभयंकराय ।
मोहांधकाररवयेकवये मनूनाम् ॥
कैवल्य कल्प तरवे गुरवे गुरूणां ।
श्रीरेणुकाय गणपाय नमोऽस्तुतुभ्यं ॥ ३ ॥

हे कल्याणरूपी वृक्षाच्या अंकुरा, भक्तांना अभय देणाऱ्या, मोहांधकाराचें निवारण करणाऱ्या सूर्या, आद्यकविश्रेष्ठा, कैवल्यकल्पवृक्षा, जगद्गुरो, गणाधीशा, रेणुकाचार्या, तुला अनेकवार नमन असो.

न शेवे रमेशं न शेवे प्रजेशं ।
न शेवे सुरेशं न शेवे गणेशं ॥
महेश प्रभावं महाचार्य देवं ।
महोबद्ध देहं भवंतं भजेऽहम् ॥ ४ ॥

मी रमापतीची पूजा करीत नाहीं, ब्रह्मदेवाचें पूजन करीत नाहीं, इंद्राचें स्तवन करीत नाहीं, गणपतीचें करीत नाहीं, परमेश्वरी प्रभावाच्या महाचार्य देवांचें म्हणजे आपलें मात्र भजन करीत आहें.

संसारामय सद्वैद्यज्ञानसागर वर्धन ।
सर्वज्ञ सकलाधार सर्वाभीष्ट फलप्रद ॥
केनचित्कारणेनाहम् शिववाक्यानुसारतः ।
गुरोत्वदंतिकम् प्राप्तः प्रसीदकरुणानिधे ॥ ५ ॥

आपण संसाररूपी रोगावर सद्वैद्य आहांत, ज्ञान सागराचें वर्धन करणारे आहांत, सर्वज्ञ व सर्वांचे आधारस्तंभ आहांत, सर्वांचे मनोरथ पूर्ण करणारे आहांत, कोणत्यातरी कारणानें शिवाज्ञेनुसार हे जगद्गुरो, मी आपल्याजवळ आलों आहें. हे करुणानिधे, माझ्यावर कृपा करा."

वरीलप्रमाणें असामान्य भक्तिभावानें श्रीरेणुकगणाधीशांचें स्तवन करून आपल्या आगमनांचें कारण सांगण्यास शंकराचार्यांनीं प्रारंभ केला. 'हे महात्मन्, परमपवित्र श्रीशैलपर्वतावर परमेश्वराचें साक्षात् दर्शन व्हावें म्हणून मीं बरेच दिवसपर्यंत कठोर तपश्चर्या केली, एके दिवशीं हे मुने, 'तूं चंद्रमौलीश्वर नामक लिंगाची पूजा कर म्हणजे मी प्रत्यक्ष प्रगट होईन.' हें लिंग रेणुकाचार्य नामक गुरुवर्यांकडून तुला प्राप्त होईल 'म्हणून त्यांच्याकडे जा!' अशी आकाशवाणी झाली.

या आकाशवाणीवर विसंबून अनेक देश हिंडत हिंडत मोठ्या प्रयासानें आज मी आपलें दर्शन घेऊं शकलों आहें, म्हणून हे जगद्गुरो, आतां चंद्रमौलीश्वरलिंगाचा माझ्यावर अनुग्रह करून माझा

उद्धार करा.' वरील प्रार्थना ऐकून संतुष्ट होऊन शंकराचार्यांचा उद्धार करण्याची इच्छा असलेल्या रेणुकाचार्यांनीं त्या मुनीवराला त्यावेळीं आनंदानें सर्वार्थसाधक असें लिंगप्रदान केलें. (चंद्रमौलीश्वरलिंग दिलें.)

आपल्या करकमलांत अतिशय भक्तीनें तें लिंग धारण करून शंकराचार्य उमानाथाचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं तुंगभद्रानदीचें कांठीं गेले.

याप्रमाणें सकलार्थसिद्धीप्रत श्रीचंद्रमौलीश्वरलिंग शंकराचार्यांना प्रदान करून श्रीरेणुकाचार्य मलयपर्वतावरच शिवयोगानंदांत कांहीं दिवस राहून आकाशमार्गानें चोल देशाला गेले.

तो देश अनेक सरोवरांनीं, गगनचुंबितगोपुरें असलेल्या देवालयांनीं, असंख्य अन्नसत्रांनीं, उतरण्यास योग्य अशा अनेक धर्मशाळांनीं, पांढऱ्या व इतर अनेक रंगांनीं मंडित अशा सदनांनीं, सुशोभित झाला होता.

त्या देशांत ठिकठिकाणीं सुशोभित असलेलीं एकाम्रेश्वर, जंबुकेश्वर, कुंभेश्वर, मध्यार्जुनेश्वर, वृद्धगिरीश्वर, अरुणागिरीश्वर वगैरे प्रसिद्ध शिवलिंगें पहात पहात व पवित्र क्षेत्रांची तीर्थयात्रा करीत पुंडरिक नामक शहरीं श्रीरेणुकाचार्य आले.

प्राचीनकाळीं कोणी एक ब्राह्मण, आपल्या कैलासवासी वडिलांच्या अस्थि गंगेत विसर्जन करण्यासाठीं निघाला असतां, अस्तमानाचेवेळीं पुंडरिक नगरांत प्रवेश करतां झाला. रात्र झाल्यामुळें



श्री जगद्गुरु रेणुकाचार्यांकडून श्री शंकराचार्यास
चंद्रमौळीश्वर लिंगप्रदान.

तेथेंच विश्रांति घेऊन दुसरे दिवशीं पुढें प्रयाण करावें असा मनांत विचार करून तेथें राहिला, पण सकाळीं उठून पाहतो तों त्या सर्व अस्थि फुलें बनलेल्या त्याला दिसल्या, तेव्हां आश्चर्यचकित होऊन ही नगरी म्हणजे भूकैलासच होय अशी स्तुति करीत तो पुढें चालता झाला.

श्रीरेणुकाचार्यांनीं पुंडरीक नगरीचा वरील इतिहास ध्यानांत आणून तेथील शिवालयांचें दर्शन घेतलें आणि वेदवंद्य, विशालाकृति, सुरनटेश्वराकलिततांडव अशा प्रख्यात कुंडीर देशांत ते गेले.

पृथ्वीला अलंकार स्वरूप, देव, दानव, मानव, पशु, पक्षी वगैरेंचें उत्पत्ति स्थान; इंद्रादि देवतांनाही आल्हादकारक अशा कालहस्तिनामक शिवक्षेत्रांत प्रवेश करून क्षेत्रेश्वर कालहस्तीश्वराचें दर्शन घेऊन आणि दोन तीन दिवस तेथें वास्तव्य करून श्रीरेणुकाचार्य भूदेवीच्या नितंबावरील बिंबयुक्त सुवर्ण मेखलेप्रमाणें शोभत असलेल्या कांचीपट्टणास गेले. तेथें आपला चमत्कार दाखविण्यासाठीं लीलामात्रेंकरून सर्वांनीं धिक्कारून दूर सारावें असा मलिनवेश धारण करून बहिऱ्या व मुक्याप्रमाणें ऐकूं येत नाहीं व कांहीं बोलतां येत नाहीं असें दाखवीत श्रीरेणुकाचार्य गल्लीगल्लींतून हिंडूं लागले.

वरील स्वरूपाच्या रेणुकाचार्यांना पाहून त्या नगरींतील कांहीं लोक त्यांची निर्भत्सना करूं लागले, कांहीं त्यांची टर उडवूं लागले, तर कांहीं आश्चर्यानें नमूं लागले, कांहीं लक्षपूर्वक त्यांना सत्त्वसारार्णव (अतिशय सात्त्विक) म्हणूं लागले, तर अज्ञजन परमोन्मत्त

(अतिशय माजलेला) म्हणूं लागले, परमेश्वराचें दर्शन होण्यास आरशाप्रमाणें हा आहे, असेंही कोणी म्हणत. याप्रमाणें सिद्धाग्रणी श्रीरेणुकगणाधीश्वरांना भिन्न भिन्न लोक नाना तऱ्हेनें मानीत असतां मोठमोठ्या प्रासादांनीं व देवालयांनीं अतिशय सुशोभित झालेल्या अशा त्या नगरींत ते आनंदानें राहूं लागले.

याप्रमाणें ते रहात असतां एके दिवशीं कांहीं दुष्टांनीं त्यांना उचलून वरदराज स्वामीच्या विष्णू मंदिरांत नेऊन टाकलें. त्यामुळें जगद्गुरूंच्या मस्तकाला जखम झाली, तेव्हां तेथील वरदराज स्वामीच्या मूर्तीचें शिरच हलूं लागलें. हें पाहून तेथील पुजारी आश्चर्य-चकित झाले व भयभीत होऊन ही वार्ता राजाचे कानांवर घालण्यास धावले. रत्नखचित सिंहासनावर बसलेल्या चोल भूपालाजवळ जाऊन ते म्हणाले, हे राजन्, आज एक आश्चर्यकारक चमत्कार होत आहे. तो आपल्या कानांवर घालण्यास आम्ही आलों आहों. श्रीवरदराज स्वामींच्या मूर्तीचें मस्तक एकसारखें हालत आहे; आपण समक्ष येऊन तो प्रकार पहावा.

ती वार्ता ऐकून चोळनृपति स्तंभित झाला. माझ्या कुळदेवतेचें मस्तक हालत आहे काय? स्थावर वस्तूंचें चलन कोठेंच ऐकलें नाहीं. मी महाविष्णूचा कोणता अपराध केला, म्हणून असा हा प्रकार घडला! माझ्या प्रजेचा तर कांहीं अपराध नसेल ना? प्रजेचें रक्षण करण्यांत माझ्याकडून एकादी कसूर तर झाली नसेल ना? देव ब्राह्मणांचें माझ्या हातून कांहीं वाईट तर झालें नसेल ना? अथवा सज्जनांना मीं कांहीं दुःख दिलें नसेल ना? मीं माझ्या कुलदेवतेची

वंचना तर केली नसेल ना? कां आस्तिकमार्ग सोडून मीं नास्तिकपंथ स्वीकारला आहे! पुजाऱ्यांच्या सेवेंत कांहीं प्रमाद घडला असेल कीं काय! एरव्हीं अकस्मात् कुलदेवतेचा असा कोप होण्यास कारण तरी काय? या आपत्तीचा परिहार कसा होईल? हे वरदराजा, तूं माझ्या राज्याची आतां काय हानि करशील कोणास ठाऊक? याप्रमाणें शोक करीत भिंतीवरील चित्राप्रमाणें राजा विजमेंद्र स्तंभित झाला. हा विचित्र प्रकार ऐकून प्रधानाकडून वैखानसादि आगमग्रंथांतून सांगितलेल्या विधीप्रमाणें शांति करण्यांत आली, तरीपण मूर्तीच्या मस्तकाचा कंप कांहीं थांबला नाहीं. हें पाहून राजा चिंताक्रांत झाला. मंत्र्यांनींही (प्रधानांनीं) मंत्रज्ञ, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, वेदज्ञ, ज्योतिषि वगैरे ठिकठिकाणाहून आणवून त्यांच्या म्हणण्याप्रमाणें अनेक उपचार केले. पुष्कळ द्रव्य खर्चून यज्ञानुष्ठान, जपजाप्य, ब्राह्मणसंतर्पण व इतर धर्मकर्में केलीं; तरीपण वरदराजस्वामीचा शिरकंप कांहीं थांबला नाहीं तेव्हां राजा अधिकच भयग्रस्त झाला तो रात्रंदिवस वरदराजांची प्रार्थना करूं लागला त्याला झोंप येईना, अन्न गोड लागेना, त्यामुळें तो खंगत चालला; तेव्हां कांहीं हितचिंतक सल्लागार त्याला म्हणाले, 'हे राजा, चिंता सोड. ऐश्वर्य असतां क्षमावृत्ति आणि विपत्तींत धैर्यवृत्ति धारण करणेंच वीरपुरुषांचें लक्षण आहे, हें जाणून या संकटप्रसंगीं दुःखग्रस्त न होता तूं धीर धर, या क्षेत्राचा अधिपति एकाम्रेश्वर लवकरच तुझी इष्टसिद्धी करून देईल. म्हणून त्याची तूं असाधारण भक्तीनें आराधना कर.' असा उपदेश केला.

पूर्वीं एकदां हिमगिरीसुता पार्वती शंकराजवळ आली व विनोदानें तिनें त्यांचे तिन्ही डोळे आपल्या हातांनीं झांकले. सूर्य, चंद्र, व अग्नि असे ते त्रिनेत्र झांकले गेल्यामुळें त्रैलोक्यांत एकाएकीं अंधःकार पसरला सर्व व्यवहार थांबले, हा विनोद जगाला त्रासदायक झाल्यामुळें परमेश्वरानें कोपाविष्ट होऊन तिला 'काली हो' म्हणून शाप दिला.

तेव्हां पार्वती चिंताक्रांत होऊन म्हणाली, 'महादेवा, बालिशपणानें मीं ही चूक केली, मला क्षमा करा, पुढील परिणामांचा विचार न करतांच मीं तसें केलें, म्हणून मला उःशाप द्या. अशी प्रार्थना केली. आतां आपण डोळे उघडून चोहोंकडे तेज पसरवा व आपण करुणाकर म्हणून यश मिळवा.'

तेव्हां महादेव म्हणाले, 'हे देवी, भूलोकीं कांची नामक एक नगरी आहे. तेथें तूं सत्त्वर जाऊन कांहीं दिवस तपश्चर्या केल्यास तुझा काळेपणा जाऊन तूं पूर्वींप्रमाणें गोरी होशील. असें म्हणून त्यांनीं त्रिनेत्र उघडिले व त्यायोगें विश्वांतील अंधकार दूर झाला.

शिवाज्ञेनुसार पार्वती लगेच कांचीपट्टणांत जाऊन एका आम्रवृक्षाखालीं वालुकामय लिंग बनवून त्यामध्यें तिनें शक्ति व प्रमथगणासहित कैलासाधिपति परमेश्वर यांचे आवाहन केलें, व अतिशय भक्तीनें आणि आनंदानें ती त्याची आराधना करूं लागली. या कामीं तिला विघ्न करण्यासाठीं शिवाज्ञेनुसारच एकनदी आपली

मर्यादा सोडून आपल्या जलानें ती सर्व भूमी तिनें व्यापून टाकिली, त्या भयंकर जलप्रवाहाला न जुमानतां, ही ईश्वरी मायाच आहे असें जाणून, तिनें आपला देह त्या लिंगावर झांकून त्या शिवलिंगाचें रक्षण केलें.

तेव्हां प्रत्यक्ष परमेश्वरानें प्रगट होऊन, 'हे काली, तुला कितीही संकटें आणिलीं, तरी त्यांस न जुमानतां तूं केलेली एकनिष्ठ तपश्चर्या पाहून मी संतुष्ट झालों, आतां गोरी हो, असें म्हटलें. आणखी कांहीं तुला मागावयाचें असेल तर माग तें देण्याचें मी तुला वचन देतों.' असेंही महादेव पार्वतीच्या अंगावर हात फिरवून म्हणाले.

तेव्हां पार्वती म्हणाली, 'हे परमेश्वरा, मला दुसरा कोणताही वर नको, मला तुझी अर्धांगी कायमची कर म्हणजे झालें.' तेव्हां शंकरानें तसें केलें. तेव्हां पासून या लिंगाला एकाम्रेश्वर असें नांव प्राप्त झालें.

करितां हेराजा, अशा या एकाम्रेश्वर देवतेची आराधना तूंही कर म्हणजे शिवाच्या प्रसादेकरून तुझीं सर्व कार्यें सफल होतील; म्हणून एकनिष्ठेनें त्याचेंच पूजन कर.

वरीलप्रमाणें कांहीं सल्लागारांनीं सांगितलेलें ऐकून तसें करण्याचें राजानें ठरविलें. ती रात्र कशीतरी चिंतेंत घालवून दुसरे दिवशीं पहाटे स्नानादिक आटोपून पूजा साहित्यांसह तो एकाम्रेश्वर मंदिराकडे गेला.

त्यानें एकाम्रेश्वरलिंगाची पूजा षोडशोपचारांनीं केली, अन्नसंतर्पण केलें व त्या शिवलिंगाची प्रार्थना केली कीं, हे परमेश्वरा, माझी कुलदेवता वरदराज स्वामी याच्या मूर्तीचें शिरकमल एकसारखें हालत आहे. त्यामुळें माझ्या राज्यावर कांहीं संकट येतें कीं काय? अशी मला रात्रंदिवस चिंता लागून राहिली आहे. म्हणून हे कृपासागरा, हें भय निवारण कर. नंतर सायंकाळीं राजवाड्यांत येऊन हरस्मरण करीत राजा झोंपी गेला.

रात्र संपत आली असतां शेवटच्या प्रहरीं मंदमंद वारा वाहात असतां गोदोहनाचेवेळीं म्हणजे तारागण निस्तेज झाल्यावेळीं राजाचे स्वप्नांत महादेव येऊन म्हणाले, 'राजा, प्रत्यक्ष माझा पुत्र रेणुकनामक आचार्य या जगांत चमत्कार दाखविण्यासाठीं आपला स्वाभाविक दिव्याकार सोडून चिंध्यागुंडाळून वेड्याप्रमाणें तुझ्या या नगरींत भटकत आहे.

त्याला न ओळखून कांहीं दुष्टांनीं त्याला वेडाच समजून बरीच मारहाण केली व त्याला वरदराज स्वामीचे मंदिरांत नेऊन टाकलें. त्याला झालेला त्रास वरदराजाला असह्य होऊन त्यानें मस्तक हालविण्यास सुरवात केली. तो कंप थांबविण्यासाठीं रेणुकाचार्यांच्या अनुग्रहाशिवाय दुसरा उपायच नाहीं.

सकाळीं उठून राजानें स्वप्नाची आठवण केली, त्याची प्रचीती पहाण्यासाठीं मंत्र्यांना बोलावून त्या महात्म्यांना शोधून आणण्यासाठीं दूत पाठविण्यास सांगितलें. दूतांनीं अनेकठिकाणीं

शोधलें व शेवटीं स्वतःशींच बोलत बसलेला तो वेडा त्यांना आढळला. तेव्हां 'बाबा', तुला राजानें बोलावलें आहे, राजवाड्याकडे चल,' असें दूत म्हणाले. पण त्यानें तें ऐकलेंही नाहीं; तेव्हां राजदूतांनीं हे महानपुरुषा, तूं राजवाड्याकडे अवश्य आलेंच पाहिजे, असा आग्रह धरला. त्यावेळीं रेणुकाचार्यांनीं हे राजदूतहो, तुमच्या महाराजांचा माझ्याशीं कोणताही संबंध नाहीं. मीं तेथें कशाला यावें? या भिकाऱ्याला महाराजाकडे घेऊन जाणें तुम्हांला योग्य नाहीं. करितां मी येत नाहीं. तुम्ही आल्या रस्त्यानें जा. असें सांगितले गेलेले ते राजदूत राजाकडे परत आले व त्यांनीं झालेला प्रकार सांगितला. तेव्हां अज्ञानवशात् राखेखालीं झांकलेल्या अग्नीप्रमाणें असलेलें त्या वेड्याचें महात्म्य न ओळखतां राजा रागानें म्हणाला, 'दूतांनो, त्याला एथें उचलून ताबडतोब घेऊन या.' तेव्हां कांहीं दूत त्या वेड्याजवळ गेले व त्याचे हातपाय धरून त्याला उचलून राजाजवळ घेऊन येऊं लागले. त्याबरोबर कांहीं दूतांना रक्ताच्या गुळण्या होऊं लागल्या, कित्येकांचे हातपाय तुटून पडले, कांहींजणांचे डोळे गेले, कांहींजण मूर्च्छित पडले, तर कांहींजण मरणही पावले. या भयंकर प्रकारानें सर्व गांवभर भयंकर हाहाःकार झाला. व बाकीचे राजदूत भीतीनें दुःखित होऊन त्यांनीं राजास ती सर्व हकिकत सांगितली.

तें वर्तमान ऐकून राजा ताळ्यावर आला व कंप पावूं लागला. त्याला स्वप्नाची आठवण झाली व प्रत्यक्ष परमेश्वरांनीं सांगितलेला तो हाच थेर महात्मा होय. असें जाणून, तो एकटाच

त्या वेड्याजवळ गेला. तेथें गेल्यावर सद्गदित होऊन भक्तीनें व आनंदानें त्यानें साष्टांग नमस्कार घातला व म्हटलें, 'हे महात्मन्, माझ्या उद्धटपणाबद्दल मला क्षमा करा. अज्ञानानें माझ्या प्रजाजनां-प्रमाणें मीं ही आपला अतिशय छळ केला. मुलांचे अपराध वडील पोटांत घालीत नाहीं काय? त्याप्रमाणें या बालकाचे अपराध माफ करून आपण माझें आतिथ्य स्वीकारा व माझा उद्धार करा.' याप्रमाणें आपली स्तुति करणाऱ्या राजाला पाहून अतिशय करुणावंत अशा रेणुकाचार्यांनीं त्याच्यावर कृपाकटाक्ष टाकले व त्याला आनंदित केलें.

राजानें विनंती केली कीं, महाराज, माझे कुलदैवत वरदराज स्वामींच्या मूर्तीचें मस्तक कंपायमान होत आहे. रोगनिदान बरोबर न जाणतां औषधोपचार करणाऱ्या मूर्ख वैद्याप्रमाणें मींही यज्ञयागादि अनेक उपाय केले, पण ते सर्व राखेंत टाकलेल्या हविषान्नाप्रमाणें व्यर्थ गेले, शेवटीं मी एकाम्रेश्वराची आराधना केल्यावर परमेश्वरांचा दृष्टांत होऊन खरा प्रकार मला कळला तेव्हां आतां आपण त्या माझ्या कुलदैवताचा शिरकंप थांबवून मला कृतकृत्य करा.

करुणासागर अशा रेणुकाचार्यांनीं, राजानें केलेल्या प्रार्थनेनें प्रसन्न होऊन व वेष सोडून देऊन सर्वांचें मन आकर्षित करणारा आपला पूर्ववेष धारण केला, व ते म्हणाले, 'हे राजन्, ब्रह्मा विष्णू वगैरे देवांत श्रेष्ठ, सृष्ट्युत्पत्त्यादि पंचकर्मांचा अधिष्ठाता, सर्व मंगलांचें निवासस्थान, सर्वज्ञत्वादि असाधारणगुणयुक्त परमात्मा अशा

शिवाविषयीं तूं भक्तीहीन झाला होतास, तुझ्याप्रमाणें तुझे प्रजाजनही शिवभक्तीहीन झाले होते, त्यामुळें हा सर्व अनिष्ट, प्रकार घडला. मला झालेल्या त्रासाबद्दल मला कांहींच वाटत नाहीं ती माझी सेवाच घडली व परमेश्वराची कृपा तुझ्यावर झाली; यापुढें तूं शिवभक्ति सोडूं नकोस. तुझ्या इच्छेप्रमाणें मी कंप थांबवितों.' असें म्हणून रेणुकाचार्य त्या राजाबरोबर हरिनिकेतनांत (देवालयांत) गेले व हरिमूर्तीपुढील पडदा उचलून श्रीरेणुकाचार्य गाभाऱ्यांत गेले.

आचार्यांनीं आपला उजवा हात वरदराजस्वामीच्या मूर्तीचे मस्तकावर जोरानें ठेवतांक्षणींच पूर्वीप्रमाणें तें शिरकमल स्थिर झालें.

त्यासरशीं आकाशांतून पुष्पवृष्टि होऊं लागली, देवतांनीं दुंदुभी वाजविल्या, मोठा रथोत्सव झाला, दिशा सुप्रसन्न झाल्या व मंद पवन वाहूं लागला. ते रेणुकाचार्य पटाबाहेर आले व त्यांनीं सर्वांना दर्शन दिलें.

तेव्हांचा तो आश्चर्यकारक चमत्कार, राजाचें अहोभाग्य, व साधुवर्याचें खरेंखुरें महात्म्य, सर्व प्रजाजन पुन्हपुन्हा वाखाणीत होते. त्याचें वर्णन कोणीही व्याख्याता 'असामान्य' असेंच करूं शकेल. राजानें सात्त्विक भक्तीनें आचार्यांचे चरणांवर पडून म्हटलें, हे गुरुराज, अनेक शांतिकर्में व संतर्पणें केलीं तरी वरदराजस्वामी प्रसन्न झाला नाहीं; पण तुमच्या अमृत हस्ताच्या स्पर्शानेंच तो प्रसन्न झाला, म्हणून तुम्ही साक्षात् परमेश्वरच आहांत. आपण यारूपानें येऊन

चमत्कार केल्यामुळें मी सहकुटुंब सहपरिवार धन्य झालों आहें. माझ्या राज्यांत तुमची चरणधूली पडल्यामुळें तें पवित्र झालें. जन्मजन्मांतरीं ज्यांनीं पुण्योपार्जन केलें असेल त्यांनाच आपल्या चरणांचें दर्शन होणार विद्युल्लतेप्रमाणें चंचल असलेल्या या संसारसागरांत बुडणाऱ्या आम्हांला तुमचा उपदेश नौकेप्रमाणेंच होय, म्हणून सद्बोध देऊन आम्हांला परमात्म्याच्या सानिध्यरूपी परतीराला पोहोंचविण्याची कृपा करा.

तेव्हां संपत्ति, संतान, परिवार वगैरे बरेंच वैभव असलेल्या लक्ष्मीपतीच्या मूर्तीचे मस्तकाचा कंप आपल्या भक्तीनें थांबविलेल्या विजयेंद्र नामक चोळ भूपतीला, त्याच्याच विनंतीवरून सत्, असत्, अनुग्रह, निग्रह, विग्रहकारी विषयांचा मोह पाडणाऱ्या इंद्रियरूपी अश्वसमूहाला ताब्यांत ठेवणारें; दुर्मतांच्या खोल चिखलाला सुकवून टाकणाऱ्या सूर्याप्रमाणें असलेलें, रेणुकगुरुवर्यांनीं ज्यांचें पृथक्करण केलें आहे असें शिवाद्वैत सिद्धांततत्त्व, श्रुतिसिद्धदर्शन श्रीरेणुकाचार्यांनीं उपदेशिलें.

नंतर प्रेमानें चोळ नृपतीला आशीर्वाद देऊन रेणुकाचार्य आकाशमार्गानें कांची पट्टणाहून निघून अनेक लोकांनीं व्यापिलेले देश ओलांडीत प्रख्यात अशा मासनूर शहरांत आले, व रात्रीं नगराबाहेर असलेल्या शिवालयांत उतरले. तेव्हां तेथील पुजारी त्यांना पाहून—वस्तुस्थिति सांगावी असा विचार करून—म्हणाले, ‘हे पांथस्था, या देवालयांत निजूं नकोस; शहरांत दुसरीकडे कोठेंतरी सुखानें विश्रांति



श्री जगद्गुरु रेणुकाचार्यांनी वरदराजनामक विष्णू मुर्तीची
शिरकंपन थांबवितात.

घे.' तेव्हां रेणुकाचार्य म्हणाले, 'हे पुजाऱ्या, येथें निजूं नकोस असें तूं कां सांगतोस? मार्गस्थांच्या सोयीसाठींच पुण्यशील लोकांनीं हीं देवळें बांधलीं आहेत ना? तर मग मला कां भीति घालतोस? मी फार दमून आलों आहें, आतां मला एथेंच पडूं दे.'

त्यावर पुजारी म्हणाले, 'हे पांथस्था, या देवालयाच्या गोपुरापासून अगदीं जवळच दोन वृक्ष आहेत. त्या वृक्षांवर बऱ्याच काळापासून दोन दैत्य (राक्षस) रहात आले आहेत. दिवसा ते ढेकणाच्या रूपानें त्या वृक्षांच्या फटींत राहातात, मध्यरात्रीं भयंकर असें राक्षसरूप धारण करून वाट चुकलेल्या प्राण्यांना खातात व सूर्योदय होण्यापूर्वींच पुन्हां ढेकणाचें रूप धारण करून त्या झाडांत जाऊन राहतात. याप्रमाणें त्यांनीं आजपर्यंत हजारों माणसें मारलीं आहेत, म्हणून मी तुम्हांला देवळांत निजूं नका असें सांगतों. त्यांत दुसरा कांहीं वाईट हेतु नाहीं.' पुजाऱ्याचें हें भाषण ऐकून धीरोदात्त रेणुकाचार्य म्हणाले, 'माझ्या कल्याणासाठींच तूं हा सल्ला दिला हें कळलें. पण सकाळीं उठून अन्न मिळविण्याची तसदी घेण्यापेक्षां रात्रींच राक्षसांनीं खाऊन टाकलें तर बरेंच. दोन भुतांची तरी तृप्ति माझें शरिरानें होईल. दुसरें असें कीं—दृढतर अशा शंभुशक्तिरूपी पोलादी कवच धारण करणारास राक्षस काय करूं शकतील? राक्षसांची ही भीतीच माझे मनांत उत्पन्न होत नाहीं, उलट आमच्यासारख्या शिवयोग्यांची तूं चिंताच करूं नकोस, जा, मी येथेंच निजणार, ईश्वरी इच्छा असेल तसें होवो.' असें त्या पुजाऱ्याला सांगून रेणुकाचार्य भवानी शंकराचें ध्यान करीत तेथेंच चिंध्यांची शय्या आंथरून निजले.

हा दरिद्री व निरिच्छ, जाणून बुजून ज्याअर्थीं एथेंच निजत आहे त्याअर्थीं तो जीविताला कंटाळला असला पाहिजे. मग अधिक आग्रह करून तरी काय उपयोग? ज्याचें कर्म त्याचेबरोबर असें म्हणून पुजारी निघून गेला.

अंधार पडत चालला. सर्वत्र सामसूम झालें. मध्यरात्रीच्या सुमारास वटवृक्षावरून दोन दैत्य खालीं आले, आणि त्यांनीं ढेकणाचें रूप बदलून भयंकर राक्षसाचें रूप धारण केलें. ते आतां प्राण्यांचा संहार सुरू करणार इतक्यांत निजून उठल्याप्रमाणें शय्येवर बसून रेणुकाचार्यांनीं कपालनेत्रांतून त्या वृक्षांकडे कटाक्ष [नजर] टाकले. त्याबरोबर ते दैत्यद्वय जळून खाक होऊन दोन लोहगोलक (लोखंडाचे गोळे) बनले. आचार्यांनीं नेत्रकटाक्ष आवरून धरल्या-बरोबर नेत्राग्नि शांत झाला.

रेणुकाचार्यांनीं उरलेली रात्र देवळांत घालविली. पहाट झाली. पक्षिगणांचा किलकिलाट सुरू झाला, कोंबडे आरवले, स्वच्छ प्रकाश पडला. आसपासच्या गांवांतील लोकांना दैत्यदहनाचा समाचार कळतांच ते आनंदित झाले. ते असेपर्यंत आम्ही सतत मृत्यूच्या दाढेंतच होतों, पण आतां ती चिंता टळली; असें म्हणत अनेक लोक देवालयांत येऊन श्रीरेणुकाचार्यांचें दर्शन घेत. कारण त्या देदिप्यमान् महापुरुषानेंच दैत्यांचा संहार केला असला पाहिजे. अशी त्यांची खात्री होती. 'आतां निश्चित रहा' म्हणून आचार्यही त्यांना आशीर्वाद देत.



श्री जगद्गुरु रेणुकाचार्याकडून यक्षमिथून उद्धार.

नंतर रेणुकाचार्य ते दोन लोहगोलक घेऊन एका लोहाराकडे गेले व 'यांचीं दोन खड्गें करून दे' असें त्यांनीं त्याला सांगितलें.

त्या लोहगोलकांना हात लावल्याबरोबर लोहाराला कंप सुटून तो भयभीत झाला. हें पाहून आचार्यांनीं त्याला धीर देऊन 'भिऊं नकोस' असें समाधान करून पुरुषदैत्याच्या गोलकापासून तीक्ष्ण खड्ग बनवून घेतलें व दैत्यिणीचा गोलक भट्टींत टाकला, पण तो कांहीं वितळेना. किती ठोकलें तरीही कांहीं परिणाम होईना. हें पाहून अहाहा! या गोलकांतील राक्षसी स्त्रीचैतन्य अद्याप पूर्ण नष्ट झालेलें नाहीं; कितीही तापवून ठोकलें तरी पूर्वीप्रमाणें कायम आहे. असा मनांत विचार करीत आहे इतक्यांत जवळच्या एका झाडावरील तांबड्या फुलास मांसाचा गोळा आहे असें समजून तो गिळण्यासाठीं, दैत्यीण लोहगोलकांतून आपला देह वाढवूं लागली. तेंव्हां आचार्यांनीं लोहाराकडून त्या गोलकावर घाव घालवून दुसरें आयुध बनविलें.

त्या दोन्ही आयुधांचें विलक्षण तेज पाहून लोहार म्हणाला, 'स्वामिन्' आपला प्रताप विलक्षण आहे. हे गोलक पाहून छाती फाटून जाते. दुसऱ्या गोलकांतून बाहेर पडूं लागलेला विराट देह पाहून तर मूर्च्छाच आली. हा काय प्रकार आहे? हीं आयुधें माझे हातून आपण कशीं करवून घेतलीं? याबद्दल मलाच आश्चर्य वाटतें. माझ्यामध्यें एवढी शक्ति कोठली? म्हणून या सर्व प्रकारांतील रहस्य मला सांगून माझें समाधान करा.'

तेंव्हां रेणुकाचार्य म्हणाले, 'हे लोहारा, प्राचीनकाळीं कामासक्त मदोन्मत्त व हिंसक असें एक यक्षयक्षिणीचें जोडपें पुण्यारण्य नामक प्रसिद्ध तपोवनांत तपाचरण करीत बसलें, तें एके दिवशीं तेथील एका यतीपुढें रतिक्रीडा करूं लागलें. तेंव्हां तो प्रकार असह्य झाल्यामुळें यति कोपाविष्ट होऊन म्हणाले, 'हे यक्षा, तुझा हा अपराध अक्षम्य आहे, तुम्हांला या पापाच्या परिमार्जनाखातर राक्षस योनींत जन्म घ्यावा लागेल.'

हा शाप ऐकून वज्रप्रहार होऊन पडलेल्या पर्वताप्रमाणें यक्ष यक्षीणहीं पडलीं व विस्तवाजवळील पुष्पाप्रमाणें कोमेजून गेलीं. नंतर नम्रपणें हात जोडून म्हणालीं, 'हे मुनिवर्या, आमचा उन्माद नष्ट झाला आहे, करूं नये तें आम्हीं आतां अज्ञानानें केलें; आजपर्यंत अनेक निरपराधी जनांना पीडिलें, पुष्कळ आश्रम उध्वस्त केले, अनेकांच्या तपश्चर्येंत विघ्नें आणिलीं, आम्हांला कोणीही विचारणारा नाहीं असें मानून शास्त्राविरुद्ध व लोकाविरुद्ध अशीं अनेक गृहकृत्यें केलीं. अशाप्रकारें आमच्याकडून घडलेले हे सर्व अपराध माफ करून आम्हांला उःशाप दे.

हा यक्ष जोडप्यांना झालेला पश्चात्ताप पाहून मुनि म्हणाले, 'तुमच्या पापपुण्याचे कष्ट तुम्हांस चाखलेच पाहिजेत, अशीं परमेश्वरी आज्ञा आहे, माझा शाप परत फिरणार नाहीं. तरीपण तुम्ही दोघे हिंस्र ढेंकणाच्या रूपानें वृक्षाचे फटींत राहून रात्रीं प्राणिमात्रांना

ठार मारीत काळ घालवीत असतां, परमेश्वराच्या आज्ञेनेंच पुढें अवतरणारे श्रीरेणुकाचार्य आपल्या भाल लोचनांतील अग्नीनें तुम्हांला जाळतील. तेव्हां तुम्ही शापमुक्त व्हाल.'

असा इतिहास सांगून व लोहाराला आशीर्वाद देऊन त्या आयुधांसह त्या गांवाजवळून वहात असलेल्या नदीच्या मध्यभागीं जाऊन रेणुकाचार्यांनीं खालीं तोंड करून तेथें एक खड्ग, ठेवून म्हटलें, 'माझी आज्ञा होईतोंपर्यंत हे खड्गा,' तूं एथेंच रहा. आणि दुसरें आयुध हातीं घेऊन आकाशमार्गानें अतिवेगानें ते जगद्विख्यात, विशाल व शांत अशा उज्जयिनी पट्टणाकडे गेले.

॥ श्रीरेणुकविजयांतर्गत तृतिय मंजिरी समाप्त ॥

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ॥



श्री रेणुक विजयः

चतुर्थ मंजिरी.

सर्व मंगलाचें आश्रयस्थान, सकलमुनिगणांचें आदिदैवत, कृपासागर, तपोनिधि, सर्व संपदेचें माहेरघर असे रेणुकाचार्य, वैभव, सुख, ऐश्वर्य वगैरेमध्यें इंद्रपुरीला मागें टाकणाऱ्या उज्जयिनीचें ऐश्वर्य पहात पहात राजा विक्रमादित्याच्या वाड्यांत गेले.

जगद्गुरूंना आलेले पाहून राजानें त्यांचा राजवैभवानें सत्कार करून त्यांना दिव्य पीठावर बसविलें, अर्घ्यपाद्यादि शोडषोपचारांनीं त्यांचें विधियुक्त पूजन करून प्रदक्षिगा घातली व हात जोडून राजा म्हणाला, 'हे भगवान्, जन्मजन्मांतरीं तपश्चर्या केलेल्यांनासुद्धां आपलें दर्शन दुर्लभ आहे. माझा पुण्यप्रभाव किती वर्णावा? आपण होऊन जगद्गुरु मजकडे आले व त्यांनीं माझें आतिथ्य स्वीकारिलें,

यावरून या जगांत मीच खरोखर धन्य होय. माझा जन्म सफल झाला. ही नगरी व हें भवन हीं आपण एथें अनुग्रह करण्यास आल्यामुळें धन्य झालीं आहेत. आपल्या दर्शनानें माझी सर्व प्रजा कृतकृत्य झाली.

हे भगवान्, मीं आतां काय करावें? हें सांगा. या दासानुदासावर कृपादृष्टी टाका, आपला मधुरोक्ति सुधारस मला पाजा, आतां आपला दयाळूपणा प्रगट करा.

याप्रमाणें राजाची विनवणी ऐकून भक्तवत्सल श्रीरेणुकाचार्य संतुष्ट झाले व म्हणाले, 'हे राजा, या जगांत धनमद, सत्तामद, यौवनमद; वगैरेनीं उन्मत्त होऊन अनेक जन, करूं नयेत तीं कर्में करतात. हे अष्टमद स्पर्धेनें तुझ्याकडे आले असले तरी त्यांना वश न होतां नीतिमर्यादेनें तूं तो राज्यकारभार चालवीत प्रजेच्या प्रेमादरास प्राप्त झाला आहेस, ही तुझी वृत्ति स्तुत्य होय. तुझी भक्ति व आस्तिक्यभाव पाहून मी संतुष्ट झालों आहें. हें सर्वश्रेष्ठ आयुध मी तुला देतों त्याचा तूं स्वीकार कर.'

पुढें रेणुकाचार्य त्या आयुधाचें महत्व सांगूं लागले. 'हे राजा' तूं जेव्हां जेव्हां व ज्याची ज्याची अपेक्षा करशील, तें तें सर्व तुला त्या त्या वेळीं या आयुधामुळें मिळेल. भुकेच्या वेळीं तुझ्या इच्छेप्रमाणें कोणतेंही पक्वान्न हें आयुध तुला आणून देईल, रुचिर वसनें हवी असल्यास तींही इच्छा करतांच हजर करील. रासक्रीडा करण्याची

इच्छा झाल्यास सुंदर ललना, हें आयुध घेऊन येईल, आणि शत्रूंशीं झुंजण्याचा प्रसंग आल्यास हें प्रभावी शस्त्र बनेल!

स्वर्गाधिपति इंद्र, भाटांच्या तोंडून तुझें अनुपमशौर्य ऐकून, पुढें केंव्हांतरी तुला बोलावील. इंद्राकडून सत्कार करून घ्यावा, म्हणून तूं चतुरंग बळासमवेत जेंव्हां अमरावतीला जाशील, तेंव्हां हें आयुध यक्षिणीच्या रूपानें प्रगट होईल, कारण तेंव्हां ती शापमुक्त होईल. म्हणून तुला भिण्याचें कारण नाहीं. असें पुढील भविष्यही आचार्यांनीं राजाला सांगितलें.

रेणुकाचार्यांनीं दिलेलें तें आयुध राजानें नम्रपणें वंदन करून घेतलें याप्रमाणें त्या नरपतीला सांगून भवानीपति भक्तीनें तेजःपुंज दिसत असलेले रेणुकाचार्य शिवध्यान करीत चालले असतां, राजा म्हणाला, 'पूज्य मुने, आपण दिलेलें आयुध सांसारिक सुखें देईल, पण नित्यानंद देणार नाहीं. म्हणून हे जगद्गुरो, भवरोगवैद्य अशा परशिवाचें वेदवेदांतगर्भित शास्त्र कृपा करून सांगा. असें म्हणतांच, रेणुकाचार्यांनीं "तत्त्वमसि, अहंब्रह्मास्मि, प्रज्ञानंब्रह्म, एकएवरुद्रो न द्वितीयायतस्थे, न तत्समश्चाप्यधिकश्च दृश्यते" वगैरे महावाक्यांनीं परशिवस्वरूप व आधिक्य उपदेशून मोक्षमार्ग दाखवून दिला. तेंव्हां जगद्गुरूंच्या मुखांतून निघालेल्या नित्यसुखप्रद ब्रह्मबोधाचा स्वीकार करून राजा म्हणाला, 'स्वामी आज माझें जन्मसाफल्य झालें या दिनांवर सदैव कृपादृष्टि ठेवावी; 'तथास्तु,' म्हणून नगरवासीजनांच्या जयजयकारांत श्रीरेणुकाचार्य आकाशमार्गानें कोल्हापूर शहराला गेले.

बारा योजनें विस्तीर्ण तट असलेल्या, वज्रानें मढविलेल्या, सुवर्णाच्या कडी कोयंड्यांनींयुक्त अशा वेशींचे गोपुरयुक्त चार दरवाजे असलेल्या, रत्नादि पदार्थांनीं भरगच्च असलेल्या, बाजार पेठेनें सुशोभित सर्व सामुग्रीनें भरलेल्या श्रीमंताच्या वाड्यांनीं मंडित, मस्तकावर शिवलिंग असलेल्या महालक्ष्मीच्या मंदिरानें विराजित अशा कोल्हापूर नगरीस येऊन, तेथें राज्य करीत असलेल्या गोरक्ष नामक कुटिलसिद्धांच्या गर्वहरणासाठीं भिक्षुकवेश धारण करून श्रीरेणुकाचार्य हिंडू लागले. गोरक्षनाथ साऱ्या जगांत आपल्या समान कोणी नाहीं, असा गर्व धरून, कुटिलविद्यांचे जोरावर पराक्रम गाजवीत संतोष मानीत होता. इतर राजे त्याच्या कुटिलविद्येचा प्रतिकार करण्यास असमर्थ असल्यामुळें गोरक्षनाथाला वरवर मानीत, पण मनांतून त्याचा नाश चिंतीत राहिले होते. प्रजाजन अमूल्य रत्नें, भारीवस्त्रें, वगैरे त्याला भेट देऊन त्याची कृपा संपादित; या सिद्धाला दानधर्म न्यायनीति वगैरे माहितच नव्हतीं; त्यामुळें प्रजाजन गांजून गेले होते. सर्वत्र दुराचार माजला होता; मदांधलोक दीन व दुबळ्या जनांना छळीत असत; आपली मंत्रविद्या त्याचेवर चालत नाहीं असें पाहून तपस्वीसुद्धां खिन्न झाले होते. हा सर्व प्रकार पट्टणांतून हिंडतांना रेणुकाचार्यांनीं पाहिला. या दुष्टाच्या कुटिलविद्येनेंच सर्व लोक त्रस्त झाले आहेत, हें पाहून, दयावंत रेणुकाचार्यांनीं गोरक्षसिद्धांचें प्रस्थ मोडण्याचें ठरविलें. कारण तसें केल्याशिवाय लोकांचा त्रास चुकणार नाहीं. हें त्यांनीं पूर्ण ओळखलें होतें.

याप्रमाणें ते भिक्षुकाचा वेश घेऊन हिंडत असतां एके ठिकाणीं गोरक्षाचे शिष्य कुटिलविद्या साधनानें वाघ, सिंह, यांना वश करून घेत असलेले त्यांना दिसले. यक्षिणीच्या कांडीनें सर्व वन्यपशूंकडून सेवाकरून घेतली जात होती. आचार्यांचें महात्म्य न जाणतां त्या गोरक्षशिष्यांनीं त्यांचेवर गतिस्तंभनादि मंत्राचा प्रयोग केला, पण त्याचा रेणुकगणाधीश्वरांवर कांहीं परिणाम झाला नाहीं. उलट आचार्यांनींच त्यांच्यावर मंत्रप्रयोग केल्याबरोबर त्यांपैकीं कांहीं जागच्या जागींच खिळले गेले, कांहींजण गरुडाला पाहिलेल्या सर्पा-प्रमाणें चटपटूं लागले, कित्येक जण दोरांनीं बांधल्याप्रमाणें झाले तर कांहींजण रागानें लाल होऊन जागच्या जागींच चडफडूं लागले.

सर्व जनता दीन बनली होती ठरल्याप्रमाणें सर्व कांहीं झालें, पूर्वीं कधींही न घडलेली न पाहिलेली व असह्य अशी गोष्ट घडली व गोरक्षशिष्यांचें गर्वखंडन झालें.

गोरक्षाच्या कुटिल विद्येनें त्रस्त होऊन चिंताक्रांत झालेल्या प्रजाजनांनीं रेणुकाचार्यांचा वरील प्रताप पाहिला व ते अतिशय आनंदित झाले.

पुढें अदृश्यपणें भिक्षुकवेशधारी आचार्य गोरक्षांचे वाड्यांत प्रवेश करते झाले, व म्हणाले, 'गोरक्षा, मी एक भिक्षुक आलों आहें, बरेच दिवस अन्न नसल्यामुळें दीन बनलों आहें, म्हणून लवकर भिक्षा घालून मला तृप्त कर' तेव्हां तो कुटिलाग्रणी, गर्विष्ठ गोरक्ष झोंपाळ्यावर बसूनच पलीकडे पाहून म्हणाला,

'हे सती, आजपर्यंत माझ्या पट्टणांत कोणीही भिक्षुक आला नव्हता, शिवाय माझ्या वाड्यांत तर कोणीच शिरला नव्हता, पण आतां हा दुरात्मा कोण आला आहे? याला आंत येण्याचें धैर्य कसें झालें? याचें साहस खरोखर मोठें! कारण हा पहारेकऱ्यांनाही चुकवून आला. या भिक्षुकाचें ओरडणें माझ्या कानांत शल्याप्रमाणें बोचलें आहे. म्हणून हें खड्ग घेऊन भिक्षेसाठीं त्यानें पुढें केलेले त्याचे हात तोडून टाक आणि मीं हीच भिक्षा घातली आहे, असें त्याला बजाव.

तेव्हां ती साध्वी लक्कादेवी, शिवलांछनांकित देह असलेल्या लीलाधारी गुरूंना पाहून, गोरक्षाला म्हणाली कीं, 'हें क्रूरकर्म आहे. मला असली आज्ञा करून पेंचात पाडूं नका!' पण त्यानें कांहीं तें मानलें नाहीं व तो अधिकच रागावला. तेव्हां ती सती म्हणाली 'हायरे दैवा! कसला हा दुर्घट प्रसंग माझ्यावर आणला आहेस! पतींची आज्ञातर मोडतां येत नाहीं. कारण आज्ञा मोडल्यास माझी काय अवस्था होईल? उलट, दारीं आलेल्या अतिथीची हिंसा केली, तर तें पाप अनेक जन्मपर्यंही दूर होणार नाहीं. हे दैवा, माझ्या पतीला अतिथीचा खून करण्याची बुद्धि दिलीसना! आणि ती सुद्धां माझ्या हस्तें!! पतीची आज्ञा अमलांत आणण्यासाठीं माझे हात कांहीं पुढें धजावत नाहींत! काय करूं? 'अतिथी देवोभव,, वगैरे धर्मज्ञा कुटिलसिद्ध असलेल्या माझ्या पतीला सांगून काय उपयोग? "एकः पापानि कुरुते, फलं भुंक्ते परोजनः" या वचनानुसार त्यांच्या पातकांचें फल त्यांच्या परिवारालासुद्धां भोगावें लागणार, हीच दुःखाची गोष्ट होय.

'मा हिंस्यात्सर्वाणि भूतानि' या वेदवचनाचें उल्लंघन करणें बरें नव्हे. आलेल्या अतिथीकडे पाहून माझ्या मनांत भक्तिभावच उत्पन्न होत आहे, पण पतिराजांना त्याचें कांहींच वाटत नाहीं. उलट माझी आज्ञा मोडून पुन्हां मलाच नीतिबोध करतेस काय? असें वाटून त्यांना अधिकच राग येणार.' वगैरे विचार त्या सतीच्या मनांत आले. परंतु निरुपाय असल्यामुळें जें दैवांत असेल तें होईल असा विचार करून तिनें पदर आवळून व पतीचें खड्ग घेऊन, 'पापाचे धनी तुम्ही,' असें म्हणून ती रेणुकाचार्याजवळ गेली व म्हणाली, 'हे पूज्य पुरुषा; अतिथीधर्म माझ्या पतिराजांना सांगणें व्यर्थ आहे, ही खड्गभिक्षा तुला देण्यास मला त्यांची आज्ञा झाली आहे, तिचा स्वीकार कर.' असें म्हणून तिनें तें खड्ग रेणुकाचार्यांच्या हातांवर टाकलें. शिवाचाच अवतार असलेल्या आचार्यांनीं भालनेत्रांतील अग्नि, खड्गावर नेत्रकटाक्षानें टाकल्याबरोबर तें खड्ग वितळून गेलें. व 'हीच गोरक्षाची अन्न भिक्षा' असें म्हणून त्यांनीं तो लोहरस पिऊनही टाकला. पण विजेप्रमाणें तें खड्ग जाऊन गोरक्षाच्या वक्षस्थलांत शिरलें व तो झोंपाळ्यावरून धाडकन् खालीं पडला.


तो आक्रोश करूं लागला, तेव्हां त्याचा सर्व परिवार तेथें गोळा होऊन, त्यांचेकडून अनेक उपचार केले गेले, पण हृदयव्यथा कांहीं कमी होईना तेव्हां पत्नीला जवळ बोलावून तो म्हणाला तुझा हितोपदेश मीं ऐकला असता तर, असा प्रसंग आलाच नसता; आतां मी जगत नाहीं, मी निष्प्राण होत चाललों आहें. प्राण जाण्याचीच ही वेळ आहे, म्हणून तूं माझी कुलदेवता महालक्ष्मी

इच्याकडे जाऊन तिची स्तुति करून तिला सर्व वृतांत कळीव, तीच मला वाचवील, त्याशिवाय उपाय नाहीं जा. तिनें आजपर्यंत अनेक अडचणींतून मला पार केलें आहे.

साध्वी लक्कादेवी शोक करीत करीत स्नानादि आटोपून फलपुष्पादि पूजासाहित्य घेऊन सत्वरतेनें महालक्ष्मीचे मंदिरांत गेली व तेथें देवी प्रसन्न होईतोंपर्यंत तिनें तिचें भक्तिभावानें स्तवन केलें. ती म्हणाली, 'हे शरणागत रक्षिके, गोरक्षकुलोध्दारिणी, तुझेच चरण मी नित्य ध्यात असतें, आतां माझें रक्षण कर, मला सौभाग्यदान दे, माझे पतिराज तूं दिलेल्या वरांचा सदुपयोग न करतां मदांध बनून आज आलेल्या एका अतिथीची हिंसा करण्याच्या बुद्धी-मुळें ते मरणोन्मुख झाले आहेत; माझा सल्ला त्यांनीं ऐकला नाहीं, आतां तूं करुणा करणार नाहींस तर पतीचे प्राण जातील व मला वैधव्य प्राप्त होईल. म्हणून माते, माझ्या पतीचे सर्व अपराध पोटांत घालून आमच्यावरील संकट दूर करून आमचा उद्धार कर; नाहींतर तुझा भक्तवंशच आज नष्ट होत आहे.'

तिच्या या स्तुतीनें प्रसन्न होऊन महालक्ष्मी प्रगट झाली व म्हणाली, 'वत्से, भिऊं नकोस, धैर्य धर, तुझ्या स्वाभाविक देवभक्ति, गुरुभक्ति व पतिभक्ति यांनीं मी प्रसन्न झालें आहें. तुझ्या इच्छेप्रमाणें मी तुला वर देतें. असें म्हणून महालक्ष्मी रेणुकाचार्याकडे आली. प्रत्यक्ष शिवावतारी गणाधीश, चरचक्र, चक्रवर्ती आचार्यांना वंदन करून म्हणाली, 'हे सकललोकपूज्या, कृपानिधे; 'नगुरोरधिकम्' हें वेदवचन विसरून जाऊन, माझ्यापेक्षां कोणीही मोठा नाहीं

असा गर्व करीत, कांहीं कुटिल मंत्रसिद्धि प्राप्त करून घेऊन करूं नयेत तीं कर्में गोरक्ष करीत आला आहे. आतां त्याच्यामध्यें विवेकाचा उदय होण्याची वेळ आली आहे. कारण त्याला आतां पश्चात्ताप झाला आहे. त्याची ही पत्नी देव व गुरूजनांवर श्रद्धा ठेवणारी असून, महान् पतिव्रता आहे. तिच्यावर तरी कृपा करून आपण तिला सौभाग्याची भिक्षा घाला. हें जोडपें माझे भक्त असल्यामुळें या संकटकालीं मला शरण आलेलें आहे, म्हणून हे महात्मन्, गोरक्षाचे सर्व अपराध पोटांत घालून त्याला जीवदान देऊन त्याचा उद्धार करा.' महालक्ष्मीची ही प्रार्थना ऐकून रेणुकाचार्य म्हणाले, 'हे देवी, हा गोरक्ष तुझा भक्त असल्यामुळें शांत, नीतिमान्, व गुरुभक्त असावयास नको काय? खड्गशाली नसतांही आपल्यासारखे दुसरे कोणी नाहीं. असें मानून हिंसक कर्में करणाऱ्याला, क्षमा ती कशी करावयाची? नेहमीं सत्पुरुषांना दुःख द्यावयाचें, अतिथींचा छळ करावयाचा, हाच तुझ्या भक्ताचा नित्यक्रम झालेला आहे. याच्या त्रासामुळें जप, तप, होमानुष्ठानादि धर्मक्रिया सर्वत्र बंद पडल्या आहेत. वैदिक धर्माला ग्लानी आली आहे. प्रजाजन नरकांतल्या प्राण्यांप्रमाणें सतत दुःख भोगीत आहेत. या पट्टणांत कोठें गेलें तरी यांचीं दुष्कर्मेंच ऐकूं येतात, तुझ्या कृपाप्रसादानेंच हा इतका मदोन्मत्त झालेला दिसतो; आतां तरी तूं याला विवेकी बनव, याचा दुरहंकार नाहींसा करण्यासाठींच भिक्षुक वेशानें येऊन मीं त्याला ही पीडा केलेली आहे. तरीपण तुझ्या प्रार्थनेप्रमाणें आतां मी त्याचें रक्षण करतों.'



श्री जगद्गुरु रेणुकाचार्यांकडून गोरक्षांचा गर्वहरण.

असें म्हणून रेणुकाचार्य गोरक्षाजवळ गेले व त्याच्या हृदयांत घुसलेल्या खड्गाला त्यांनीं अमृतहस्त लावल्याबरोबर तें खड्ग त्याच्या छातींतून निघून खालीं पडलें, तेव्हां गोरक्ष पुनर्जन्म झाल्याप्रमाणें जगद्गुरु रेणुकाचार्य व महालक्ष्मी या दोघांना वंदन करतां झाला, व म्हणाला, 'जगद्गुरो, कृपानिधे, मीं अज्ञानानें आजपर्यंत अनेक तपस्वी जनांना छळलें आहे, तुझ्यासारख्या महात्म्याचे हात तोडण्याची आज्ञा पत्नीला मीं केली. मी कितीतरी कठोर हृदयाचा आहें! मी किती पापी! आजपर्यंतच्या माझ्या पापांचें स्मरण झाल्याबरोबर छाती धडधडूं लागते. आपण खरोखर माझ्या उद्धारासाठींच एथें आलेले दिसतां. म्हणून महास्वामी, माझे सर्व अपराध माफ करून माझा आतां उद्धार करा. थोड्याशा विद्येनें मी इतका मदांध झालों होतों, असें म्हणून सहकुटुंब सहपरिवार गोरक्ष रेणुकाचार्यांना शरण गेला.

तेव्हां रेणुकाचार्य म्हणाले, 'हे गोरक्षा, तुझ्याबद्दल माझे मनांत मुळींच राग नाहीं, यापुढें मात्र अशीं निष्ठुर कृत्यें कधींही करूं नकोस. तुला सुधारण्यासाठींच मीं ही लीला केली. महालक्ष्मीचा भक्त असूनही तूं भक्तिमार्ग आचरण्याऐवजीं पाप मार्गच आचरत आलास. आतां दुष्कृत्यें करण्याकडे मन वळूं देऊं नकोस. प्राणीमात्रां-वर दया कर, सर्व प्राणीमात्रांना आत्मवत् पाहणें हेंच सत्पुरुषांचें लक्षण होय व प्राण्यांची हिंसा करणें हें दुष्टांचें कार्य होय. कितीही कठीण काल आला तरी, मनुष्यानें धर्मभ्रष्ट होऊं नये. इह लोकीं व परलोकीं कीर्ति मिळविण्याचा प्रयत्न कर, कीर्ति मिळवून थोडा काळ

जगलें तरी बराच काळ जगल्यासारखें होय; हा देह क्षणभंगुर आहे, संपत्ति वाऱ्यांतील दिव्याच्या ज्योतीप्रमाणें चंचल आहे, यमदेव शेवटच्या क्षणाची वाट पहात जवळच बसलेला असतो, म्हणून तूं नेहमीं पुण्योपार्जन कर. आपत्कालींसुद्धां खोटें बोलूं नकोस, दुष्टांची संगती सोड, नेहमीं गोड बोल, हितकारक वचनांवर विश्वास ठेव, शिष्यांचा प्रतिपाल कर, भक्तिमार्गाची वाढ कर, गोपालापासून तें भूपालापर्यंत सर्व जगाकडे निःपक्षपातानें पहा; याप्रमाणें वागल्यास तुजवर परमेश्वराची कृपा होईल. कुटिलमंत्रसिद्धी सोडून दे, सज्जन-संगती धर, दारी आलेल्या अतिथींस शक्य तें सहाय्य देत जा, परधन, व परक्षेत्र यांची अभिलाषा स्वप्नांत सुद्धां धरूं नकोस. कुमार्गावर गेलेल्या इंद्रियरूपी घोड्यांना मनाचा लगाम लावून जीवात्मारूपी सारथ्याकडून सन्मार्गावर आण. वृक्षांत जसा कल्पवृक्ष, गाईंत जशी कामधेनु, पर्वतांत जसा मेरू, त्याप्रमाणें देवांमध्यें परशिव श्रेष्ठ आहे. म्हणून तूं त्याचीच आराधना कर! मीं एथवर सांगितलेला हितोपदेश नीट ध्यानांत ठेवून वाग.'

वरील हितोपदेश ऐकून गोरक्ष म्हणाला, 'हे जगद्गुरो' तुझ्या दर्शनमात्रेंकरून माझी सर्व पापें नाहींशीं झालीं आहेत. याउपदेशा-मृताच्या शिंचनानें माझा आत्मा शुद्ध झाला आहे. यापुढें पाप माझ्या मनांत येणेंच शक्य नाहीं; कारण माझें सर्व अज्ञान आज दूर झालें आहे, ईश्वराराधनादि पुण्यकर्में आचरण्यासाठीं माझें मन आतां अतुर झालें आहे. हे दयानिधे, तूं लोककल्याणासाठींच या भूतलावर अवतरला आहेस. हे जगद्गुरो, तुझ्यासारखा गुरु मला कोठून मिळणार!

तुझ्याकडून मीं जर भवविनाशक शिवसिद्धांत जाणून घेतला नाहीं, तर मग कल्पवृक्षाखालीं बसूनसुद्धां इष्टार्थसिद्धि करून न घेतलेल्या दुर्भाग्याप्रमाणें मी ठरेन. म्हणून हे जगद्गुरो, मला शिवतत्त्वोपदेशानें कृतार्थ करा.' यावर श्रीरेणुकाचार्यांनीं वेदागमसारभूत अशा शिवसिद्धांताचा उपदेश गोरक्षाला करून, त्याला धन्य केलें. नंतर सर्वांकडून जयजयकार घेत श्रीरेणुकाचार्य आकाश मार्गानें तेथून निघाले, ते अयोध्या, उज्जयिनी, मायावर, जालंदर, मदुरा, वगैरे देशांना जाऊन तेथें परशिवाचें महात्म्य सांगून अतुलनीय अशा शिवभक्तीचा प्रसार त्यांनीं केला.

एका देशाहून दुसऱ्या देशास खगगतीनें जातांना श्रीरेणुकाचार्य ईश्वरीसृष्टीचें वैचित्र्य पहात पहात व दयासागर अशा परशिवाचें सतत ध्यान करीत सर्व भुवनें हिंडत हिंडत मलयाचलाला गेले.

त्याकाळीं मंगळवेढें नामक गांवांत-मायादेवी नांवाची एक स्त्री श्रीरेणुकाचार्यांच्या ध्यानधारणेंत वेळ घालविते, म्हणून प्रसिद्धीस आली होती. तिला मूल नव्हतें म्हणून तिनें पुष्कळ जपतपानुष्ठानें केलीं, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांचेंच ध्यान करीत असतां गर्भवती होऊन तिला अतिशय सुंदर अशी एक मुलगी शुभ दिवशीं झाली. बारा दिवस झाल्यानंतर पुरोहितांना बोलावून तिनें त्या मुलीचें नांव रेवणांबा असें ठेविलें. दिवसें दिवस ती मुलगी चंद्रकलेप्रमाणें वाढूं लागली व तीन चार महिन्यांतच बोबड्या बोलांनीं आणि विविध क्रीडेनें मातेचें मन रिझवूं लागली. बाळपणापासूनच

ती मुलगी रेणुकाचार्यांच्या स्तुतिस्तोत्रांत प्रेम दाखवूं लागली. कालानुसार तिला दहावर्षें पूर्ण झालीं. सर्व अवयवांमध्यें सौष्ठव दिसूं लागलें. तोंडावर दिव्य कांति चमकूं लागली. तिचें आंगसौष्ठव, कोमल भाषण, सहजसौंदर्य, गुरुभक्ति, व इतर कला पाहून मायादेवीला मूठभर मांस चढलें, आपल्या पुण्योदयाची ती आपणच स्तुति करूं लागली व गुरुचरणीं अधिकच लीन होऊन कालक्रमण करीत होती.

एके दिवशीं त्या पट्टणचा राजा वीरबिज्जळ यानें पूर्वी मासनूरच्या नदीमध्यें रेणुकाचार्यांनीं ठेवलेल्या खड्गाचा वृत्तांत ऐकून वाटेल त्या प्रयत्नानें तें खड्ग मिळवावें, म्हणून पुष्कळ प्रयत्न केले, पण यश कांहीं आलें नाहीं. शेवटीं त्यानें हें खड्ग जो आपणाला मिळवून देईल त्याला आपण अर्धें राज्य देऊं असा डांगोरा पिटविला. ती बातमी चोहोंकडे पसरली. अनेक मांत्रिकांनीं कित्येक बळी देऊन तें खड्ग नदीबाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण कोणालाही यश आलें नाहीं. इतक्यांत मायाविद्येंत अत्यंत प्रवीण अशी खर्पर नांवाची कोंकणांतील एक स्त्री ती बातमी ऐकून बिज्जळराजाकडे यावयास निघाली.

मीं आजपर्यंत मंत्रसामर्थ्यानें अनेक असाध्य गोष्टी साध्य करून दाखविल्या आहेत, मग नदींतून एक खड्ग बाहेर काढण्याचें साधें काम माझ्या हातून होणार नाहीं काय? असें तिला वाटलें, म्हणून वाघावर बसून हजारों शिष्यांसह ती योगिनी त्वरेनें मंगळवेढ्याला आली.

तिच्या आगमनाची वार्ता ऐकून राजा वीरबिज्जळानें आपलें चतुरंगबल सामोरें पाठविलें व मोठ्या सन्मानानें तिला वाड्यांत आणून तिचा यथोचित सत्कार करून रत्नखचित सिंहासनावर तिला बसवून म्हणाला,

'हे योगिनी, मासनूरचे नदींत असलेलें खड्ग मला मिळावें हीच माझी अभिलाषा आहे, जो माझी ही इच्छा पूर्ण करील त्याला मी सोन्याची रास देईन, हें सत्य होय. या खड्गासाठीं मीं आजपर्यंत पुष्कळ प्रयत्न केले, पण तें मिळविणें शक्य झालें नाहीं. शांबरीविद्या जाणणारे येऊन प्रयत्न करून गेले. दिवसें दिवस खड्गाबद्दलची माझी अभिलाषा वाढत आहे. तुझ्या प्रयत्नानें हें खड्ग मला मिळेल असें मला वाटूं लागलें आहे. कारण तुझ्याइतकें समर्थ आतांपर्यंत कोणी आलें नाहीं. माझ्या पुण्योदयानेंच तूं आली आहेस असें वाटतें. तेव्हां तूं आतां त्या प्रयत्नाला लाग.

तेव्हां योगिनी म्हणाली, या सामान्य कार्यासाठीं तुम्हीं विनाकारण इतके श्रम घेतले. हें कार्य तुम्हांला असाध्य वाटलें, पण मी आजपर्यंत केलेल्या चमत्कारापुढें हें कांहींच नाहीं. शंकिनी, डाकिनी वगैरे पिशाच्चें माझ्या मंत्रांना वश होऊन माझे दासानुदास बनत असल्यामुळें मला कोणतें काम कठीण आहे.? तुम्ही कांहीं काळजी करूं नका. हें खड्ग तुम्हांला मिळवून देतें, असें प्रतिज्ञेवर सांगतें. कोणतेंही उग्रकार्य साध्य करून घेण्यासाठीं तदनुसार अगोदर आहुति द्याव्या लागतात. तेव्हां या खड्गाखातर बाराहजार कुमारी

बळी दिल्या पाहिजेत, तुमच्यासारख्या सत्ताधीशांना ही गोष्ट अशक्य नाहीं. ती तुम्ही करीत असाल तर मी त्या नदीतीरीं जातें.

वरील अट ऐकून राजा जरी स्तंभित झाला, तरीपण खड्ग मिळविण्यास उत्सुक असल्यामुळें त्यानें तें कबूल केलें व अधिकाऱ्यांना हुकूम केला कीं खड्ग मिळविण्यासाठीं बारा हजार कन्यकांचा बळी देणें अवश्य असल्यामुळें प्रत्येक घरांतून कुमारिका गोळा करून आणा.

रणांगणावर शूरांशीं झगडणाऱ्या आम्हांवर पोरी धरून आणण्याचा हा काय प्रसंग आला! म्हणून सैनिक खेद करीत होते. पण राजाज्ञेप्रमाणें त्यांना करणें भागच होतें. आज्ञाभंग केल्यास कोणती शिक्षा होईल याचा कांहीं नियम नाहीं, कोंकण्या योगिनींनें राजाच्या मनांत हें कृत्य भरविलें, म्हणून तिलाच मारून टाकावें तरीही राजभय आहेच. प्रजाभिवृद्धीला क्षेत्ररूप असलेली ही सामुग्री एवढ्या मोठ्या प्रमाणांत नष्ट करून राज्याला कलंक लावण्याचा प्रसंग आला आहे. वगैरे विचार राजदूतांच्या मनांत येत, पण राजाज्ञा पाळणें एवढाच आपला धर्म, तिचे शुभाशुभ परिणाम राजालाच. असा विचार करून राजदूत पट्टणांत गेले व प्रत्येक घरांतून कुमारिका पकडून आणून त्या बंदीशाळेंत ठेवल्या. मुलींच्या हाहाःकारानें आकाशपाताळ एक झालें, त्यांचे आईबाप दुःखसागरांत बुडाले, राजदूतांनीं कुमारिका गोळा केल्या, पण एक कमी पडत होती. तेव्हां मायादेवीच्या घरीं जाऊन तिची एकुलती एक मुलगी रेवणांबाही त्यांनीं पकडून नेली.

तेव्हां मायादेवीवर हजारों विजा पडल्यासारखें झालें. ती मूर्च्छित पडली. शुद्धीवर आल्यानंतर रडत रडत व छाती बडवीत ती प्रार्थना करूं लागली. हे कृपानिधे रेणुका, रात्रंदिवस मी तुझ्याच ध्यानांत मग्न असतें, असें असून म्हातारपणीं झालेली माझी मुलगी माझ्यापासून हिरावून घेतली गेली, तीही तुझी परमभक्त आहे, मग तिच्यावर अशी आपत्ति येणें बरें आहे काय?

हे रेणुकदेशिकेश्वरा, मीं तुझा असा कोणता अपराध केला? जरी मीं अपराधी असलें तरीही हे कारुण्यनिधे, ते सर्व मला क्षमा कर. तुझ्या चरणीं आम्हीं दोघीही शरण आलों आहोंत, तेव्हां आम्हांवर दया करून महान् कीर्ति मिळव. रेवणांबा नेहमीं प्रमाणेंच उठून स्नानादि आटोपून व भस्म, रुद्राक्ष धारण करून श्रीरेणुकबिंब उच्चासनावर ठेवून, त्याचें षोडशोपचारानें पूजन करून, ध्यान करूं लागली. तिच्या मनावर कांहींही परिणाम न झालेला पाहून, मायादेवी म्हणाली 'मुली, तुला बळी देण्यासाठीं नेण्यास राजदूत आले आहेत, तुझा नाश मी कसा सहन करूं? पुढें माझी गती काय होईल? तेव्हां रेवणांबा म्हणाली, माते, हा देह अनित्य आहे, हें तुला माहितच आहे. प्रारब्धानुसार प्राणीमात्रांना सुखदुःख भोगलेंच पाहिजे. श्रीरेणुकाचार्यांच्या कृपाप्रसादानेंच आपण वाढलों असल्यामुळें, त्यांच्या अनूज्ञेनुसार आपण सर्व कांहीं भोगलें पाहिजे; आम्हांवर संकटें आलीं तरीही रेणुकाचार्यांच्या कृपाप्रसादानें तीं शाश्वत-सुखालाच कारण होतील. म्हणून माते, तूं शोक करूं नकोस. गुरुवर्यांची भक्ति करणारा कोणीही आजपर्यंत नाश पावलेला नाहीं,

संकट प्रसंगीं दुःख न करणें हेंच शहाणपणाचें लक्षण होय. असें म्हणून ती रेणुकाचार्यांच्या ध्यानांत लीन झाली. राजदूत नेण्यास आल्यावर ती त्यांच्या स्वाधीन झाली व म्हणाली, हे सिद्धकुलचक्रवर्ति, जगद्गुरो, अपार करुणासागरा, सकल मंगल निवासा, सर्वव्यापका, भक्तपालका, रेवणसिद्धा, तुझा जय असो. राजाला जेव्हां तिची ही भक्ति व माया देवीचा विलाप कळला तेव्हां बळी देण्याच्या कुमारिकांच्या संख्येची पूर्ति झाली म्हणून जरी राजा आनंदित झाला होता तरी—तो अतिशय दुःखी झाला.

सर्वांतर्यामीं रेणुकाचार्यांनीं तो विलाप व ती स्तुति ऐकून मलयाद्रि सोडला व आकाश मार्गानें मंगळवेढें गांवीं ते आले. लगेच देवतांनीं पुष्पवृष्टी केली, सुगंधयुक्त शीतळ वारा वाहूं लागला, दुंदुभींचा निनाद सुरू झाला, लता व वृक्ष फलपुष्पांनीं भरून गेले, गांवकऱ्यांचीं मनकमलें विकसित होऊन संतोषामोद सोडूं लागलीं, मंदिरांचे दरवाजे आपोआप उघडले गेले, 'हे मायादेवी, तुझ्या भक्तीला भाळून तुझे मनोरथ ताबडतोब पूर्ण करण्यासाठींच आलों आहें, भिऊं नकोस, तुझी पुत्री नेहमीं माझेंच ध्यान करीत असल्यामुळें, यमदेवही तिला स्पर्श करूं शकणार नाहीं, रडूं नकोस, मी तुझी मुलगी परत आणून देतों. असें म्हणून ते वीरविज्जळाच्या राजवाड्याकडे गेले.

जगद्गुरु अकस्मात् आलेले पाहून राजा चकित झाला. त्यांना उच्चासनावर बसवून षोडशोपचारांनीं त्यांची पूजा करून खड्ग

मिळविण्याबद्दलची आपली इच्छा व खर्परीच्या सांगण्यावरून ठरविलेलें बलिदान वगैरे सर्व माहिती त्यानें आचार्यांना सांगितली. तेव्हां आचार्य म्हणाले, राजा, खड्गासाठीं बारा हजार कुमारिकांना बळी देणें, हा काय धर्म झाला? स्त्रीहत्या हें महापातक होय, ही गोष्ट तूं ऐकली नाहींस काय? प्रजेपैकीं कोणालाही पीडा न करणें हाच राजधर्म नव्हे काय? असें असून तूं स्वतांच इतक्या बालिकांचा प्राण घेणार हें काय? प्रजेला तूंच मारूं लागलास तर तिचें रक्षण कोण करणार! प्रजेचें पालन पुत्राप्रमाणें जो करतो, तोच राजा. आज्ञानी जनांनासुद्धां कळणारी ही गोष्ट तुला कशी कळत नाहीं? इहलोकाप्रमाणेंच परलोकचीही भीति सोडून हें कार्य तूं आरंभिलें आहेस; पण त्यामुळें कोट्यावधि वर्षें नरकांत पडण्याची तयारी करीत आहेस. मागील अनेक जन्मांच्या पुण्याईमुळें तूं या जन्मीं राजा झाला आहेस; पण अशा कृत्यांनीं तूं पुढील जन्मीं काय होशील याचा विचार केला आहेस काय? स्वार्थी व पापी खर्परीच्या या मायाजालांत सांपडून बारा हजार बालिकांचे बळी घेण्यास तूं तयार व्हावेसना? हे राजा, तुझें वैभव, नव्हे खुद्द तुझें शरीरही नित्य नाहीं. म्हणून असलें पातक करूं नकोस. प्रजा संतुष्ट राहील तर तुझी कीर्ति दाहीदिशांना जाईल, प्रजाप्रेम तुजवर नसेल, तर तूं अधिककाळ राज्य करूं शकणार नाहींस, म्हणून राजधर्माचें उल्लंघन करूं नकोस. पापिणीच्या सल्ल्यानें अपकीर्ति जोडूं नकोस, तुझें हें अपवित्र कार्य पाहून ईश्वर तुझ्यावर कोप करील, इतक्या बालिकांचा वध करून तूं कोणतें साम्राज्य मिळविणार? तुझ्या राजधानींत

शोकालाप ऐकूं येत आहेत; सर्व प्रजा तुला शाप देत आहे, म्हणून या पापाचरणापासून तूं सत्वर परङ्गमुख हो; तुला हें खड्ग हवें असेल, तर चल, मी तुला तें काढून देतों. तुला बलिदानाचा सल्ला देणारी ती पापिणी मला दाखव. मासनूरच्या नदीच्या कांठीं सर्व परिवारांसह अनेक मंडलें रचून व भूतगणांचें आवाहन करून बळी द्यावयास बारा हजार कन्यकांचीच वाट पहात खर्परी बसली होती. पण रेणुकाचार्यांच्या कोपाग्नीमुळें तिची छाती एकाएकीं जळूं लागली, तेव्हां ती जमिनीवर लोळूं लागली, भूतगण व तिचा परिवार दूर सरला, पुन्हां शुद्धीवर येऊन ती योगिनी मंत्र म्हणूं लगणार इतक्यांत तिचें तोंडच बंद झालें, तंत्र आचरूं लागल्याबरोबर हात जागचेजागीं स्थिरावले, हृत्कंप वाढला. हा काय प्रकार आहे? याचा ती विचार करते तों कांहीं लोकांनीं येऊन रेणुकाचार्यांच्या आगमनाची व राजाबरोबर झालेल्या त्या भाषणाची माहिती तिच्या कानांवर घातली. रेणुकाचार्य खरोखरच महापुरुष असले पाहिजेत, नाहींतर मला इतकी बाधा कधीं झाली नसती, असें ती मनांत म्हणाली. ते दूर आहेत तोंच इतका त्रास झाला मग ते समीप आल्यावर माझी काय दशा होईल! असें ती म्हणूं लागली. इतक्यांत रेणुकाचार्य राजासमवेत येत आहेत असें ऐकतांच गरुडाला भिऊन साप पळतो त्याप्रमाणें ती खर्परी तेथून निसटली.

हें पाहून राजाला श्रीरेणुकाचार्यांचें महात्म्य अधिक पटलें! व त्यांच्या चरणांवर पडून तो म्हणाला, 'हे जगद्गुरो, आयुधाच्या मोहानें मी खर्परीचा पापी सल्ला ऐकून हें दुष्टकर्म करण्यास प्रवृत्त

झालों, आपण येथें येण्यास जर एका क्षणाचा विलंब झाला असतां तर हें पापकर्म चालू करून, अनेक युगें अपकीर्तीला प्राप्त झालों असतों. कितीही जन्म आपली सेवा केली तरी आपले हे उपकार फिटणार नाहींत. नरकांत पडूं पाहणाऱ्या माझा आपण उद्धार केला आहे. म्हणून हे स्वामी, आतां माझें अपराध माफ करून माझें रक्षण करा.' तेव्हां रेणुकाचार्य म्हणाले, 'राजा, प्रथम त्या बारा हजार कुमारिका घरोघर पोहोंचत्या कर, नंतर आपण मासनूर येथील नदीकडे जाऊं.' त्याप्रमाणें राजानें केल्यावर ते दोघे नदीतीरीं आले.

तेव्हां ते सिद्धाग्रणी, सर्व लोकांसमक्ष त्या नदींत शिरून खड्ग घेऊन बाहेर आले व म्हणाले, 'राजा तूं या खड्गासाठीं फार खटपट केली आहेस, म्हणून तुला मी हें देत आहें, घे. राजानें तें हातीं घेतांच त्याचा पंचमुखी सर्प झाला. तेव्हां राजा फारच घाबरला, हें माझ्या पापांचें प्रायश्चित्त, कीं आचार्यांची लीला, अथवा आचार्यांचेंच सामर्थ्य! याबद्दल त्याला पेंच पडला; इतक्यांत रेणुकाचार्यांनीं तो आपल्या हातीं घेतल्याबरोबर त्याचा एक यक्ष होऊन त्यांच्यापुढें उभा राहिला व म्हणाला, 'हे प्रमथवर्या, 'आजपर्यंत कोणत्या ना कोणत्यातरी मुनीच्या शापानें देवाकृति सोडून राक्षसाकृति धारण करून मी नरभक्षण करीत आलों, तुझ्या अनुग्रहानेंच आतां मी सर्व शापांतून मुक्त झालों आहें. कैलासाहून तूं अवतरला नसतांस तर माझ्या सारख्यांना आणखी कितीतरी काळपर्यंत अशाच दुःस्थितींत रहावें लागलें असतें! यक्षवंश असेंपर्यंत तुझे उपकार आम्ही स्मरत राहूं.' असें म्हणून श्रीरेणुकाचार्यांना वंदन करून त्यांच्या आज्ञेनुसार

विमानांत बसून तो यक्ष देवलोकीं गेला. यक्षिणीसह तो यक्ष देवलोकांमध्यें पुढें सतत सुख अनुभवीत राहिला. बिज्जळराजानें रेणुकाचार्यांची पूजा केली. नंतर तेथून निघतांना आचार्य म्हणाले, 'हे राजा, तुझें कल्याण होवो, तुझ्या राज्याची भरभराट होवो.' असा आशीर्वाद देऊन आचार्य मलयपर्वताकडे परत गेले.

इकडे एके दिवशीं कांची नगराधिपती चोळराजा यानें इंद्राला भेटण्यासाठीं केरळ, पांड्य, वगैरे देशच्या राजांना बरोबर घेऊन स्वर्गलोकांतील अमरावतीला जाऊन इंद्रसभेंत प्रवेश केला. पण सिंहासनावर बसलेल्या इंद्राबद्दल यत्किंचितही आदर न दाखवितां, आपणही इंद्रासमान आहोंत, असें मानून आपल्या मित्रांसह अहंकारानें तो उच्चासनावर जाऊन बसला. तेव्हां इंद्राला संताप येऊन त्यांना शासन करण्याचें त्यानें ठरविलें व त्यांचें आदरातिथ्य न करतांच त्यांना तेथून घालवून दिलें. तेवढ्यावरच स्वस्थ न राहातां कांहीं दिवसानंतर चोळनृपतीला आपल्या मित्रांसह बोलावून आणण्यासाठीं इंद्रानें आपला सारथी मातली याला पाठविलें, व इकडे इंद्रपुरीच्या महाद्वारावर त्यानें पादत्राणें (जोडे) टांगून ठेवविलीं. मातली कांचीपट्टणाला गेला व राजाची भेट घेऊन म्हणाला, 'हे राजन्, कांहीं विशेष कामाची चर्चा करण्यासाठीं देवेंद्रानें आपणांस निमंत्रण केलें आहे, तेव्हां आपल्या मित्रांसह आपण चलावें. चोळ राजाचे लक्षांत इंद्राचें कपट मुळींच आलें नाहीं. आपण आतां देवमान्य झालों, असा त्याला गर्व झाला, व केरळ, पांड्य वगैरे देशच्या राजांना बरोबर घेऊन व मोठ्या रथांत बसून तो अतिशय

थाटानें निघाला. इंद्रपुरीच्या तटापर्यंत रथ वेगानें गेला तेव्हां त्याला महाद्वारावर टांगलेलीं पादत्राणें दिसलीं. अर्थातच तो संतप्त झाला, व माझ्यासारख्या शिवभक्ताचा अपमान करण्यासाठीं मुद्दामच देवेंद्रानें हा प्रकार केला, हें ओळखून त्यानें वेगानें रथ आंत नेला. इंद्रालाही उपरती झाली व भूलोकांतील प्रसिद्ध राजाचा अधिक अपमान करणें बरें नव्हे, असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें त्यांचें स्वागत करून आपल्या आसनावरच बसवून घेतलें व एक रत्नहार त्याच्या गळ्यांत घालून देवेंद्र म्हणाला, 'हे चोळ भूपाळा, तूं केलेल्या यागादि धर्मकर्मांनीं मी संतुष्ट झालों आहें, तुझा पराक्रम असामान्य आहे, या रत्नहाराच्या प्रभावानें तुझें तेज द्विगुणित होईल, तुला सामान्य राजा समजून साध्या गोष्टीनें रागावून मीं तुझा अपमान केला मला त्याबद्दल क्षमा कर.'

तेव्हां राजा म्हणाला, 'हे इंद्रा, पूर्वीं मी आलों असतां तुला नमस्कार केला नाहीं म्हणून तुझा गैरसमज झाला, पण मी कांहीं केवळ अहंकारानें तसें केलें नव्हतें; तसें करण्याचें कारण ऐक.

॥ शिव एकोध्येयः शिवशंकरः सर्व मन्यत्परित्यज्य।

॥ एक एव रुद्रो न द्वितीयाय तस्थे ॥

इत्यादि श्रुति प्रमाण मानूनच त्रैलोक्याधिपति, देवतासार्वभौम, सर्वज्ञ, व सर्वकर्ता अशा पार्वतीवल्लभाशिवाय मी कोणापुढेंही मस्तक नमवित नाहीं. "रुद्रेणात्तमश्नन्ति" इत्यादि वेदवाक्यांनुसार शिवमूर्तींच्या निर्माल्याशिवाय मी कशाचाही स्वीकार करीत नाहीं, ही माझी प्रतिज्ञाच आहे, या प्रतिज्ञेचा भंग न व्हावा, म्हणूनच मीं

तुला नमस्कार केला नाहीं." तेव्हां देवेंद्र म्हणाला, तुझीं हीं शिवव्रतें परिशुद्ध आहेत, मीसुद्धां त्या महादेवाच्या मंत्रानेंच या पदवीला पोहोंचलें आहें. ईश्वराच्या आज्ञेनें मी जसा देवेंद्र झालें. तसा तूंही भूपेंद्र हो. या पुढें भूलोकावर चोळ राजेंद्र याच नांवानें तूं प्रसिद्धीस येशील.' असें म्हणून धनकनकादिकेंकरून इंद्रानें त्याचा सन्मान केल्यावर चोळराजेंद्र स्वनगरीला परत गेला. पुढें सहजासहजीं बरेंच वैभव त्याला प्राप्त होऊन अनेक सुखें भोगीत व शिवलिंगाराधना करीत तो धर्मानें राज्य करीत राहिला.

याप्रमाणें त्याला सर्व सुखें होतीं, पण पुत्ररत्न नव्हतें. 'संतती नसेल तर मनुष्य दुर्गतीला जातो,' हें ऐकून तर तो अधिकच दुःखी झाला होता. त्याची पट्टराणी कुलशेखरी एके दिवशीं आपल्या दासीला म्हणाली, 'सखे पुत्रप्राप्ती हेंच खरें भाग्य, आपल्या बाळाचे बोबडे बोल ऐकत त्याचें चुंबन घेणाऱ्या माताच धन्य होत, मी खरोखर हतभागी होय. मूल नसलेलें घर, सौंदर्य नसलेली स्त्री, विनयविरहित विद्या, पंडिताविण सभा, हंसावांचून सरोवर, राजा शिवाय देश, फुलावांचून कमलिनी हीं जशीं शोभत नाहींत तशी निपुत्रिक स्त्रीही शोभत नाहीं. पुत्रहीन स्त्रियांनीं कितीही पुण्यकर्में केलीं तरीही त्यांचा काय उपयोग'! याप्रयाणें शोक करीत व उसासे टाकित ती महालांत बसली होती. दासींकडून पट्टराणीची ही स्थिती ऐकून राजा सत्वर अंतर महालांत गेला व तिला म्हणाला, 'नित्या-प्रमाणें तुझें मुखबिंब आज प्रफुल्ल कां दिसत नाहीं? बिंबोष्ट कांतिहीन कां झाले आहेत? नेत्रकमलें कां कोमेजलीं आहेत? तूं अश्रु कां

गाळीत आहेस? तुझ्या कंठांत मुक्तहार कां नाहीं? कमरेंत पट्टाही नाहीं! कानांतील कुंडलें काय केलीं? मस्तकावर भस्मही दिसत नाहीं! सर्वांगाला हळद कां लावलेली नाहीं? या सर्व प्रकारावरून तूं शोकग्रस्त असावीस असें वाटतें. पण कधींही न झालेली अशी ही तुझी स्थिती कां व्हावी? कांहींही संकोच न धरतां काय तें सांग.' असें म्हणतांच हात जोडून राणी म्हणाली, 'प्राणपती, आपण सर्व भूमंडलाचे नायक आहांत, स्वर्गाधिपति देवेंद्रानेंही तुमचा सन्मान केला, सर्व वैभवसंपात्ति तुमच्या जवळ आहे, पण आपणाला पुत्ररत्न नाहीं याबद्दल मला फार दुःख वाटतें, "अपुत्रस्य गतिर्नास्ति" ही आर्योक्ति मला फार चिंता देत आहे.' राजानेंही एक सुस्कारा टाकून म्हटलें, प्रिये, तुझी चिंता स्वाभाविक आहे. या बाबतींत तुझ्यापेक्षांही मला अधिक चिंता लागून राहिली आहे. आम्हीं रेणुकाचार्यांची कृपा संपादन करून शिवलिंगधारणपूर्वक शिवमंत्रोपदेश घेतला, तरीही आमची इच्छा पूर्ण होत नाहीं, आम्ही धर्मासक्त व शिवपूजा-निरत असून सर्व वैभवसंपन्न आहोंत, पण संततीचें भाग्य तेवढें नसल्यामुळें दुःखी कष्टीच आहोंत. रेणुकाचार्यांच्या कृपेनेंच जगांत मी राजाधिराज म्हणविला जातों, देवेंद्राकडून पूज्य ठरलों, पण आत्मसमान म्हटला जाणारा पुत्र मात्र तुझ्या पोटीं जन्मला नाहीं; अशा स्थितींत जगप्रसिद्ध असा आमचा वंश उत्तरोत्तर वाढणार कसा? ही चिंता मला एकसारखी पीडीत आहे. चिता व चिंता यांमध्यें बिंदू मात्राचाच फरक आहे. चिता प्राणहीन देहाला जाळते, तर चिंता प्राणधारी जीवांना जाळते. म्हणून चितेपेक्षांही

चिंता ही अधिक निष्ठुर होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. गृहस्थांना संततीहीनतेसारखें दुसरें दुःख नाहीं. हें दुःख सहन करूनही लोकविख्यात्, महिमासागर, अशा जगद्गुरु रेणुकाचार्यांना आपण असामान्य भक्तीनें भजूं या. हे जगद्गुरु कांहीं सामान्य नाहींत. देवता सार्वभौम अशा परशिवाचे मुखांतून उत्पन्न होऊन सर्वज्ञत्वादि गुणांचें वैभव धारण करून, प्रमथाधिपती होऊन, शिवमताची स्थापना करण्यासाठींच ते या भूलोकावर अवतरले आहेत. इतर जीवांप्रमाणें ते जन्मले नसून शिवलिंगांतूनच उद्भवले आहेत. त्यांचा देह अप्राकृत असून त्यांनीं अगस्त्यादि महर्षींनाही गुरूपदेश दिला आहे. या सिद्धकुलचक्रवर्तीवर विश्वास ठेवला असतां अशुभाची बाधा कशी होईल? तो आपले सर्व मनोरथ पूर्ण करील, यांत मुळींच शंका नाहीं.' हें राजाचें बोलणें ऐकून पट्टराणीचें समाधान झालें. नंतर त्या दांपत्त्यानें स्नानादि आटोपून शिवलिंग पूजा केली. पुढें नित्य रेणुकाचार्यांचें स्तवन व ध्यान करीत असतां एके दिवशीं रात्रीचे शेवटचे प्रहरीं पट्टराणीला एक शुभ स्वप्न पडलें. त्यांत रेणुकाचार्यांनीं दर्शन देऊन 'तुला लोकोत्तर कीर्तिशाली पुत्र होईल, असा वर दिल्याचें भासलें. त्या दृष्टांतानें आनंदित होऊन कुलशेखरीनें तो राजाला सांगितला. राजालाही तें ऐकून आनंद झाला व ते दांपत्त्य श्रीरेणुकाचार्यांची भक्ति अधिकच करूं लागलें. असा क्रम चालू असतां कुलशेखरीचे हृदयांत सांचलेलें गुरुध्यानामृतच कीं काय तिचें उदरांत शिरून ती गर्भवती झाली. दिवसेंदिवस गर्भलक्षणें दिसूं लागलीं.

पोटावरील वळकट्या अदृश्य झाल्या, नाभिस्थान विशाल बनलें, मुखावर कांति आली, सुस्ती वाटूं लागली, गर्भभारामुळें पाउलें जड पडूं लागलीं, स्तनांत दूध भरलें, स्तनाग्र काळवंडले, पूंसवन, सीमंतादि संस्कार, यथाविधि करण्यांत आले. प्रौढस्त्रिया रोज कुलशेखरीला सुगंधयुक्त पाण्यानें नाहूं घालीत, व मधुरान्न जेवूं घालीत, तिची वेणीफणी करून उत्तम वस्त्रें नेसवीत, अलंकार घालीत, मंत्र्यांच्या स्त्रिया राजवैभवानें वाड्यांत येऊन अमूल्य रत्नांनीं व वस्त्रांनीं राणीला विभूषित करून तिला गंधलेपन करीत, सर्व प्रजा नजराणे आणीत होती. याप्रमाणें समारंभ चालले असतां नऊ महिने भरले. सूर्यादि पंचग्रह उच्चस्थानीं असतां, शुभमुहूर्तावर शिवप्रसादें करून दिव्य व सुंदर अशा मुलाला कुलशेखरीनें जन्म दिला.

लगेच दासींनीं जाऊन राजाचे कानांवर ही शुभवार्ता घातली. राजानें पुत्रजन्मोत्सव साजरा करण्याचा हुकूम दिला सारी नगरी तोरणादिकांनीं आलंकृत झाली. कोटाच्या चारी महाद्वारांवरून मंगलवाद्यांच्या निनादानें आकाश दुमदुमून गेलें. सर्वत्र आनंदोत्सव माजला, सर्व देवालयांतून अभिषेक पूजादि धर्मकार्यें करण्यांत आलीं. वीर माहेश्वरांनीं जपादि क्रिया करून नूतन बालकाला आशीर्वाद दिला. राजानें अपरिमित दान दिलें. व शेतसारा माफ केला. प्रजा-हिताची टिकावू कामें त्यांनीं हातीं घेतलीं मांडलिकांना हक्क दिले. कारागृहांतील कांहीं कैद्यांना मुक्त केलें. याप्रमाणें सर्वत्र आनंदी आनंद झाला. बालसूर्याप्रमाणें प्रकाशत असलेलें आपल्या पुत्राचें मुखकमल पाहून राजा संतुष्ट झाला.

कांहीं कालानंतर सुराचार्य बृहस्पति एके दिवशीं चोळ-राजेंद्राकडे येऊन त्याचें आदरातिथ्य स्वीकारून त्याला म्हणाले,

'हे राजेंद्रा, तुला पुत्र प्राप्ती झालेली ऐकून मला अत्यानंद झाला. जगद्गुरु रेणुकाचार्यांच्या कृपाप्रसादामुळेंच तुला असा पुत्र झाला, ज्या दिवशीं रेणुकाचार्य येऊन तुला दर्शन देतील व तुझ्या पुत्राला पाहतील त्या दिवसापासून-कसाला लावलेल्या रत्नाप्रमाणें-तो तेजस्वी होऊन चक्रवर्ती पदाला प्राप्त होईल असा आशीर्वाद देऊन ते इंद्रलोकाला निघून गेले.

वरील भविष्य ऐकून राजेंद्रानें अंतःपुरांत जाऊन तें पट्ट-राणीच्या कानांवर घातलें व हल्लीं रेणुकाचार्य कोठें आहेत कोणास ठाऊक? कसेंही करून त्या जगद्गुरूंना आणवून माझ्या पुत्राला त्यांचें दर्शन घडविलें पाहिजे, असें त्यानें मनांत योजलें.

सैन्यांकडून प्रणमित, शेषाला व दिग्गजांना हालविणारा, कूर्मराजाचीही पाठ कांपविणारा, धुळीनें क्षीरसागर गढूळ करणारा, सर्व दिशा व्यापून टाकणारा, स्वर्गंगेचें निर्मल जल धारण करणारा असा तो राजेंद्र पुराहून निघाला.

नंतर त्या राजेंद्रानें मल्ययाळ, महाराष्ट्र, पांड्य, द्रवीड, केरळ वगैरे देशांतील सर्व शहरें व गांवें, मोठमोठे किल्ले, अरण्यें, गुहा, तपोवनें, ऋष्याश्रम वगैरे स्थळें शोधलीं व कंटाळून कर्नाटक देशांत

गेल्यावर त्यांतील मलयपर्वतावर तो गेला. तो पर्वत अनेक फांद्या असलेल्या गगनचुंबित श्रीचंदनाच्या वृक्षांनीं, त्यांच्या छायेंत असलेल्या पर्णशालांतून आसन मांडी घालून वेदाध्ययन करीत असलेल्या ब्रह्मचर्यांनीं, जटाधारी, भस्मधारी, लिंगधारी व रुद्राक्षधारी शिवमंत्रोच्चारणशील महर्षींच्या समुदायानें सुशोभित झाला होता. होमहवनांचा घमघमीत धूम सर्वत्र दरवळला होता. कांहीं तपस्वी दर्भ व समीधा घेऊन रानारानांतून चालले होते तर कांहीं पंचाग्नी साधन करीत होते. आणखी कांहीं अंगुष्टाग्र भूमीवर ठेवून व नाशिकाग्र दृष्टि लावून अत्युग्रव्रत आचरीत होते, इतर कांहीं शिवतत्त्वविचारांत निमग्न होऊन बसले होते. हा सर्व प्रकार पाहून एथें रेणुकाचार्य असतील असें राजेंद्राला वाटलें. गाई व वाघ, साप व मुंगूस, सिंह व हरीण वगैरे प्राणी स्वभावसिद्ध वैरभाव विसरून प्रेमानें क्रीडा करीत होते. तें पाहून एथें जगद्गुरु रेवणसिद्धांचें दर्शन होईल व आपल्या श्रमाचें सार्थक होईल असें राजेंद्राला वाटलें. या तपोवनांत कोठेंहीं पाहिलें तरी भस्म, रुद्राक्ष, लिंगधारी शिवयोगी तपाचरण करीत असलेलेच दिसतात. अशा जागीं आपलें सैन्य आल्यास शांतीभंग होईल व तपस्व्यांच्या अनुग्रहाऐवजीं आपण त्यांच्या कोपालाच पात्र होऊं असें वाटून, त्यांनीं सैन्यपरिवार तेथेंच ठेवून व साधा पोषाख धारण करून पुढें गमन केलें. वाटेंत प्रत्येक मुनीला राजेंद्र विचारी कीं, 'हे महर्षे, जगद्गुरु रेणुकाचार्यांचा आश्रम कोठें आहे?' व प्रत्येकमुनी त्याला त्या आश्रमाची वाट दाखवी. शेवटीं राजेंद्रानें रेणुकाचार्यांच्या आश्रमांत प्रवेश केला. तेथें हजारों शिवयोगी

भस्म, रुद्राक्ष व लिंग धारण करून व दर्भासनावर बसून ज्योतिर्लिंगानुसंधान करीत होते, अनेक ब्रह्मचारी आगमाध्ययन करीत बसले होते, कांहींजण शिवाद्वैतसिद्धांताची चर्चा करीत होते, कांहीं कांहीं उपनिषदाच्या अर्थांचें विमर्शन करीत होते, दुसरें कांहीं पंचमुद्रा धारण करून शिवागमांचें पठण करीत होते, आणखी कांहीं 'शिवोहं' भावयुक्त होऊन निजानंद वैभवशाली झाले होते. याप्रमाणें शिवयोगवैभव असल्यामुळें शिवलोकाप्रमाणें शोभणाऱ्या त्या आश्रमाच्या मध्यभागीं कोटी सूर्यांप्रमाणें प्रकाशणाऱ्या रेणुकगणाधीशांना पाहून साष्टांग नमस्कार करून डोळ्यांतून आनंदाश्रु गाळीत चोळराजेंद्र हात जोडून रेणुकाचार्यांना म्हणाला, 'हे गुरो, आपलें दर्शन आज मला झालें ही मोठ्या भाग्याची गोष्ट होय. आपल्या अनुग्रहानें या पूर्वींच माझें जन्म साफल्य झालें आहे. आतां मी धन्य झालों. अनेक देश हिंडत हिंडत आपल्या चरणांजवळ मी आलें आहें, मला संतती नव्हती म्हणून मीं तुम्हांला नवस केला व आपली ध्यानधारणा केली. त्यामुळें मला महातेजस्वी पुत्र झाला आहे. त्यांत पुन्हां देवगुरु बृहस्पतींनीं येऊन 'मुलाकडे दिव्यदृष्टीनें पाहून आपण जेव्हां त्या बालकाला दर्शन द्याल, तेव्हां तो क्रमाक्रमानें सर्व विद्येंत निष्णात होईल व चक्रवर्ती बनेल,' असें भविष्य वर्तविलें आहे. त्यामुळें आपल्या दर्शनाबद्दल माझें कुतुहल वाढलें म्हणून आपल्या शोधार्थ निघालों आणि आज आपलें दर्शन घडलें. आतां मुनीवरा, माझ्या नगरीस येऊन सर्वांना दर्शन देऊन आपण कृतकृत्य करावें एवढीच माझी अपेक्षा आहे.

राजाची ती विनंती ऐकून रेणुकाचार्य म्हणाले, ‘हे भूपाळा, तुझी निस्सीम भक्तिं पाहून अत्यानंद झाला आहे. माझ्या दर्शनासाठीं तूं इतके श्रम घेतलेस, याकरतां मी ताबडतोब तुझ्या नगरीला अवश्य येतों’ असें म्हणून भजकांचें अभिष्टफल देण्यांत बद्धकंकण झालेले, दीनाधार, दयानिधि रेणुकाचार्य चोळराजेंद्राबरोबरच कांचीपट्टणाला गेले.

राजेंद्र व जगद्गुरु येत आहेत असें पाहून, पताका तोरणादिकांनीं कांचीपट्टण शृंगारण्यांत आलें, राजघराण्यांतील मंडळी, मंत्री, व इतर अधिकारी, आणि प्रतिष्ठित प्रजाप्रतिनिधी वगैरेनीं सामोरें जाऊन जगद्गुरूंना आडव्यापालखींतून मोठ्या थाटानें मिरवीत आणलें व राजेंद्र चोळानें त्यांना रत्नखचित सिंहासनावर बसवून, त्यांचें यथोचित पूजन केलें व त्यांच्या चरणांचें तीर्थ आपल्या मस्तकावर शिंपडून राजेंद्र म्हणाला,

‘हे आचार्यवरा, पूर्वजन्मीच्या पुण्याईनें आज माझें भवन आपल्या आगमनानें पुनीत झालें, आज माझे पूर्वज व वंशजही कृतार्थ झाले, माझे सर्व मनोरथसुद्धां आजच पूर्ण झाले.

राजेंद्राची ही स्तुति ऐकून रेणुकप्रभू संतुष्ट झाले व त्यांनीं त्याच्या बालकाला दर्शन देऊन आपला विभूतिचर्चित वरदहस्त त्याचे मस्तकावर ठेवला, त्याच्या सर्वांगावरील चक्रवर्ती लक्षणें पाहून ते संतुष्ट झाले व म्हणाले, ‘हे राजपुत्रा, तूं या लोकीं शिवभक्त

सार्वभौमराजा म्हणून कीर्ति मिळविशील, व धर्मानें राज्य करशील.' तेव्हां पत्नीसह राजेंद्र हात जोडून म्हणाला, 'हे सर्वलोकपूज्या, आम्हांवर ही आपली कृपा नित्य असूं द्या.' त्याप्रमाणें आशीर्वाद देऊन रेणुकाचार्य तेथील एकाम्रेश्वर मंदिराकडे गेले.

त्या देवालयांत रेणुकाचार्य लिंगानंद लीलावैभवानें रहात असतां त्यांच्या दर्शनासाठीं नानादेशच्या लोकांची यात्रा तेथें नित्य जमूं लागली. त्या सर्वांना आशीर्वाद देऊन ते आनंदित करीत असत.

त्यांच्या तपप्रभावामुळें दर्शनास आलेल्या जन्मांधांना दृष्टी प्राप्त होई, वंध्या स्त्रिया प्रसूत होत. थोट्या व पांगळ्यांना हातपाय फुटत, बोबड्यांना वाणी कौशल्य लाभे, दरिद्री ऐश्वर्यशाली बनत, राज्यभ्रष्टांना राज्य प्राप्ती होई, रोग्यांना आरोग्य मिळे, अल्पायुषी दीर्घायु बनत. याप्रमाणें ज्याच्या ज्या इच्छा असतील त्या ते पूर्ण करीत असल्यावर मग ते कोणाला पूज्य वाटणार नाहींत? (सर्वांना पूज्य वाटतील)

रेणुकाचार्यांनीं तुडविलेली भूमी क्षेत्र बनली, त्यांनीं उच्चारलेलीं वचनें महान्तत्वें ठरलीं, त्यांनीं आचरलेलीं कर्में पुण्यकारक मानलीं गेलीं, त्यांची दृष्टी अमर झाली, त्यांचें निवासस्थान तत्ववादसभास्थान झालें, असा ज्याचा प्रभाव आहे, तो योगिराज रेणुकगणाधीश्वर एकाम्रेश्वर मंदिरांत कांहीं दिवस विराजमान होते.

यांप्रमाणें कांहीं दिवस घालविल्यानंतर असामान्य व लोकविलक्षण महिमाशाली असें धवलयश ज्यांनीं या भूगोलावर मिळविलें त्या रेणुकाचार्यांना वाटलें कीं, आपण एथें चौदाशें वर्षे घालविलीं, आपण स्थापन केलेल्या वीरशैवमताचे पालनांत दुष्टशासन शिष्टरक्षण आणि बहिष्कार प्रायश्चित्तादि विधिनिषेध कार्यशासनांत प्रवीण अशा एकाद्या गुरुमूर्तीला आपण स्थापन केलेल्या धर्मपीठाचें आधिपत्य देऊन भक्तोद्धाराचा सर्वभार त्याचेवर टाकून आपण आतां शंभूलोकाला परत जाऊन विश्रांती घ्यावी. तेव्हां आचार्यांच्या ध्यानांत सर्वज्ञ मूर्तीश्वर परशिव येऊन त्यांच्या श्रुतीपथांत (कानांत) म्हणाला कीं, 'वत्सा, एकाम्रेश्वरलिंगापुढील भूमि स्पर्श करून अंतरंगांत भावीगुरुमूर्तीचें स्वरूप आण, कीं लगेच तशी दिव्यमूर्ती भूदेवीच्याच गर्भांतून उद्भवेल. रेणुकगणाधीश्वरांनीं ती शिववाणी ऐकून आनंदभरीत होऊन ते एकाम्रेश्वर लिंगापुढें बसले.

परशिवाचें ध्यान करून महातेजस्वी शिवयोग लक्षणभरित बालगुरुमूर्ति मनांत चिंतून रेणुकाचार्यांनीं भूमिस्पर्श केला, तत्क्षणीं कोटीविजा कडकडाव्यात त्याप्रमाणें आवाज होऊन एकाम्रेश्वरलिंगापुढील भूमी दुभंग पावली.

आश्चर्यानें रेणुकाचार्यांनीं पुढें पाहिलें तों त्यांना अरुणकांती प्रमाणें सतेज, भस्मचर्चित देहधारी, रुद्राक्षमाला विभूषित, लिंगधारी व विशाल नेत्रांची बालगुरुमूर्ति दिसली. तेव्हां देवतांनीं पुष्पवृष्टी केली, सुगंधयुक्त शीतल वारा वाहूं लागला, देवांगना नर्तन करूं लागल्या, आकाश निरभ्र झाले व दशदिशा सुप्रसन्न दिसूं लागल्या.

वर वर्णन केल्याप्रमाणें मानसपुत्र उद्भूत झालेला पाहून रेणुकाचार्य आनंदित झाले व त्या बाल गुरुमूर्तिला पुन्हपुन्हां पाहून संतुष्ट झाले.

कांचीपट्टणांतील सर्व जनांना हें वर्तमान कळतांच ते एकाम्रेश्वर मंदिरांत येऊन त्या गुरुमूर्तीचें दर्शन घेऊं लागले. राजेंद्रानें सोन्याचा पाळणा आणला. तेव्हां त्यांत आपल्या मानसपुत्राला निजवून तो पाळणा हत्तीवरील हौद्यांत ठेविला. सर्वलोक जयजयकार करून वंदन करीत असतां मोठ्या वैभवानें मिरवीत मिरवीत मंगलकालीं त्यांनीं पुरप्रवेश केला.

सर्वज्ञ रेणुकाचार्यांनी शुभ मुहूर्तावर त्या बालगुरूंचें नांव रुद्रमुनीदेव ठेवलें. ते बालगुरु दिवसेंदिवस शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढूं लागले.

शैशवावस्था संपत येतांच बालगुरूंचे नवपल्लवाप्रमाणें पाय, निष्कलंकपूर्ण चंद्राप्रमाणें मुख, प्रफुल्लित कमलाप्रमाणें नेत्र, चाफेकळ्याप्रमाणें दंत, बिंबफलाप्रमाणें ओठ, विशालभालप्रदेश, सरळनाक, विस्तीर्ण वक्षस्थल, भरीव भुजा, शंखाप्रमाणें त्रीरेषांकित मान, खोल नाभिप्रदेश व मस्तहत्तीप्रमाणें गमन पाहून कोणाला बरें आनंद वाटला नसेल? (सर्वांना वाटला असेल).

श्रीरेणुकाचार्यांच्या देहावरील सर्व छटा या बालकानें हिरावून घेतल्या कीं काय असेंच सर्वांना भासे; इतकें रूपसादृष्य त्या



श्री जगद्गुरु रुद्रमुनीश्वर शिवाचार्य भूगर्भावतार.

दोघांमध्यें होतें. लहानपणापासूनच रुद्रमुनी शिवपूजासक्त झाले, शमदमादिगुणयुक्त व शुचिर्भूत असे ते दिसत. लोकोत्तर अद्भुत अशी महाप्रातिभा त्यांच्यामध्यें चमकूं लागली इतर सर्व गुरुमूर्तींमध्यें ते सर्वश्रेष्ठ भासूं लागले.

रेणुकाचार्य त्या बालगुरूला पाहून आकर्षित झाले. बालसूर्याप्रमाणें प्रकाशमान असलेल्या रुद्रमुनीला घेऊन श्रीरेणुकाचार्य मलयपर्वताप्रत गेले. तेथें आपल्या परमपवित्र धर्मपीठावर रुद्रमुनींना त्यांच्या आठव्या वर्षीं दीक्षा देऊन आरूढ केलें.

॥ श्रीरेणुकविजयांतर्गत चतुर्थ मंजरी समाप्त ॥

॥ श्री जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ॥



श्री रेणुक विजयः

पंचम मंजरी.

ज्याच्या कृपादृष्टीचेयोगानें दरिद्री वैभवशाली बनतो, मूक-मनुष्य बोलका होतो, मूढ ज्ञानी होतो, रोगी निरोगी होतो, फारकाय जो जें जें इच्छील तें तें त्याला पुरविणारे श्रीरेणुकाचार्य,

कल्याणरूपी महादेवाच्या धनुष्याप्रमाणें दिसणाऱ्या, ब्रह्मज्ञानी, कल्याणास पात्र असलेल्या जनांना चकोरास चंद्राप्रमाणें असलेल्या, कल्याण हें ज्यांचें भूषण अशा शिवगणांना भूषणास्पद असलेल्या, कल्याणकारी, शैवविद्यापारंगत अशा रुद्रमुनीला पाहून विचार करते झाले कीं:—

अहाहा! इतक्या बालवयांतही ऋग्वेदादि वेद, वेदांगें, कामिकादि आगम व इतर शास्त्रेंही याला अध्ययन न करतांच येतात. लिंगांगतत्त्व विचार हाच याचा खेळ आहे, शिवलीलांचें

कथन करणें हीच याची करमणूक झाली आहे. तरीपण जसें दूध मूलतःच मधुर असलें तरी तें तापविल्यास अधिकच स्वादिष्ट होतें, किंवा एकादें रत्न कितीही तेजस्वी असलें तरी तें कसाला लावलें असतां अधिक तेजस्वी दिसतें, तसेच रुद्रमुनीच्या बाबतींत ही तत्त्वज्ञानकला, जन्मसिद्ध असली तरी, गुरूपदेशामुळेंच ती अधिक प्रज्वलित होईल.

वरीलप्रमाणें विचार करून रेणुकाचार्य रुद्रमुनीला म्हणाले, 'हे मानसपुत्रा, तूं इतर प्राण्यांप्रमाणें मलमायावृत पंचभूतात्मक शरीरधारी नसून, माझ्या इच्छामात्रेंकरून भूगर्भांतूनच उद्भवला असल्यामुळें तुझ्या ठिकाणीं ब्रह्मतेज अगदीं स्वाभाविक आहे. तूं शिवाचा पूर्ण अंश आहेस. म्हणून तुझा जीवात्मा नेहमीं शिवाभिमुखच असणार. हंस जसा नेहमीं पद्म वनांतच विहार करतो तसा तुझा आत्मा शिवस्तुति, शिवध्यान, शिवार्चन, शिवयोग वगैरेमध्येंच सदा रममाण होणार, त्यामुळें तुला आणखी तत्त्वोपदेश करण्याची जरुरी नाहीं. तरीपण शास्त्रविधीचें कोणीही अतिक्रमण करूं नये म्हणून तुला शिवतत्त्वोपदेश द्यावा असें मीं योजिलें आहें. तुझें हृदय शुद्ध आहे, व गुरूपदेशाचा समय हाच आहे, असें मला वाटतें. जीं वचनें तुला आतां सांगितलीं जातील तीं मनांत चांगलीं ठेव, व पात्रापात्र पाहून आनंदानें त्या वचनांचा उपदेश तूंही करीत जा.

विवेकशाली रुद्रमुनींनीं रेणुकाचार्यांचे वरील विचार ऐकून आनंद व्यक्त केला, व त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून ते म्हणाले,

'हे जगद्गुरो, आतांपर्यंत आपण जें बोलला त्यामुळें माझ्या मनांत आपल्याबद्दल प्रेमादरच उत्पन्न झाला आहे. चंद्रापुढें जशीं नक्षत्रें किंवा सूर्यापुढें जसा दीप तसा मी आपल्यापुढें आहें. खालील वस्त्रांत असलेल्या कस्तूरीचा सुगंध जसा त्यावरील वस्त्राला लागतो, तसा आपल्यामुळेंच माझ्यामध्यें गुणसंभव झालेला आहे. संस्कार-विहीन अशा माझ्यामध्यें कितीही गुण असले तरी त्यांचा काय उपयोग? गुरूपदेश सर्वांना आवश्यक आहे. दुधांत तूप असलें, तरी मंथनसंस्कार करून तें तूप वेगळें काढल्याशिवाय व्रणावर लावतां येत नाहीं, त्याचप्रमाणें माझ्या आत्म्यांत सर्वज्ञत्वादि गुण स्वाभाविकपणेंच (मूळचेच) असले, तरी गुरूपदेशाशिवाय ते प्रगट होणार नाहींत. म्हणून हे जगद्गुरो, माझ्यावर कृपा करून शिव-दीक्षेच्याद्वारां परशिवब्रह्म तत्त्वोपदेश देऊन व मला त्याचें रहस्य सांगून माझा उद्धार करा.'

रुद्रमुनि योगानंद, षडंगलिंग साहित्यज्ञान, वेदवेदांगादि विद्या व महात्मे यांमध्यें सर्वांहून श्रेष्ठ असले, तरी गुरुशिष्याच्या नात्याची मर्यादा न उल्लंघिता साहजिक विनय दाखवितात, हें पाहून महानुभाव रेवणसिद्ध संतुष्ट झाले, व शुभ मुहूर्त पाहून विधीयुक्त शिवदीक्षा देऊन त्यांना शिवतत्त्व, अष्टावरणस्वरूप, वगैरे गुरूपदेश देण्यास सुरवात केली.

'हे रुद्रमुने, ऋग्वेदादि वेदांत यजुर्वेद, त्यांत महारुद्राध्याय, त्यांतही पंचाक्षर महामंत्र जसा श्रेष्ठ आहे, तसा तेहतीस कोटी देवांमध्यें सृष्टयुत्पत्तिकर्ता चतुर्मुख ब्रह्मा श्रेष्ठ, त्याहून स्थितिकर्ता

नारायण श्रेष्ठ आहे. गुरूंमध्यें ब्रह्मज्ञानसंपन्न श्रोत्रीयच श्रेष्ठ होय. जनन-मरणास घोर अशा संसारसागरांतून भक्तवर्ग तरून जाऊन गुरूमुळेंच मोक्षसाम्राज्य उपभोगितात. म्हणूनच श्रुतीमध्यें 'न गुरोरधिकम्' 'नास्तितत्त्वं गुरोःपरम्' या वचनांनीं गुरूंचें महत्त्व विशेष गायिलेलें आहे. गुरूंपेक्षां आपणच श्रेष्ठ असा अहंकार जे धरतात, ते या भवसागरांत गोते खातात व अतिशय दुःखें भोगतात. म्हणून हा भवसागर तरून जाऊं इच्छिणारांनीं—

"तद्विज्ञानार्थं सगुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिं श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्"

या मांडुक्योपनिषदांतील वाक्याप्रमाणें—श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ गुरूं-कडे जाऊन 'यस्य देवेपराभक्तिर्यथादेवेतथागुरौ' या श्वेताश्वेततर उपनिषद्वाक्याप्रमाणें त्या गुरूंचेठिकाणीं शिवबुद्धीच ठेवावी व कृतार्थ व्हावें. शिव आपलें नीलकंठत्त्व, चंद्रशेखरत्त्व वगैरे असाधारणत्त्व गुप्त ठेवून गुरुरूपानें येऊन जीवांचा उद्धार करतो. म्हणून मुमुक्षु जनांनीं साक्षात् परब्रह्मरूपी गुरूला शरण जाऊन मुक्त व्हावें.

निगमांमध्यें गायत्री; मंत्रांमध्यें पंचाक्षरी; देवांमध्यें शंकर; शक्तिमध्यें पार्वती; पूज्य व्यक्तींमध्यें गुरु; याप्रमाणें या जगांत सर्वो-त्तम म्हणून विराजत आहेत. हे कल्याणेच्छु रुद्रमुने, हें, तूं प्रथमतः चांगलें जाण.

लिंगांग तत्त्वाचें आकलन करण्यांत धुरीण, संशयांच्या लाटांचें निरसन करण्यांत समर्थ, सिद्धान्ततंत्रप्रतिपत्तीचें बीज अशा गुरुवंश कुलोत्पन्नाला सद्गुरु समजावें.'

वरील बोध ऐकून रुद्रमुनि म्हणाले, 'हे जगद्गुरो, तुझ्या उपदेशानें मी धन्य झालों, मला गुरुमहात्म्य कळलें, आतां परमात्म-स्वरूप, त्याच्यापासून निर्माण झालेल्या सृष्टीचें स्वरूप, वेदागमोक्त अष्टावरणाचें स्वरूप, वगैरेंचा बोध मला करावा.' तेव्हां जगदाचार्य म्हणाले, "यदा तमस्तन्न दिवा न रात्रिर्नसन्न चासच्छिव एव केवलः" या वेदवचनानुसार ज्यावेळीं या विश्वांत चंद्रसूर्यादि ग्रह, दिवसरात्र, सदसत्तत्त्वें, नामरूपें वगैरे नसून सर्व तमोमय होतें, तेव्हां स्वप्रकाशी चिदचिच्छक्तियुक्त परशिव ब्रह्मच केवळ प्रकाशत होतें. नंतर या ब्रह्मांत ज्ञानशक्ति आविर्भूत झाली, 'सो कामयत बहुस्याम् प्रजायेय' या श्रुतिवाक्यानुसार चेतन अचेतन सृष्टि उत्पन्न करावी, असा संकल्प त्या परशिवब्रह्मांत झाला. नंतर 'इदं सर्वमसृजत' या वेदवचनानुसार ही सृष्टी निर्माण झाली. 'तत्सृष्ट्वातदेवानुप्राविशत्' या वेदवाक्याप्रमाणें आपण उत्पन्न केलेल्या जड व चेतन वस्तूंत सूक्ष्मरूपानें व्यापून जाऊन तें ब्रह्म विश्वाकार बनलें. सूक्ष्म वडाच्या बीजांत सूक्ष्म रूपानें वडाचें झाड असतें व तें माती व पाणी यांच्या संसर्गानें स्थूल रूपांत जसें येतें, किंवा एकाच सोन्याचे जसे अनेक अलंकार बनतात, तसेच या परशिवब्रह्मांत अविनाभावानें असलेल्या विमर्शशक्तीनें नामरूपादि नसलेलीं सदाशिवापासून पृथ्वीपर्यंतचीं सर्व तत्त्वें सूक्ष्म रूपानें असतां स्थूलरूप धारण करतात.

'तद्वेदंतर्हिअव्याकृतमासीत् । तन्नामरूपाभ्याम् व्याक्रियते ॥

चिदात्मैवहि देवोन्तः स्थितमिच्छावशाद्बहिः । योगीव निरुपादा-नमर्थजातं प्रकाशयेत् ॥ " 'यथोर्णनाभिःसृजते'

इत्यादि श्रुतिवचनें वरील अर्थ बोधकच आहेत. मयुराण्डरस न्यायानें म्हणजे मोराच्या अंड्यांत जसे मोराचे सर्व रंग गुप्तरूपानें असतात, तसे परमात्म्यामध्यें सूक्ष्म रूपानें असलेलें विश्व परशिवाच्या इच्छामात्रें करून स्थलाकार धारण करतें. कासव जसें आपल्या इच्छेप्रमाणें कधीं हातपाय बाहेर काढतें व कधीं आंतच ठेवतें तसें परब्रह्मही आपल्या इच्छामात्रें करून चराचरात्मक जगाचा कधीं विकास करतें तर कधीं संकोच करतें. सृष्टी म्हणजे नसलेला पदार्थ उत्पन्न करणें व प्रलय म्हणजे पदार्थाचा सर्वस्वी नाश, असें समजूं नये. नामस्वरूप क्रियात्मक विश्व कार्यरूपानें असत्य आहे, पर कारणरूपानें सत्य आहे. विश्वाचें सत्यत्त्व मानलें नाहीं, तर 'नाभावो विद्यतेसतः' 'सदेव सोमेयदमग्र आसीत्' इत्यादि सत्यत्त्व प्रतिपादक श्रुतिवाक्यांना विरोध येईल. केवळ परमात्मा व जीवात्मा यांचें भिन्न देशवर्तित्त्व अंगिकारिल्यास—

'द्वासुपर्णा समुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते' 'गुहां प्रविष्टौ परमेपरार्धे'

इत्यादि एकदेशवर्तित्त्व प्रतिपादक श्रुति वचनांना विरोध येईल. सर्वश्रुति वचनांचा समन्वय झाला पाहिजे म्हणून शक्ति-विशिष्टाद्वैतमतच सारभूत ठरलें आहे. विशिष्टाद्वैत म्हणजे विशेषणा-सहित विशेष्यच, असें विशिष्ट शब्द दाखवितो, या विशिष्टांचें अद्वैत म्हणजे ऐक्य. तेव्हां चित् ही चिच्छक्ति व अचित ही क्रियाशक्ति हे दोन गुण शिवाचे व चित् म्हणजे स्थूलशक्ति व अचित् म्हणजे

किंचित् क्रियाशक्ति हे गुण जीवाचे. या दोहोंनीं नेहमीं युक्त असलेलें परशिवतत्त्व व जीव विशिष्ट होऊन राहतात, परशिव ब्रह्म व जीव आणि चित् व अचित् शब्दांनीं वाच्य होणाऱ्या शिवशक्ति, या दोहोंमध्यें विशेषण व विशेष्य भाव असल्यामुळें भेदत्त्व, आणि परमात्मा व जीवात्मा यांमधील शिव व शक्ति अपृथक् असल्यामुळें अभेदत्व सिद्ध होतें. म्हणून हें शक्तिविशिष्टाद्वैतमत सर्व श्रुति वचनांचा समन्वय करणारें असून श्रुत्येकदेशीय प्रामाण्यापत्ति दोषालाही पात्र होणारें नाहीं. याप्रमाणें ब्रह्म व जीव या दोहोंमध्यें भेद व अभेद मान्य-केल्यामुळें सगुणश्रुति, निर्गुणश्रुति, भेदश्रुति अभेदश्रुति या सर्वांचा समन्वय होतो. म्हणून हे रुद्रमुने, असल्या ह्या शक्तिविशिष्ट ब्रह्माचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं अष्टावरण सांगितलेलें आहे.

जो गुरुवंशांत उत्पन्न झाला असून आठव्या वर्षीं आपल्या गोत्रगुरूंकडून ज्याला षड्ध्वदीक्षा झाली आहे, ज्यानें पंचमुद्रा धारण करून कामक्रोधादि शड्रिपूंना जिंकलें आहे, ज्यानें सर्व विश्व लिंगमय आहे हें ओळखून विश्व प्रकाशक शिवाला स्वरूपत्वानें जाणलें आहे व ज्यानें शिष्योद्धारासाठीं चरपट्टाधिकारी बनून दुष्ट दंडन व कुमत खंडन करीत संचार आरंभिला आहे, तोच चरमूर्ति होय.

चरमूर्तीची वरील लक्षणें अंगीं असून जो स्थिरपट्टाधिकारी बनला आहे व जो मठांत येणाऱ्या शिष्यांना शिवसिद्धांताचा उपदेश करतो, आलेल्या अतिथींना अन्नोदक देतो आणि जगाचें कल्याण इच्छित नेहमीं जो लिंगाराधनेंत मग्न असतो त्याला गुरुमूर्ति म्हणतात.

हा गुरु शिवाचेंच समग्र स्वरूप होय. जंगम म्हणजे शिवाचें निष्कलरूप होय. लिंग हें शिवाचें सकल निष्कल रूप होय. या गुरूजंगम लिंगांचे चरण क्रमानें विधियुक्त प्रक्षालन केलेलें (धुतलेलें) जलच पादोदक होय. गुरुलिंग जंगमाचें हें पवित्र पादोदक शंखामध्यें भरून शोडषोपचारानें त्यांचें पूजन करून जो तें भक्तीनें सेवन करतो त्याच्या हृदयांतील अज्ञानग्रंथी नाश पावून सर्व संशय नष्ट होतात. गुरुलिंग जंगमाचा अवशेषच प्रसाद होय. लिंगदीक्षा घेतलेल्या लिंगांगी मानवाचें शरीर वरील प्रसादानेंच पुष्ट व्हावें! प्राकृत अन्नोदकानें वाढवूं नये. 'रुद्रेणात्तमश्नंति,' 'तेनत्यक्तेन भुञ्जिथाः' इत्यादि श्रुतिवचनांचा हाच आशय आहे. या पादोदक व प्रसादाचें सेवन करणाऱ्याच्या हृदयक्षेत्रांत गुरूकडून पेरलें गेलेलें शिवमंत्राचें बीज अंकुरित व पुष्पित होऊन फळाला येतें, श्रुत्यागमोक्त या पादोदक प्रसादाचें सेवन करून ब्रह्मा, विष्णु, वगैरे देव स्थिरपदाला प्राप्त झाले.

हे रुद्रमुने, परशिवाची देहकांतीच भसित होय. भस्मधारण श्रौत व अश्रौत असे दोन प्रकारचे आहे. त्या त्या जातीच्या गाई क्रमानें सात्त्विक चाऱ्यावर वाढवून त्यांच्या शेणानें मंत्रपूर्वक शेणी (गोवरी) बनवून त्यांना अग्निसंस्कार देऊन मंत्रोच्चारपूर्वक त्या त्या जागीं भस्मधारण करणें हा श्रौतविधि होय. या भस्माचें महात्म्य 'अग्निरितिभस्म,' 'वायुरितिभस्म,' 'भस्मध्यानात्संधानंभवति, भस्मध्यानात्पंचाक्षरीस्मरणंभवति, भस्मध्यानात्स्थाणुत्वंगच्छति, सएषभस्मज्योतिः सएष भस्मज्योतिः' इत्यादि श्रुतिवचनें सांगत आहेत.

या भस्माचे सोपाधिक व निरुपाधिक असे आणखी दोन भाग आहेत. शिवमंत्राचा संस्कार केलेल्या अग्नींतून तयार केलेलें भस्म सोपाधिक होय, हें अणिमादि अष्टैश्वर्यें देत असल्यामुळें त्याला विभूति, शिवतत्त्वाचा प्रकाश पाडीत असल्यामुळें भसित, कायावाचामनेंकरून होणाऱ्या पापांचा नाश करतें म्हणून भस्म, अध्यात्मिक आधिभौतिक व आधिदैविक हीं तापत्रयें दूर करीत असल्यामुळें क्षार व भूतप्रेतादिकांची भीति नाहींशी करीत असल्यामुळें रक्षा, अशीं पांच अन्वर्थक नांवें आहेत. शिवाच्या सद्योजात मुखांतून उत्पन्न झालेल्या नंदीपासून विभूति, वामदेव मुखांतून उत्पन्न झालेल्या भद्रानामक गाईपासून भसित, अघोर मुखांतून उत्पन्न झालेल्या सुरभिपासून भस्म, तत्पुरुष मुखांतून उत्पन्न झालेल्या सुशील नामक गाईपासून क्षार, व ईशान मुखांतून उत्पन्न झालेल्या सुमना गाईपासून रक्षा, उत्पन्न झाली. लिंग पूजादि नित्यकर्मांत विभूति, गुरुचरपूजादि नैमित्तिक कर्मांत भसित, प्रायश्चित्तादि कर्मांतून भस्म, काम्य कर्मांमध्यें क्षार, आणि मोक्षादि कर्मांत रक्षा उपयोगांत आणावी. हें भस्म कल्प, अनुकल्प, उपकल्प, व अकल्प अशा चार प्रकारचें आहे. यांपैकीं कल्पभस्म सर्वोत्कृष्ट होय. वर लिहिलेल्या नंद्यादि धेनूंना सात्त्विक आहारावर पोसून सद्योजात मंत्रानें त्यांचे शेण घेऊन, वामदेव मंत्रानें त्याचे गोळे बनवून, तत्पुरुष मंत्रानें ते वाळवून, ते अघोर मंत्रानें शैवाग्नींत जाळून ईशान मंत्रानें तें शुद्ध झाल्यावर बिल्वपात्रांत ठेवलें म्हणजे कल्पभस्म तयार होतें. या भस्मानें जे स्नान करतील ते पापविमुक्त होतील.

तें भस्म जलमिश्रित करून विधियुक्त मंत्रोच्चारपूर्वक सर्वांगावर लावावें. या भस्मधारणेनेंच ब्रह्मादिदेव, नारदादि महर्षि व सनकादि योगी धन्य झाले.

पूर्वीं तारकाक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली हे तीन राक्षस ब्रह्मदेवानें दिलेल्या वराच्या सामर्थ्यानें आकाशांत अभेद्य अशीं तीन नगरें वसवून तेथून तिन्ही लोकांला पीडा देत होते. त्यांचा संहार करण्यासाठीं त्रैलोक्यनाथ परमेश्वरानें भूमीचाच रथ बनवून, चंद्रसूर्यांना त्यांचीं चाकें बनविलें आणि ब्रह्मदेवाला सारथी करून, मेरूचें धनुष्य आदिशेषाची दोरी, विष्णूचे बाण बनवून त्या नगरांत प्रवेश केला व त्यांचा एकाच बाणानें नाश करण्यासाठीं हजारों वर्षेंपर्यंत. पापणीही न हालवितां त्यांच्यावर नेम धरून परमेश्वर बसले असतां त्यांच्या डोळ्यांतून भूमीवर पडलेलीं टिपें रुद्राक्ष झाले.

'पुरात्रिपुरवधायोन्मिलिताक्षाहं तेभ्यो जलबिंदवः ।
भूमौपतितास्तेरुद्राक्षाजाताः ॥

या श्रुतिवचनाप्रमाणें ही वरील कथा सिद्ध होते. जे विधियुक्त हे रुद्राक्ष सतत आपल्या आंगावर धारण करतात ते पापरहित होऊन शिवानुग्रहाला पात्र होतात व त्यांना भूतप्रेत पिशाचादि बाधा होत नाहींत. रुद्राक्ष विधिपूर्वक शिखासूत्रादिस्थानीं धारण करावेत.

समस्तलोक जेथून उद्भवतात व जेथें लय पावतात तें चित् सुखाकार व अनादिसिद्ध असें लिंगच नित्य ब्रह्म होय.

जो कामक्रोधादि रिपूंना जिंकून चित् स्वरुपाचेंच नेहमीं ध्यान करतो व लोकोपकारासाठीं बराच संचार करतो तो गुरुपट्टबद्ध जंगम होय.

गुरु, लिंग, जंगम या त्रिमूर्तींच्या चरणांपासून उत्पन्न झालेलें आत्मरूप, भवरोगावर औषधिसारखें श्रीशिवभक्तिलाच गम्य असलेलें, ज्ञानामृतच पावन असें पादोदक होय.

पूर्वीं ज्याचें सेवन करून ब्रह्मादि सर्व देवांनीं दिव्यपद प्राप्त करून घेतलें तो संसारांतील संतापाच्या निवृत्तीला कारण होणारा कैवल्यमूल असा प्रसाद होय.

जें परमेश्वराच्या देहाचा अलंकार आहे, रमेशादिदेवांकडून जें धारण केलें जातें, पवित्र गोमयापासून जें बनविलें जातें तेंच सिद्धिप्रद भस्म होय. पूर्वीं युद्धकालीं शिवाच्या नेत्रांतून जे अश्रु निघाले ते धारातलावर पडले व तेथें ते उगवून रुद्राक्ष बनले. मुक्ति मिळविण्यासाठीं ते रुद्राक्ष धारण करावेत.

एकदां कालपुराला जाणाऱ्या सानंद नामक गणाधिपानें नरकवासापासून ज्या पंचाक्षरी मंत्राच्या पठणामुळें अनेकांना मुक्त केलें, ज्याच्या पठणानें विश्वामित्रादि ऋषींनीं इष्टार्थसिद्धि करून घेतली त्या पंचाक्षरी मंत्रासारखा हे रुद्रमुने, दुसरा मंत्र नाहीं.

या पंचाक्षरीनें चराचर जग शिवाधीनता प्राप्त करून घे तें, या पंचाक्षरीनेंच खुद्द शिवाचाही सर्वत्र विजय होतो. गुरुवरांच्या

आश्रयामुळें त्रिभुवनांत ती विराजते, म्हणून हे मानसपुत्रा, तिलाच सर्वोत्तम गुरु मान.

चराचरांचा स्वामी शिव, त्याचें लिंग हस्तगत करून त्याचें पूजन करून व त्याचा प्रसाद मिळवून जो शिवभक्तांत स्थान प्राप्त करून घेतो आणि हृदयांत नेहमीं जो सर्वत्र शिवतत्त्वच ध्यात असतो तोच या जगांत वीरशैवमतज्ञ होईल दुसरा कोणीही होणार नाहीं.

करतलगत लिंगाची पूजा करून जो तें देहावर धारण करतो तोच मनुष्य जगांत लिंगी होय. त्या लिंगाचें ध्यान हृदयांत करणारा प्राणलिंगी व जो शिवमयच बनतो तो भावलिंगी होईल.

संसाराचा त्याग करूं इच्छिणारा मनुष्य या जगांत इष्टलिंग पूजक होईल! शिवाच्या सर्व भोगोपभोगांचीच अभिलाषा धरणारा प्राणलिंगपूजक होईल, नेहमीं कैवल्याची इच्छा करणारा व विषयांचा त्याग केलेला भावलिंगपूजक होईल व या तिन्हींच्या पूजेमध्यें जो रत (मग्न) असेल तो सर्वोत्तम होईल.

मुमुक्षूनें सातकोटी मंत्रांमध्यें श्रेष्ठ असलेल्या शिवपंचाक्षरी महामंत्राचा जप करावा. हा मंत्र-गूढ असे शिवतत्त्व सांगत असल्या-मुळें—सर्वोत्तम ठरला आहे. मंत्रजप वाचिक, उपांशु व मानसिक असा तीन प्रकारचा आहे. जवळ असलेल्या लोकांना साधारण ऐकूं जाईल असा मंत्रोच्चार करणें हा वाचिक प्रकार होय, नुसता ओठांतल्या ओठांत मंत्र पुटपुटणें म्हणजे उपांशु प्रकार होय. आणि ओठही न हालवितां मनांतल्या मनांत जप करणें हा मानसिक

प्रकार होय. या तीन प्रकारच्या मंत्रोच्चारांत मानसिकच श्रेष्ठ होय. या मंत्रजपामुळें ब्रह्महत्यादि महापातकेंही दूर होतात या मंत्राचे 'नमः स्वाः वशट्हुं औशट् फट् हे सहा पल्लव चरण होत, व प्रणव शिर होय. म्हणून चरण व शिर आणि त्याचप्रमाणें ऋषि, देवता, छंदस्, बीज, शक्ति व कीलकादि मंत्रानेंही उच्चारावींत. त्याशिवाय जप करणें दोषकारक होय. न्यासाशिवाय जपलेला मंत्र मूक, आसनादि नसलेला मंत्र गुप्त, पल्लव नसलेला नग्न, प्रणवविरहित मंत्र मृत, गुरूपदेशविरहित मंत्र, व्यर्थ, ऋषि, देवता, छंद वगैरे नसलेला मंत्र भुजंगम विधि सोडून अधिक शद्ब घुसडलेला मंत्र वीर्यहीन म्हटला जातो शिवसंस्कार संपन्न पुरुषानें शुद्धस्थळीं घोंगडी वगैरे आसनावर सिद्धासन किंवा पद्मासन घालून पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसून, आचमन प्राणायामादि आटोपून, भस्म व रुद्राक्ष धारण करून, क्रमपूर्वक इष्टलिंगाची पूजा करीत शिवध्यानांत रत होऊन पंचाक्षरी मंत्राचा जप करावा. ध्यानसहित केलेला जप सगर्भ म्हटला जातो' व ध्यानरहित जप अगर्भ म्हटला जातो. अगर्भ-जपापेक्षां सगर्भ जप अधिक फलदाई होय. पंचाक्षरी महामंत्र शास्त्रोक्त रीतीनें जपल्यास धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारी पुरुषार्थ साधतात, आयुर्वर्धन होतें, ब्रह्महत्यादि महापापें नाश पावतात. प्राचीनकाळीं सानंद मुनींनीं यमलोकांत असह्य पीडा सहन करीत असलेल्या जीवांना पंचाक्षरी मंत्राच्या जपानें नरकवासांतून उद्धरलें. वशिष्ट, वामदेवादि मुनींनीं या मंत्राच्या जपानेंच महातपस्वी व शापानुग्रह समर्थ असा लौकिक मिळविला. फार काय सांगावें जो कोणी

शिवसंस्कार संपन्न होऊन गुरुप्रणित क्रमाचा थोडाही भंग न होऊं देतां इष्टलिंग पूजन करतांना पंचाक्षरी मंत्राचा जप करील त्यास सर्व सिद्धि प्राप्त होतात, त्याला मोक्षलक्ष्मी वरील, चराचर विश्व शिवाचे आधीन आहे. पण प्रत्यक्ष शिव पंचाक्षरीमंत्राच्या आधीन आहे, हा मंत्र गुरूच्या आधीन आहे. म्हणून गुरूकडूनच या मंत्राचा उपदेश करून घ्यावा. या मंत्राचे प्रसादपंचाक्षरी, मायापंचाक्षरी, सूक्ष्मपंचाक्षरी, स्थूलपंचाक्षरी व मूलपंचाक्षरी असे पांच प्रकार आहेत. हे प्रकार वीर, नंदी, भृंगी, वृषभ व स्कंद या पांच गोत्रांच्या भक्तांना गुरूनें अनुक्रमानें उपदेशावेत. मुमुक्षूनें अष्टावरण संपदा प्राप्त करून घेण्यापूर्वी आपल्या गोत्राच्या गुरूकडून उपनयनपूर्वक शिवदीक्षा घेऊन अनादिकालापासून आपल्या तनुत्रयांच्या आश्रयास असलेल्या मलत्रयांना दीक्षात्रयानें दूर करावें व मग स्थूल देहावर पंचसूत्र घटित व शिवकला नियोजित इष्टलिंग, सूक्ष्म शरिरावर प्राणलिंग व कारण शरिरावर भावलिंग धारण करावें. गुरूनें दिलेल्या इष्टलिंगाचें पूजन यथाविधि त्रिकाल करीत, गुरूलिंग जंगमांचा तीर्थप्रसाद नित्य सेवन करीत प्रापंचिक व्यवहार सोडून जो ज्योतिरूप महालिंगांत मन गुंतवून ठेवतो तोच वीरशैव म्हटला जातो. स्थूल देहावरील इष्टलिंगाराधना जनन मरणरूपी पाश छेदून शिवाभिरति उत्पन्न करते. अशी इष्टलिंग पूजा करणारा सूक्ष्मदेहावरील प्राणलिंगपूजा करील तर लौकिक शब्दादि विषय शिवार्पण करून शेष प्रसाद घेतल्यासारखें त्याला होईल. या दोन्ही पूजा करून जो कारण शरिरावरील भावलिंगाची पूजा करील, त्याच्या सर्व विषयेच्छा नष्ट होऊन त्याला

अविरल शिवानंद प्राप्त होईल. या त्रिविध पूजेमध्यें इष्टलिंगाराधना व्याप्य असेल तर प्राणलिंगाराधना व्यापक होईल. व प्राणलिंगाराधना व्याप्य असेल तर भावलिंगाराधना व्यापक होईल. ही तीन लिंगें क्रमानें तीन शरिरावर धारण करून जो त्यांची उपासना करतो त्याला शिवयोगी म्हणतात.

हा सर्वोत्तम शिवयोगी सर्व व्यापक ज्योतिर्लिंगाची पूजा क्षांतिरूपी शुद्धोदकाच्या स्नानानें, विवेकरूपी वस्त्रानें, सत्योक्तिरूपी अलंकारांनीं, वैराग्यरूपी पुष्पांनी, स्थिरचित्तरूपी गंधांनीं दांतिरूपी अक्षतांनीं, विश्वासरूपी धूपानें प्रज्ञानरूपी निरंजनानें, मनोदार्ढ्यरूपी पक्वान्नांनीं आणि नमस्काराच्या तांबुलानेंच करील.

नंतर शिवानंदघनरूपी प्रसादानें तृप्त होऊन हृदयचंद्राला ग्रासलेल्या अविद्यारूपी राहूपासून मुक्त होऊन शिवाद्वैत ज्ञानरूपी चांदण्यांत सतत ज्योतिर्लिंगाराधना तो करीत राहील. असा शिवयोगी

‘नान्यत्पश्यतियोगींद्रः नान्यज्जानाति किंचन ।
नान्यच्छ्रुणोति संदष्टे चिदानंदमयेशिवे ॥’

यावचनानुसार सर्व विश्व शिवमयच पाहतो. हे रुद्रमुने, पंचकृत्याधिपति, परशिव ब्रह्म, महालिंगच ज्ञेय होय. या लिंगस्वरूप, जिज्ञासू, अंगरूप जीवानेंच ज्ञाता बनून क्रमानें लिंगांगसामरस्य प्राप्त करून ज्ञानी बनावें. जो जीव आपल्या अनेक जन्मांतील पुण्यकर्मांच्या बलानें गुरूकृपेला प्राप्त होतो त्यालाच ही गुह्यलिंगांग-सामरस्य सिद्धि होते.

त्याच्यासमान या त्रिभुवनांत कोणीच नाहीं, शिव व जीव म्हणजे लिंग व अंग यांचें सामरस्य जाणून व तें प्राप्त करून घेऊन, अनित्य (नाश पावणारे) असें प्रापंचिक भोग तृणासमान मानून जीवनमुक्तावस्था अनुभवीत असलेला शिवयोगी, कमलपत्रावर पडलेल्या जलबिंदूप्रमाणें देहधारी असूनही निर्लिप्त असतो आणि देहाच्या अंतिमवियोगाच्या वेळीं पाण्यांत पाणी व दुधांत दूध मिसळावें त्याप्रमाणें शिवांशीभूत असलेला तो, महालिंगांत समरस होऊन जातो.

स्वदेह गुरूला, आपलें वैभव चरमूर्तीला व मन लिंगाला अर्पण करून मोह, आकांक्षा सोडून जे निरिच्छपणें शिवाचारांमध्यें रत असतात व जे अक्रोधि निर्मत्सरी मदरहित व सुखदु:खादि द्वंद्वांपासून आपलें मन अलिप्त ठेवून शिवपूजन करतात तेच लिंगांगसंबंधी होत.

परशिव महातत्त्वविज्ञान असें लिंग व अंग ज्ञेय होय. अंगलिंगानुबंधी व ज्ञानी जो असेल तोच या जगांत ज्ञाता होय, ज्याला अंगलिंगानुबंध झाला तोच या जगांत पुण्यवान् समजावा, सद्गुरूंच्या त्या उपासकाला सर्व कांहीं सुलभ आहे.

जळलेलें बीं जसें भूमींत पेरलें तरी उगवत नाहीं तसेंच लिंगांगीजन पुनर्जन्म धारण करीत नाहींत. हे रुद्रमुने, वर सांगितलेले सर्व तत्त्वज्ञान तूं ध्यानांत ठेव आणि विषयोपभोगाचे पाशांत कधींही बद्ध होऊं नकोस. कोकिळा जशी स्वाभाविकपणेंच रागालाप जाणते किंवा मासा जसा जन्मापासूनच पोहण्याची कला जाणतो,

तसा तूं जन्मापासूनच शिवतत्त्व जाणीत आहेस. पण गुरुशिष्याच्या नात्यानें मीं तुला तें पुन्हां संक्षेपानें सांगितलें आहे.

वेदशास्त्रादि सर्व विद्या शंभूपासूनच संभवलेल्या आहेत व त्या सर्वांमध्यें शैवसिद्धांत श्रेष्ठत्व पावलेला आहे. म्हणून तूं चोहोंकडे त्याचा प्रचार करीत पृथ्वीवरील सर्व वीरमाहेश्वरांना तो सांगून सर्वांच्या हृदयांत शिवभक्तीचें बीज पेरून त्यांना मुक्तिमार्ग दाखव.

तेव्हां रुद्रमुनी म्हणाले, 'हे गुरुवर्या' आपल्या कृपाप्रसादानें मी कृतकृत्य झालों आहें. सर्व मोहपाश नाहींसे होऊन शिवतत्त्व मला चांगलें कळलें आहे, असें म्हणत त्यांनीं रेणुकाचार्यांच्या चरणांवर अतिशय भक्तीनें अनेक साष्टांग नमस्कार घातले.

इकडे श्रीरेणुकगणाधीश्वरांनीं विचार केला कीं, आपणाला या भूमंडलावर अवतरून चौदाशें वर्षें झालीं आपण स्थापन केलेल्या वीरशैव मताच्या साम्राज्याचें आधिपत्य चालविण्यास रुद्रमुनी आतां सर्व दृष्टीनें समर्थ झालेले आहेत, हे असाधारण महिमाशाली आहेत. समाजाचें शिक्षण व रक्षण करण्यास समर्थ आहेत, जगद्गुरूचे पट्टाधिकार धारण करण्यास ते लायक दिसतात, म्हणून त्यांना पट्टाभिषेक करणेस आतां हरकत नाहीं. असा विचार करून त्यांनीं मुहूर्त शोधून काढला, सर्व साहित्य गोळा केलें आणि विश्वाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य व पंडिताराध्य या पंचाचार्यांना, तसेंच पांड्य, चोळ, केरळ, उज्जयिनी नेपाळ वगैरे अनेक देशांच्या राजांना आमंत्रण देऊन पट्टाभिषेक समारंभ श्रीरेणुकाचार्यांनीं केला.

सभांगणाच्या मध्यभागीं रत्नमय सिंहासन ठेवलें होतें. त्याच्या अग्रभागीं यथोचित पोषाख करून राजेरजवाडे बसले होते. त्यांच्यामागें सामंतगण भक्तियुक्त अंतःकरणानें हात जोडून बसला होता. त्यांच्यामागें ठिकठिकाणचे पुढारी वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध प्रेक्षक बसले होते लोकविख्यात् शैवमहर्षि आपल्या शिष्यगणांसह वेदमंत्र म्हणत सिंहासनाच्या डाव्या बाजूस बसले होते. मलयपर्वतावरील बहात्तर हजार तपस्वीजन सिंहासनाच्या मागें बसले होते व उत्कट भक्तीनें ते गुरुसंकीर्तन करीत होते. भाट व बंदीगण अनेक वृत्तांमध्यें जगद्गुरूंचे पोवाडे गात होते, वेषधारी भालदार, चोपदार केव्हां नेत्रकटाक्षानेंच तर केव्हां दंडानेंही सभाजनांचा गोंगाट थांबवीत होते, आकाशशब्द गुणशाली आहे, ही गोष्ट चौघडा, भेरी वगैरे वाद्यांच्या निनादानें सिद्ध होत होती. अनेक देशांहून आलेले वीणापटु, मृदंगवाले, गायक, स्तोत्र-पाठक वगैरे कलावंत आपापलें कौशल्य अतिशय उल्हासानें दाखवीत होते. इतक्यांत श्रीरेणुकगणाधीश्वर रुद्रमुनींना हातीं धरून सभास्थानीं आले. तेव्हां सर्वत्र टाळ्यांचा कडकडाट झाला. व चोहोंकडून 'रुद्रमुनी शिवाचार्य जगद्गुरूकी जय' हा जयध्वनी ऐकूं आला सैनिकांची व वाद्यांची सलामी झडली. आणि सर्व सभाजनांचें वंदन घेत रुद्रमुनी वीरसिंहासनावर विराजमान् झाले.

तेव्हां श्रीरेणुकगणाधीश्वर म्हणाले ' अखिलतत्त्ववेत्त्या रुद्रमुने, आचार्यपट्टाधिपते, महात्मन्, आमच्या वीरशैवमताच्या आचारविचारांच्या निर्णयाचा अधिकार आजपासून तूं धारण कर.' असें म्हणून त्यांनीं रुद्रमुनीचे मस्तकावर रत्नखचित सुवर्णकिरीट ठेवलें.

दोन्ही बाजूंस उभे असलेल्या चार आचार्यांनीं आशीर्वाद दिले. राजेरजवाड्यांनीं रत्नाभरण, पीतांबरादि मौल्यवान् वस्तु जगद्गुरूंना भेट म्हणून दिल्या. प्रत्यक्ष परमेश्वराचा दुसरा अवतारच कीं काय, असे जगद्गुरु रुद्रमुनी सर्वांना भासत होते. रथ, घोडे, हत्ती, नोकर-चाकर, पालखी, छत्र चामरें, झोंपाळा, तऱ्हेतऱ्हेचीं वाद्यें, पंखा नंदीध्वज, पंचकलश वगैरेचेंही कोणींकोणीं दान केलें. महर्षि वगैरेनीं स्तोत्रपाठांनींच जगद्गुरूंचें स्वागत केलें. इतर प्रेक्षकांनींही यथाशक्ति गुरुदाक्षिणा दिली. नंतर सर्वांनीं साष्टांग नमस्कार करून व पंचाचार्यांचे आशीर्वाद घेऊन सभामंडप सोडला.

सर्व बिरुदावळींनीं, अलंकारांनीं व वस्त्रांनीं विभूषित अशा जगद्गुरु रुद्रमुनींनीं सर्वांचा यथोचित सत्कार करून त्यांना निरोप दिला. चारी आचार्यांचा अतिशय प्रेमानें सत्कार करून मोठ्या समारंभानें त्यांना निरोप देण्यांत आला.

याप्रमाणें मोठ्या वैभवानें पट्टाधिकार समारंभ पार पाडल्यानंतर कांहीं दिवसांनीं श्रीरेणुकगणाधीश्वर, नूतन जगद्गुरूंना पालखींत बसवून व आपण हत्तीचे अंबारींत बसून देश संचाराला चालले. कारण त्यामुळेंच रुद्रमुनींना सर्व प्रकारचे अनुभव येतील, असें त्यांनीं चोळ नृपतीला सांगितलें.

मानसपुत्रासह श्रीरेणुकगणाधीश्वर देशाटन करीत करीत भुजगारण्य नामक शहरांत आले. तेथें भक्तांकडून सत्कार व काणिका घेत कांहीं दिवस राहिले असतां जवळच्या जंगलांत असलेल्या शिवालयाकडे शिवदर्शनासाठीं ते गेले.

तेथें गेल्यावर कल्लिनाथ नामक एक भक्त संसाराचा त्याग करून शिवध्यान करीत बसलेला त्यांना दिसला. त्या दोघांना पाहून प्रत्यक्ष परमेश्वरच कुमारासह आपल्याला दर्शन देण्याला आला कीं काय असेंच त्या भक्त कल्लिनाथाला वाटलें. नंतर शिवलिंगापुढून उठून त्यानें त्या दोघांपुढें साष्टांग नमस्कार घातला व गद्गद स्वरानें म्हणाला:—

'हे पूज्य पुरुषहो, पूर्वीं या शहरांत एक नाग फणा काढून फिरत असतां एकाएकीं जागच्या जागींच मरून पडला. तो प्रकार पाहून माझें मन उदास बनलें. मला तहान, भूक, निद्रा कांहीं सुचेना. तेहां मी या परमेश्वराला अनन्यभावें शरण गेलों व त्या नागाला जिवंत करण्याची प्रार्थना केली. परम दयानिधी शंकराच्या प्रसादानें तो सर्प पुन्हा जिवंत झाला. तेव्हांपासून या शहराला भुजगारण्य हें नामाभिधान प्रात झालें.'

कल्लिनाथाच्या मुखांतून वरील अद्भुत गोष्ट ऐकून श्रीरेणुक-गणाधीश्वर व जगद्गुरु रुद्रमुनी यांना आनंद झाला. या दोघांच्या दर्शनानें कल्लिनाथाचा भक्तिभावसुद्धां वाढला. वरील दोघांना ओळखून तो म्हणाला, 'हे जगद्गुरो, मी या शिवालयांत परशिवाचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें म्हणून योग साधन करीत व लिंगाला अभिषेक करून शिवाचें पूजन करीत कधीं फलाहारावर तर कधीं पर्णाहारावर, कधीं जलपानावर तर कधीं नुसता वायु भक्षण करून रहात आहें. या प्रमाणें उग्र तपश्चर्या मी करीत असतां चतुर्भुज, त्रिलोचन, चंद्रमौळी,

त्रिशूलधारी, नित्य, शाश्वत, उमाधन असे पराशिव आकाशवाणीनें मला म्हणाले, 'कल्लिनाथा, तुझ्या भक्तीनें मी संतुष्ट झालों आहें, मानवांचा उद्धार करण्यासाठीं माझ्या आज्ञेनेंच भूलोकावर अवतरणारे श्रीरेणुकगणाधीश्वर तुझ्याकडे येऊन तुझ्या इच्छेप्रमाणें तुला तत्त्वोपदेश करतील. तेव्हांपासून कठोर तपश्चर्येचें फळ मिळालें, असें मानून मी उत्सुकतेनें आपली वाट पहात राहिलों आहें. आपली ही दिव्यकृति, तेजप्रभाव, अमृतोक्ति, आकस्मिक आगमन वगैरेवरून आपणच जगद्गुरु रेणुकगणाधीश्वर आहांत असें मीं ओळखलें. चंद्राच्या आगमनाची वाट पाहणाऱ्या चकोराप्रमाणें मी फार दिवसांपासून आपली वाट पहात आहें, सर्वसाक्षी परमेश्वराच्या प्रेरणेनेंच आपण आला आहांत, आपण आला नसतां तर मी या शिवलिंगासमोरच देहत्याग करणार होतों. पण माझी तपश्चर्या फळाला आली. या निर्जन प्रदेशांत मी आपल्या ध्यानामृतानेंच देहधारणा करून राहिलों आहे.

म्हणून आतां हे प्रपन्नार्तिहरा, विश्वेशस्वरूपा, भवरोग वैद्या, जगद्गुरो, भवबंधनाच्या दुःखाग्नीनें भाजत असलेल्या माझ्यावर करुणाकटाक्ष टाकून आपण मला शिवतत्त्वोपदेश द्या व माझा उद्धार करा.' वगैरे तऱ्हेनें कल्लिनाथानें त्यांची विनवणी केली. तेव्हां रेणुकगणाधीश्वर म्हणाले, 'हे शिवभक्त शिखामणी, तुझी भक्ति पाहून मी संतुष्ट झालों आहें, मागील अनेक जन्मांत ज्यानें पुण्य केलें असेल त्यालाच शिवभक्ति करावी असें वाटतें. तुझी भूतदयासुद्धां शिवभक्तीप्रमाणेंच असामान्य आहे, कारण क्रूर सापाबद्दलही तूं इतकी दया दाखविलीस,

मग दीन प्राणीमात्रांबद्दल तूं कितीतरी दया दाखविशील! तुझी भक्ति, सात्त्विकभाव, वैराग्य व दयाळूवृत्ति पाहून परमेश्वर नेहमीं तुझ्या हृदयांतच राहील. तुझ्यासारख्या भक्तावर कृपा केल्यामुळेंच परमेश्वराला अव्याज करुणामूर्ति हें नामाभिधान प्राप्त झालें आहे. म्हणून हे कल्लिनाथा, जगांतील लोक मोहग्रस्त होऊन विषय लोलुपपणानें बरींवाईट कर्मे करीत या भवचक्रांत फिरत दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगांप्रमाणें दुःखाग्नीनें भाजत असतात. पाण्यांतील भोंवऱ्यांत गोते खात फिरत असलेल्या जीवांना दयाळू वाटसरूनें भोंवऱ्यांतून काढून तीरावर सोडावें त्याप्रमाणें अत्यंत दुःखदायक अशा संसार सागरांतील भोंवऱ्यांतून अनेक जन्म भटकत असलेल्या जीवांना सद्गुरूच सोडविणार. गुरु म्हणजे परशिवाची सकलमूर्तिच होय. म्हणून गुरूकडून तत्त्वोपदेश ऐकावा अशी जी तुला अभिलाषा झाली आहे, ती स्तुत्य होय. हे कल्लिनाथा, तूं संसार सागरांत पडला असलास तरी सुविचाराच्या नौकेचा आश्रय करून आणि दृढतर वैराग्य धारण करून रानावनांत शिवलिंगाराधना करीत तूं गुरूंची वाट पाहात बसलास, हें पाहून मला फार संतोष वाटला. मीच तो रेणुकगणाधीश्वर, तुझी अभिलाषा पूर्ण करण्यासाठींच मी एथें आलों आहें.' नंतर शुभ मुहूर्त पाहून रेणुकगणाधीश्वरांनीं जगद्गुरु रुद्रमुनीशिवाचार्यांकडून कल्लिनाथाला त्रिविध दीक्षा दिली. मलत्रयांचें निवारण केलें, त्रिविध लिंगधारणा करून महामंत्रोपदेश देवविला.

नंतर कल्लिनाथाच्या विनंतीवरून रेणुकगणाधीश्वरांनीं त्याला पिंडांड स्वरूप सांगण्यास आरंभ केला. ते म्हणाले, 'हे महाभाग,

दोषशून्य, निरुपाधिक, नाशरहित, अप्राकृत गुणाधार, अनंत महिमाकर, अद्वितिय, सनातन, अनिर्देष्य, सर्वज्ञ, नित्यतृप्त, सच्चिदानंदस्वरूप व स्वतंत्र अशा परशिवामध्यें चंद्रांतील चांदणें पुष्पांतील परिमल [वास,] अग्नींतील उष्णता, वगैरे प्रमाणेंच विमर्षशक्ति अविनाभाव संबंधानें असते, त्या विमर्षशक्तींत हें चराचर जग नामरूप क्रियेशिवाय सूक्ष्मरूपानें असतां कोणे एकेवेळीं निर्विकार परशिवाला जग निर्माण करावें असें वाटलें. तेव्हां पातळ तूप जसें घट्ट होतें व आकार धारण करतें तसें निराकार परशिवानें कोणतेंतरी एकरूप धारण केलें. त्या रूपावरून चंद्रधर, गंगाधर, नीलकंठ वगैरे अनेक नांवें पडलीं. प्रथम ब्रह्मदेवाला मानसिक शक्तीनेंच उत्पन्न करून त्याला परशिवानें आपल्या निश्वसितासारखे असलेले चार वेद, स्पष्टोच्चाराप्रमाणें असलेले आगम व इतर सर्व शास्त्रें यांचा उपदेश केला व म्हटलें, 'हे ब्रह्मदेवा तूं चतुर्दशभुवनें व त्यांत राहण्यास पात्र असलेले प्राणी निर्माण करून सृष्टयुत्पत्ति सुरू केली असतां, उपाय न कळल्यामुळें गोंधळला व म्हणाला, 'मला उत्पन्न करून चतुर्दशभुवनें निर्माण करणाऱ्या परमेश्वरा, सृष्टयुत्पत्तीची सामुग्री दे व ती कशी करावयाची तेंही दाखव.' तेव्हां परशिवानें अप्राकृत लीलावैभवानें आपल्याप्रमाणेंच सर्व कर्ते, सर्वज्ञ, अप्राकृत व दिव्यदेहधारी असे पंचाचार्य, नंदी वगैरे प्रमथगण आणि असंख्यात् रुद्र निर्माण केले. सृष्टयुत्पत्तीची ती रीति पाहून ब्रह्मदेव संतुष्ट झाला व परशिवानें अनुग्रह केलेल्या पंचाक्षर महामंत्राच्या सामर्थ्यानें पृथ्वी वगैरे पंच महाभूतें व अंडज, पिंडज, स्वेदज, उद्भिज्ज असे चतुर्विध प्राणी त्यानें

उत्पन्न केले, यालाच ब्रह्मांड म्हणतात. पृथ्वी, आप्, तेज, वायु व आकाश यांना पंचमहाभूतें म्हणतात. या पंचीकृत पांच महाभूतांत समाविष्ट असलेल्या ज्ञानशक्तीमुळेंच क्रमानें श्रोतृ, त्वक्, नेत्र, जिव्हा व घ्राण अशीं पांच ज्ञानेंद्रियें उत्पन्न झालीं. हीं पंचमहाभूतें व ज्ञानशक्तीचे सर्व अंश मिळून अंतःकरण म्हटलें गेलें. हेंच अंतःकरण वृत्तिभेदाप्रमाणें मन, बुद्धि, अहंकार व चित्त मानलें जातें. हें अंतःकरण, पंचभूतें व ज्ञानांश यांचें समष्टिरूप असल्यामुळें श्रोतृ वगैरे पंच ज्ञानेंद्रियांकडून घेतल्या जाणाऱ्या सर्व पदार्थांमधील गुणदोष जाणण्याचें सामर्थ्य त्याला आहे. याच पंचमहाभूतांतील क्रियाशक्तीच्या परिणामरूप रजोगुणानें अनुक्रमें वाक्, पाणि, पाद, वायु व उपस्थ हीं पंचकर्मेंद्रियें उत्पन्न झालीं. त्याचप्रमाणें या पंचमहाभूतांतील रजोगुणाच्या समष्टीनें प्राण उत्पन्न झाला. हा प्राण वृत्तिभेदानुसार प्राण, अपान, समान, उदान आणि व्यान असा पांच तऱ्हेचा आहे. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, मन व बुद्धि मिळून हीं सतरा तत्वें एकवटून सूक्ष्मशरीर बनलें. या पंचीकृत पांच महाभूतांतील क्रियाशक्तीच्या परिणामरूप तमोगुणानें पंचीकृत स्थूल शरीर उत्पन्न झालें यामध्यें ज्ञातृ, मन, बुध्दि, चित्त व अहंकार हें आकाशपंचीकरण होय; प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे वायु-पंचीकरण होय; श्रोतृ, त्वक्, नेत्र, जिव्हा व घ्राण हें अग्निपंचीकरण होय; शद्ब, स्पर्श, रस गंध, रूप हें आप्-पंचीकरण होय आणि वाक् पाणि, पाद, वायु, व उपस्थ हें पृथ्वीपंचीकरण होय. याप्रमाणें देहोत्पत्तीला साधनभूत असलेल्या पंचमहाभूतांमध्यें पृथ्वीच सर्व भूतांना आधार

असल्यामुळें तिला उपादानकारण म्हणतात व इतर पंचमहाभूतांना निमित्तकारण म्हणतात. पंचवीस तत्त्वांच्या बनलेल्या भौतिक स्थूल शरिरांत अंसलेलें मांस, रोम, अस्थि, चर्म वैगेरे पृथ्वीचे अंश होत. रक्त, मूत्र, मज्जा, घर्म वैगेरे जलांश होत; जांभई, जाड्य, निद्रा वैगेरे अग्नीचे अंश होत. कफ वैगेरे वायूचे अंश होत आणि राग, अहंकार, लोभादि हे आकाशाचे अंश होत. याप्रमाणें पंचमहाभूतांच्या मिश्रणानें बनलेला हा देह म्हणजे पिंड होय. शरिरें हीं जरायुज, अंडज, स्वेदज, उद्भिज्ज व मानस अशीं पांच प्रकारचीं असतात. यांपैकीं नारदादि देवर्षींचें शरीर मानस होय, गर्भाभोंवतीं असलेलें आवरण फोडून उत्पन्न होणारें मनुष्य व पशु वैगेरेंचीं शरिरें जरायुज होत; अंडीं फोडून बाहेर पडणारीं शरिरें अंडज होत, घामापासून उत्पन्न होणाऱ्या उवा वैगेरे प्राण्यांचीं शरिरें स्वेदज होत. आणि जमीन फोडून बीजांतून उत्पन्न होणारीं शरिरें उद्भिज्ज होत. या चार प्रकारच्या प्राण्यांत जरायुज प्राणीच श्रेष्ठ होत. प्राण्यांना आपापल्या कर्मानुसार देह प्राप्त होतो. पुण्य अधिक असेल तर देव-शरीर, पाप अधिक असेल तर पशूंचें शरीर व पुण्य आणि पाप समान असेल तर मानव देह प्राप्त होतो. जरायुज शरिराच्या प्राण्यांतील स्त्रीगर्भकोशांत शुक्र आणि शोणित यांचें मिश्रण झालें कीं त्याचें एका रात्रींत कलील, पांच दिवसांत बुद्बुद व पंधरा दिवसांत पिंड होतो. पुढें एका महिन्यांत तो घट्ट होऊन दुसऱ्या महिन्यांत मस्तक, तिसऱ्यांत पाय, सहाव्यांत डोकें, कान, तोंड वैगेरे चिन्हें दिसतात आणि सातव्या महिन्यांत प्राण उत्पन्न होऊन आठव्यांत गर्भदीक्षा होते. नवव्यांत

सर्व लक्षणसंपन्न होऊन पुष्कळ त्रास सहन करीत व पूर्वकर्मे स्मरत सद्गुरूला शरण जाऊन त्याच्यापासून शिवज्ञानप्राप्ती करून घेऊन मी भवसागर तरून जाईन असा विचार करीत दहाव्या महिन्यांत तो जन्मतो. बालावस्थेच्या अज्ञानदशेंत मातापित्यांकडून पोषला जाऊन, योग्यकाळीं गुरूकडून संस्कार करून घेऊन, वेदशास्त्रादि शिकून व सत्पात्र बनून अंग व लिंगस्वरूप तो जाणून घेईल आणि शिवयोगांत रममाण होईल, तरच तो मुक्त होईल. याला चरम शरीरी म्हणतात व तो पुनः पुन्हां जन्म धारण करीत नाहीं. हे कल्लिनाथा, तुझी शिवभक्ति व आस्तिक्यभाव पाहून मी संतुष्ट झालों आहें, आतां मी तुला शिवयोगाचा मार्ग सांगतों. ऐकः—

जीवसहित या शरिरांत आधार, स्वाधिष्ठान, मणिपूरक, अनाहत, विशुद्धि व अज्ञेय अशीं चार चक्रें आहेत, आधार चक्रांत असलेला अपानवायु योगबलानें रोधून वर चढवितांना स्वाधिष्ठानांत असलेला वायु खालीं उतरवीत असतां दोघांचें संघर्षण होऊन अग्निज्वाला निर्माण होते. आधोमुखी होऊन प्रापंचिकसुखोपभोग घेत असलेल्या सुषुम्नानाडीचे मध्यभागीं असलेली कुंडलिनीशक्ति ऊर्ध्वमुखी होऊन हंसरूपी परमात्मानंदामृत स्रवूं लागते. तेव्हां जीव शिवोहं या भावनेनें भरून जाऊन मायापाशामुळें उत्पन्न झालेल्या किंचित्त्वादि-भावना सोडून देऊन

सर्व कर्ताच योगींद्रः स्वतंत्रोऽनंत रूपवान् ।
जीवन्मुक्तो महायोगी जायते नात्र संशयः ॥

या उपनिषद्वाक्यानुसार सर्वकर्ता स्वतंत्र, अनंतरूपी व जीवन्मुक्त असाच तो होतो. म्हणून हे कल्लिनाथा, ज्योतिर्लिंगात जो पुरुष तल्लीन होतो त्याच्या सर्व हृदयग्रंथी तुटून तो ज्योतिर्लिंग स्वरूपीच बनतो. असला अति सूक्ष्म शिवयोग साधावयाचा असेल तर त्याला शिवदीक्षा हेंच मूळ कारण होय. म्हणूनच तुला प्रथम शिवदीक्षा दिली. आतां तुला लिंगांगयोग करतलामलवत् दिसेल. सूविधीनें तीन दिक्षा जेव्हां घेतल्या जातील तेव्हांच मनुजाला वर सांगितलेली योगसिद्धी प्राप्त होते.'

याप्रमाणें कल्लिनाथाला उपदेश करून देशिकेंद्र रेणुकगणाधीश्वर जगद्गुरु रुद्रमुनीशिवाचार्यासमवेत् श्रीशैलपर्वताला निघून गेले.

तप्तसुवर्णाच्या उपाधींत प्रकाशत असलेल्या राजहंसांनीं प्रवाळाप्रमाणें शोभत असलेल्या पोपटांनीं, चांदीप्रमाणें चकाकत असलेल्या कोकिलांनीं, एका जंगलांतून दुसऱ्या जंगलांत नासधूस करीत जाणाऱ्या मत्त हत्तींनीं, दरीखोऱ्यांतील गुहेंतून गुरगुरत असलेल्या सिंह—वाघांनीं, बागडणाऱ्या हरिणांनीं व सोनेरी केस, असलेल्या अस्वलांनीं मलयपर्वत शोभत होता.

रेणुकाचार्यांनीं त्या पवित्र शैलपर्वतावर जाऊन म्हटलें, 'हे रुद्रमुने, एथें व्याघ्रादिक्रूरश्वापदें व हरिणादि सौम्य जनावरें स्वाभाविक वैरभाव सोडून प्रेमानें एकत्र राहतात. याचें कारण महादेव मल्लिकार्जुनाचें महात्म्यच होय. हें मल्लिकार्जुन महालिंग द्वादशज्योतिर्लिंगांपैकींच एक आहे. या ज्योतिर्लिंगाच्या दर्शनमात्रेकरूनच

ब्रह्महत्यादि महापातकें नाहींशीं होतात. कैलासाधिपति परमेश्वरच लोकानुग्रहासाठीं ज्योतिर्लिंगाच्यारूपानें एथें कायमचे राहिले आहेत व त्यांची आर्धांगी महाशक्ति भ्रमरांबारूपानें एथें राहिली आहे. याप्रमाणें या पर्वतावर शिवशक्तीचें वास्तव्य असल्यामुळेंच हें स्थान महाक्षेत्र झालें आहे. काशी, केदार वगैरे क्षेत्रांप्रमाणेंच हें पवित्र क्षेत्र होय. अनेक प्रापंचिकलोक यात्रेसाठीं एथें येऊन शिवपूजनानें इष्टार्थफलसिद्धि करून घेतात. या गिरिशिखराच्या दर्शनमात्रेंकरूनही मोक्ष मिळतो. एथील दगडसुद्धां देवमूर्तीप्रमाणें आहेत, श्रीपरमेश्वराच्या जटापटलांत वास करणारी गंगादेवी एथें पाताळगंगा नांवानें वहात असून आपल्या जलाच्या स्नानपानानें यात्रेकरूंना पवित्र करीत आहे. कित्येक मुमुक्षु या पर्वताच्या गुहांतून राहून घोर तपश्चर्या करीत असतात, इंद्रादि देवतांनींही आपापल्या नांवानें एथें शिवलिंगें स्थापन केलीं आहेत. हे रुद्रमुने, पहा. हे रत्नमयलिंग वैकुंठवासी विष्णूनें स्थापन केलें आहे. सत्यलोकवासी ब्रह्मदेवानें पूजलेलें हें स्फटिकलिंग होय, हें इंद्रानें स्थापन केलेलें चांदीचें लिंग पहा, हीं अग्नियमादि इतर देवतांनीं पूजिलेलीं सुवर्णलिंगें आहेत. याप्रमाणें शिवलिंगें दाखवीत ते चालले होते. श्री मल्लिकार्जुनलिंगाच्या प्रभावानें येथें हरीणही सामगायन करीत असतात. खड्गजातीचे हरीण तांडवनृत्य करीत असतात, पिपिलिकादि जंतूसुद्धां आपापल्या भाषेंत बोलतात. हा सर्व चमत्कार रुद्रमुनींना दाखवीत रेणुकगणाधीश्वर पर्वताशिखरावर गेले असतां तेथें एक विषमय सरोवर पाहून हत्तीवरून खालीं उतरले, सर्व परिवार तृषार्त झालेला पाहून त्यांना दया आली व त्यांनीं एका क्षणांत विषारी सरोवर अमृतमय केलें. त्यामुळें सर्व लोक संतुष्ट झाले.

रुद्रमुनी शिवाचार्य, रेणुकगणाधीश्वरांचें महात्म्य पाहून चकित झाले. नंतर सर्व परिवार तेथेंच ठेवून व रुद्रमुनींना तेवढें बरोबर घेऊन एका अगाध बिळांत गेले. बरेच दूर जाऊन कैलास, वैकुंठ, रुद्रलोक, सत्यलोक, पितृलोक वगैरे रुद्रमुनींना दाखवून रेणुकगणाधीश्वर पुन्हा त्याच बिळांतून बाहेर आले.

'हे रुद्रमुने, शैलपर्वतावरील सर्व शिला (दगड) चिंतामणीसारख्या आहेत, एथील सर्व वृक्ष कल्पतरूप्रमाणें आहेत; सर्व गाई कामधेनु आहेत. जगद्गुरु पंडिताराध्य एथील मल्लिकार्जुन लिंगांतूनच उद्भवले आहेत, तें पाहा. त्यांनीं स्थापन केलेलें धर्मसिंहासन तेथें शोभत आहे एथें वास्तव्य करून असलेले तपस्वी जगद्गुरु पंडिताराध्यांच्या कृपाप्रसादानेंच तपःसाम्राज्य उपभोगीत आहेत, यापर्वताचें वैभव सहस्रामुखी शेषही वर्णूं शकणार नाहीं याप्रमाणें सर्व प्रदेश दाखवून व कांहीं दिवस तेथें राहून श्रीरेणुकागणाधीश्वर मार्गांतील दर्शनीय स्थळें रुद्रमुनींना दाखवीत सहपरिवार मलयाचलावरील रंभापुरीस गेले.

एकदां शिवयोगवैभवसंपन्न रेणुकगणाधीश्वर शिवाचें चिंतन करीत असतां त्यांना साक्षात्कार झाला व परमेश्वर म्हणाले, 'हे रेणुकगणाधीशा, तूं माझ्या आज्ञेनुसार भूलोकीं अवतरून चौदाशें वर्षें झालीं, मीं सांगितलेलें मतप्रसाराचें कार्यही तूं पूर्ण केलें आहेस, तुझ्या इच्छेप्रमाणें भूगर्भांतून उद्भवलेले रुद्रमुनी तुझ्याप्रमाणेंच महिमाशाली असून शिवविद्यापारंगत आहेत. रक्षण, शिक्षण व खंडन

मंडनादि लोककार्यांमध्यें ते समर्थ आहेत. तूं स्थापन केलेल्या शैवसाम्राज्याचें आधिपत्य चालविण्यास ते अगदीं कुशल आहेत, आतां तूं तुझ्या उद्भवस्थानीं म्हणजे कुल्यपाक क्षेत्रीं जा व सोमेश्वर लिंगाचेद्वारा माझ्याकडे परत ये.' रेणुकाचार्यांनीं आपली समाधि उतरविली व शिवाज्ञा लक्षांत आणून आनंदानें त्यांनीं रुद्रमुनी शिवाचार्यांना जवळ बोलावलें व म्हटलें 'बाबा' मीं स्थापन केलेल्या शैवसाम्राजाचें आधिपत्य चालविण्यास तूं आतां पूर्ण समर्थ झाला आहेस. आतां शिष्योद्धाराचे कार्यांत आसक्त हो, अधर्म मार्गाकडे जन झुकणार नाहींत असें कर, भक्तांचीं हृदयक्षेत्रें शुद्ध करून तेथें निर्मल शिवभक्तीचें बीज पेर व त्यांवर ज्ञानक्रियाचाररूपी जलाचें शिंचन कर, तें शिवभक्तीचें बीज लवकरच अंकुरित होऊन पल्लवित होवो व फलपुष्पभरित होवो. 'नवीरशैव सदृशं मतमस्ती जगत्रये' हें शिवागमाचें रहस्य जनांना सांग, तुझ्या आयुष्याचें हेंच ध्येय आहे. शिवाज्ञेप्रमाणें भूलोकावरील माझें संचारकार्य पूर्ण झाल्यामुळें मी आतां शिवासन्निध जात आहें तुझें मंगल होवो; असें म्हणून आकाशमार्गानें रेणुकगणाधीश्वर कुल्यपाकक्षेत्रीं गेले.

तेथें शोभत असलेल्या सोमनाथ मंदिरांत भस्मधारी, रुद्राक्ष-विभूषित, सिद्धेश, रेणुकगणाधीश्वर गेले व प्रेमानें साष्टांग नमस्कार करून त्यांनीं सोमेश्वर लिंगाचें ध्यान केलें व पुलकितगात्रानें म्हटलें—

'हे जगज्जनका, तुझी आज्ञा पुष्पमालेप्रमाणें मस्तकावर धारण करून मी या लिंगांतून उद्भवलों, व चौदाशें वर्षें नितकर्तव्य पार

पाहून तुझ्यासमीपच आलों आहें. तेव्हां माझ्या उद्भवास जशी जागा दिलीस तशी हे सोमेश्वर लिंगा, लयासही आतां मला जागा दे.' असें रेणुकगणाधीश्वरांनीं म्हणतांच तत्क्षणीं लिंग दुभंग झालें, व त्यांना जागा मिळून ते लिंगैक्य पावले. श्रीरेणुकगणाधीश शिव-तादात्म्य भावनेनें लिंगांत पद्मासनस्थ झाले, आकाशांतून पुष्पवृष्टि होऊं लागली, देवांगना नृत्य करूं लागल्या, गंधर्व गायन करूं लागले, देवांनीं भेरी वगैरे वाद्यें वाजवून सर्व दिशा निनादून सोडल्या.

त्या देवाळयांतील पूजारी वगैरे लोक तो चमत्कार पाहून, भिंतीवरील चित्राप्रमाणें जागच्याजागीं खिळल्यासारखे झाले. महर्षींनीं पुन्ह पुन्हा वंदन केलें, जयजयकार केला. सूर्यचंद्रादि खगोल पूर्वेकडे उगवून पश्चिमेकडे मावळतात यांत आश्चर्यकारक असें कांहीं नाहीं, पण श्रीरेणुकागणाधीश्वर जेथून उद्भवले तेथेंच लय पावले, हें अतिशय अद्भुत आहे. सर्व लोक तेथें गोळा झाले व उघे उघे म्हणून जयजयकार करूं लागले, अनेक वेळां साष्टांग नमस्कार घालून ते म्हणत, कीं हे शिवमतस्थापका, अप्राकृतवर्णाश्रमधर्मजीवना, अप्राकृतगुणगणाधारा, भक्तकल्पद्रुमा, सकलमुनिवंद्या, जगद्गुरो, प्रमथ-गणनायका, दयानिधे, श्रीरेणुकाचार्या, तूं धन्य आहेस.

श्रीरेणुकगणाधीश प्रथम शिवाच्या सद्योजात मुखांतून उद्भवले व गणाधीश होऊन कृतादियुगामध्यें, भूलोकावर शिवलिंगांतून उद्भ-ल्याप्रमाणेंच या कलियुगांतही ह्या शिवलिंगांतूनच प्रादुर्भूत होऊन



श्री जगद्गुरु रेणुकाचार्यांचा सोमेशलिंगांत ऐक्य.

चौदाशेंवर्षेंपर्यंत सर्वत्र संचार करून अनेक चमत्कारद्वारां शिवसिद्धांताचा प्रसार करून शिवतत्त्व व शिवभक्ति हीं कायम करून मोक्षांग अशा षट्स्थलांचा उपदेश करून लोकोपकारार्थ निरनिराळ्या भाषेंत अनेक ग्रंथ तयार करून ते दिव्य देहानें शिवलोकींच परत गेले. लगेंच तेथील प्रमथांनीं त्यांचें मोठ्या प्रेमानें स्वागत करून त्यांना परमेश्वरासमीप नेलें.

दिव्यरत्नमय सिंहासनावर महादेव आरूढ झाले होते, पार्वती त्यांच्या गळ्यांत हात घालून डाव्या मांडीवर बसली होती, उजव्या मांडीवर गजानन व षडानन बसले होते. ब्रह्मा, विष्णू वगैरे देव; लक्ष्मी, सरस्वती वगैरे शक्ति; नंदी वगैरे प्रमथाधिप दोन्ही बाजूंस उभे होते.

श्री रेणुकगणाधीशांना परत आलेले पाहून सर्वजन आनंदानें हसत माना डोलावीत होते. त्यांना श्रीरेणुकगणाधीश्वरांचा विरह बराच काळपर्यंत झाला असल्यामुळें त्यांच्या या आगमनानें त्यांना झालेला आनंद अवर्णनीय होता. लगेंच जगद्गुरु परमेश्वराजवळ गेले व त्यांनीं त्यांना साष्टांग नमस्कार करून हात जोडून उभे राहून भूलोकावरील आपलें संपूर्ण अवतारकार्य निवेदन केलें. शेवटीं शिवाज्ञेप्रमाणें पुन्हां गणाधिपत्य स्वीकारून श्रीरेणुकाचार्य शिवसभेंत विराजमान् झाले, व अद्यापि तेथें विराजमान् आहेत.

गुरुचरणसरोजानुग्रहानेंच माझ्या मुखांतून वरील काव्य बाहेर पडलें आहे. त्यामध्यें जे कांहीं दोष वाटतील ते माझे आहेत.

'पात्राचा (भांड्याचा) दोष पयाला (दुधाला) देत नसतात' तद्वत माझा दोष काव्याकडे लावूं नये.

सर्व देशांतून शिवभक्ति वाढो, पर्जन्य योग्यकाळीं नेहमीं होवो, हें काव्य चोहोंकडे प्रसिद्ध होवो, म्हणजेच ग्रंथकार पूर्णमनोरथ होऊन निर्धूत बुद्धीचा होईल.

अश्विन शुद्ध १ शके १८६५ गुरुवार रोजीं हें लेखन पूर्ण झालें.

जगद्गुरु रेणुकाचार्यांच्या या अद्भुत लीलाग्रंथाचें जो भक्तीनें श्रवण करील, पठन करील, व प्रवचन करील, तो शिवज्ञानवैभवसंपन्न, धनवान्, सर्व संपत्ति व संततियुक्त, कीर्तिमान्, व दीर्घायुषी होऊन शेवटीं परशिवाचें सान्निध्य प्राप्तकरून घेईल. जगद्गुरूंच्या अनुग्रहानें सर्व राज्यांतून, खेड्यांतून सर्व प्रकारच्या पीडा नाहींशा होऊन सर्वत्र कल्याणनांदो. शिवभक्ति आकाशाप्रमाणें सर्वत्र व्यापो. जगद्गुरु रेणुकाचार्यांचा यशोध्वज त्रिभवनांत मिरवो.

॥ इति श्रीरेणुकविजयांतर्गत पंचम मंजरी समाप्त ॥

शुद्धि-पत्रक.

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१०	सांभ	सांब
३	६	समूहाचे	समूहाचें
४	१	कोल्लीपाकी	कुल्यपाक
६	१०	घोश	घोस
६	२१	दाही	दहाही
७	१०	परमेश्वरांचें	परमेश्वराचें
८	२०	कोल्लीपाकी	कुल्यपाक
९	३	तुम्ही	तूं
११	८	कोल्लीपाकी	कुल्यपाक
११	१२	कोल्लीपाकी	कुल्यपाक
११	१७	कोल्लीपाकी	कुल्यपाक
१२	६	नागकेशर	नागकेसर
१२	१४	कोल्लीपाकी	कुल्यभाक
१२	१९	कोल्लीपाकी	कुल्यपाक
१३	२	स्वभाविक	स्वाभाविक
१३	३	कोल्लीपाकी	कुल्यपाक
१३	१३	पुजासाहित्य	पूजासाहित्य
१३	१५	षोडशोपचारांनीं	शोडषोपचारांनीं
१४	३	क्रुर	क्रूर
१९	४	कोल्लीपाकी	कुल्यपाक
१९	८	करूक	करून
२०	९	अंबा	आंबा
२०	१७	सिंव्हिणी	सिंहिणी
२१	१३	शिष्यसमुदयांसह	शिष्यसमुदायांसह

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२३	१७	असे	अशा
२४	१४	कोळीपाकी	कुल्यपाक
२५	७	प्रकाराच्या	प्रकारच्या
२६	७	अद्‌भूत	अद्भुत
२७	६	सप्तर्षी	सप्तर्षि
२७	११	असा	असे
२८	७	स्तुस्ती	स्तुति
३१	१४	श्रोतेंद्रियांत	श्रोत्रेंद्रियांत
४१	२१	जाईल	जातील
६१	७	श्रीरेणुकाशिवाचार्यांना	श्रीरेणुकशिवाचार्यांना
६५	१९	निर्भत्सना	निर्भर्त्सना
८२	२०	दिनांवर	दीनांवर
९१	२१	क्रीडेनें	क्रीडांनीं
९४	२१	स्यांनीं	त्यांनीं
९८	२	परड्मुख	पराङ्मुख
१२६	३	वशट्‌हुं	वशट् हुं
१२७	२१	कारण शरिरावरील	कारणशरिरावरील
१३९	२०	योगीद्रः	योगींद्रः
१४०	१६	मलयपर्वत	शैलपर्वत
१४२	१२	सहस्त्रामुखी	सहस्त्रमुखी
१४३	७	शैवसाम्राजाचें	शैवसाम्राज्याचें
१४५	२०	गुरुचरणसरोजानु- प्रहानेंच	गुरुचरणसरजानु- प्रहानेंच
१४६	१४	त्रिभवनांत	त्रिभुवनांत

पृष्ठांक १ ते १७ प्रथम मंजरी, पृष्ठांक २१ ते ५३ द्वितिय मंजरी घ पृष्ठांक ५५ ते ७९ वर तृतिय मंजरी असें वाचणे,

ಪುಸ್ತಕದ ಸಂಖ್ಯೆ...........................

D

श्री वीरशैव गुरुकुल

—धर्मवीर ग्रंथ रत्नमाला—

प्रथम रत्नम्

श्री चन्नबसव विजयः

किंमत २ रु.

द्वितीय रत्नम्

श्री रेणुक विजयः

किंमत १॥ रु.

इतर ग्रंथः—

श्री सिद्धेश्वर चरित्र. किं. ।.

श्री रुद्रः किं. ॥.

संक्षिप्त वैदिक शिवपुजाविधी. किं. ८-

मिळण्याचे ठिकाणः—

श्री बालतपस्वी बृहन्मठ, उत्तर कसबा ९१८ **सोलापूर.**